# आंदोलिका

बा. द. सातोस्कर



म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. 2943

REFBK-0023775

संदर्भ निबंध


# मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ [८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

( क्र. मा. प. )
५०००–१२–८२

संदर्भ निबंध

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२९७७३
दा. क. २३७७४
निबंध/१३१२७३
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

सागर साहित्य प्रकाशन : १२

संदर्भ निबंध
2983
23775
१५/२/८३

# शांग्री ला

(ललित निबंध संग्रह)

REFBK-0023775

ा. द. सातोस्कर

पणजी १९८०

मुद्रक व प्रकाशक
शचींद्र सातोस्कर
यांनी
सागर साहित्य मुद्रणालय
डॉ. बोरकर रोड, पणजी
येथे छापून प्रसिद्ध केले

चित्रकार
अ. ज्ञा. सालकर
पुणे

मूल्य रु. ८

# थोडे प्रास्ताविक

ललित निबंध किंवा लघु निबंध हा वाङ्मयप्रकार मी कधी हाताळीन असे वाटले नव्हते. परंतु अचानक ' शांग्रीला ' हा ललित निबंध लिहिला. लिहिल्याशिवाय राहवले नाही म्हणून लिहिला. १४ वर्षांपूर्वी स्वतःची छोटीशी मठी बांधली आणि ४–५ वर्षांनंतर गच्चीवर जाण्यासाठी म्हणून जिना बांधला. त्या जिन्याचे सिमेंट–कॉंक्रीट सुकले आणि कामगारांनी फळ्या काढून टाकल्या आणि मी गच्चीवर प्रथम पदार्पण केले. आणि आजूबाजूचे दृश्य पाहून एकदम भारावून गेलो. वेळ संध्याकाळची होती. सूर्य पश्चिम समुद्रात बुडत होता... पण या दृश्याचे वर्णन इथे करत नाही. ते प्रत्यक्ष त्या निबंधातच केले आहे. पण आजूबाजूचे दृश्य पाहिले आणि मनाला इतका आनंद झाला की लगेच खाली येऊन ' शांग्रीला ' हा ललित निबंध लिहिला. कुठल्या तरी दिवाळी अंकात तो प्रसिद्ध झाला आणि कांही वाचकांकडून खुषीपत्रे आली.

तेव्हांपासून आकाशवाणी आणि दिवाळी अंकांकडून मागणी आली तसतसे असे ललित निबंध लिहीत गेलो. जीवनात सुखदुःखाचे असे कांही संमिश्र अनुभव येतात की, तेच आपण सांगत गेलो की, हे अनुभव ललित निबंधांचा आकार घेतात.

गेल्या ८–९ वर्षांत जे बीसेक निबंध लिहिले त्यांतले कांही या संग्रहात समाविष्ट केले आहेत. माझ्या मृत्यूनंतर माझ्या साहित्यावर कुणा समीक्षक मित्राने कांही लिहिलेच तर ' सातोस्करांनी कांही बरेवाईट ललित निबंध सुद्धा लिहिले आहेत ' असे एकादे वाक्य त्याने लिहावे म्हणून संग्रहाची ही सोय करून ठेवली आहे.

या निबंधांपैकी कांही पणजी आकाशवाणीवरून प्रसृत झाले आहेत, तर कांही गोमन्तक, राष्ट्रमत, नवप्रभा आणि चित्रकार मुळगांवकरांची रत्नप्रभा या दिवाळी अंकांतून प्रसिद्ध झाले आहेत. त्या सर्वांचा मी आभारी आहे.

स्वप्नगंध, वरंभाळे<br>गोवा. ऑक्टो. ८० — **बा. द. सातोस्कर**

# अनुक्रम

१ : शांग्रीला १

२ : वृक्षवल्लीं आम्हा सोयरीं ९

३ : मी मंत्री असतो तर ! १६

४ : पंचकन्या स्मरेन्नित्यम् २३

५ : आपण सारी माणसे ३१

६ : मांडवी व जुवारीच्या काठावर ३९

७ : व्यसने आणि छंद ४९

८ : शेंबतूचे दुःख ५८

९ : निर्मितीचा आनंद ६६

१० : मला तारुण्य हवंय ७६

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२६०३
दा. क्र. २३.५५५
दिनांक ९/२/०३
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

# १ : शांग्रीला

करंजाळे गांव हे पणजी राजधानीचे उपनगर. पोर्तुगीज भाषेत कारांझालँ. आणि इथे गेली अठरा वर्षं राहाणाऱ्या केरळीयांच्या लेखी करामझलम ! या गांवात मी राहातो. दारासमोरून 'राजनिवास रोड' जातो. पलीकडे सेंट पीटरचे चॅपेल, सकाळ, दुपार, सायंकाळ असा तिन्ही त्रिकाळ चॅपेलमध्ये घंटानाद होतो. मृतात्म्यांना शांती मिळावी म्हणूनही घंटानाद होतो. पण तो अवेळी. कुणाचा नवस असतो म्हणून घंटा वाजवल्या जातात, तर रविवारी मासच्या आधी भाविकांना सूचना म्हणून घंटांचा आवाज निनादतो. फेस्ताच्या दिवशी व त्यापूर्वी 'नॉव्हेनां'चे नऊ दिवस तर घंटानादाने गाव दुमदुमून जातो. पण या घंटानादाचे प्रकार किती वेगळे ! शब्दांनी ते सांगता येणार नाहीत, ते ऐकायला हवेत. दोन–एक, दोन–एक अशा लयीत मर्तिकाच्या घंटा वाजू लागल्या की, गांवावर शोककळा पसरते. आणि 'आज कोण सोंपलॉ ?' म्हणून गांवकरी एकमेकांना विचारू लागतात. कारण नेहमी लंगोटी लावून फिरणाऱ्या या लोकांना मृताच्या अंत्ययात्रेत सामील होण्यासाठी बासनातले काळे सूटबूट बाहेर काढायचे असतात. याउलट नाताळातल्या–२४ डिसेंबरच्या मध्य रात्री होणाऱ्या घंटानादाने गांवातल्या वृद्धांपासून चिल्लापिल्लांपर्यंत सर्वांच्याच मनातल्या आनंदाला उधाण येते. सर्वांनाच रंगीबेरंगी कपडे करून चॅपेलमध्ये अवतरणाऱ्या 'आमच्या सायबाचे' मनःचक्षूंनी दर्शन घ्यायचे असते. बेथलेहॅमधल्या एका गोठ्यात येशू जन्मला म्हणून घराच्या

अंगणात 'त्या' गोठ्याची छोटी प्रतिकृती तयार करून आणि त्यांत मुलांच्या खेळांतली गुरेवासरे नी शेळ्या-मेंढ्या ठेवून ते नुकतेच मोकळे झालेले असतात. गोठ्याशेजारी ख्रिसमस-ट्री उभारलेला असतो. त्यावर पंचकोनी नक्षत्राच्या आकाराचा आकाशदिवा टांगलेला असतो.

घरातल्या सर्व मंडळींचे कान आता चॅपेलमधल्या 'कॅरोल साँग्स'कडे लागलेले असतात.

चॅपेलमध्ये असा कांही समारंभ चालू असला म्हणजे आमच्या घराच्या व्हरांड्यात उभा राहून मी चॅपेलकडे पाहात राहतो. ती अस्तमानाची वेळ असली तर माझे लक्ष अभावितपणे चॅपेलच्या पाठीमागल्या टेकड्यांकडे जाते. मावळत्या सूर्याच्या सोनेरी किरणांनी टेकड्यांवरल्या आधुनिक बांधणीच्या दोन पांढऱ्याशुभ्र इमारतींची तावदाने झगमगू लागतात. यांपैकी एक इमारत असते मादींच्या कॉन्व्हेंटची, तर दुसरी असते कॉन्व्हेन्ट स्कूलची. एक धर्ममंदिर तर दुसरे विद्यामंदिर. त्या मंदिरांतल्या कांही सिस्टर्स आणि मदर्स आमच्या चांगल्या परिचयाच्या आहेत. कांही केरळमधल्या काळ्या, कांही युरोपियन गोऱ्या, तर कांही गोव्यातल्या निमगोऱ्या. दर रविवारी त्यांची चॅपेलमध्ये हजेरी लागते. चॅपेलला लागून असलेल्या जुन्या कॉन्व्हेंटमध्ये त्या एक 'क्रेश' चालवितात. कामाला जाणाऱ्या स्त्रियांच्या लहान मुलांना त्या ठेवून घेतात, त्यांना खाऊपिऊ घालतात, कपडे बदलतात, खेळवतात, झोपवतात, सारे कांही सेवाधर्माने करतात. मुले ही देवाघरची फुले अशी त्यांची श्रद्धा आहे. माझ्या नातवंडांचे कौतुक करायला त्या आमच्या घरी येतात. नातीला कडेवर घेताघेताच मिचमिचे डोळे अधिक मिचमिचे करीत मदर सुपीरियर उद्गारते, 'हाऊ नाईस!' आणि मग नातीला उद्देशून विचारते, 'डु यू क्राय बेबी?'

पण बेबीला कोणतीच भाषा कळत नाही. कळते ती फक्त प्रेमाची भाषा! ती मग मदर सुपीरियरच्या घाऱ्या-निळ्या स्पॅनिश की जर्मन डोळ्यांकडे एकटक पाहात राहाते आणि तिच्या गोऱ्या गोऱ्या सुरकुतलेल्या

गालांचे गालगुचे घेते.

माझ्या बंगलीच्या पूर्वदिशेचा परिसर असा हा देवभूमीने व्यापलेला आहे आणि देवकन्या नन्सनी तो पावन केला आहे!

राजनिवास रस्ता आणि आमचे घर यांच्यामध्ये आमचा एक छोटासा बगीचा आहे. पहाटेच्या वेळी नेहमीपेक्षा अधिक लवकर जाग आली तर नगरपालिकेच्या दिव्यांच्या मंद प्रकाशात या बागेत मी शतपावली करतो. हळुहळू दिव्यांचे तेज मंदावत जाते. चॅपेलमागच्या टेकड्यांच्या पलीकडे तांबडे फुटू लागते. माडांच्या झावळ्या सळसळू लागतात. चिमण्यासारखा दिसणारा, पण चिमण्यांहून लहान पिवळ्या चोचीचा एखादा चिमणासा पक्षी गुलाबाच्या ताटव्यांत लपून राहिलेल्या आपल्या छोट्याशा घरट्यातून किलबील करीत उडून जातो. रात्रभर मिटून ठेवलेल्या जास्वंदीच्या लाल लाल फुलांच्या पाकळ्यांचे ओठ हळुहळू उलगडूं लागतात.

आणि मग एकदम एक काळोखाची लाट येते. पहाटेपूर्वीचा काळोख! ही लाट कांहीं मिनिटेच टिकते. ती ओसरतां ओसरतां चॅपेलचा बंद दरवाजा एकदम उघडतो, झगझगीत प्रकाशाची तिरीप दरवाजांतून बाहेर येते. घंटानाद सुरू होतो. कोंबड्याच्या बांगेचा आवाज त्याच नादांत मिसळून जातो. आणि मग समोरच्या टेकड्यांमधून लाल–पिवळ्या रंगाची पखरण वाढत जाऊन सूर्यबिंबाची करंजी दिसूं लागते.

पूर्वेप्रमाणेच पश्चिमेच्या बाबतीतही आमचा गाव भाग्यवान आहे. शेत संपते तिथे बांध आणि त्यापुढे गोव्यातला एकेकाळचा सुप्रसिद्ध असा अर्धचंद्राकार समुद्रकिनारा आहे. या 'वेळे' वर पोर्तुगीज राजवटीतले अधिकारी मार्च ते मे असे तीन महिने हवा खाण्यासाठी म्हणून बिऱ्हाड-बाजले घेऊन राहात असत. त्यांच्या अनुकरणाने गोव्यांतले श्रीमंत लोक येत. गेल्या बारा वर्षांत कळंगुटच्या समुद्रवेळेचे तकदीर फळफळते आहे आणि करंजाळ्याची वेळ उपेक्षित बनली आहे.

खरे म्हणजे आमची ही वेळ म्हणजे सागरवेला नव्हे. मांडवी नदी

सिंधुसागराला मिळते तिथे तिने उपसागराचे रूप धारण केले आहे. मुखाच्या आत, करंजाळे गांवच्या कुशीत ती विसावली आहे. म्हणूनच ती सुरक्षित आहे. सोसाट्याच्या वाऱ्यामुळे, खवळलेल्या समुद्रामुळे किंवा फसव्या रेतीमुळे इथे क्वचितच माणसे मरतात. मरतात ते मासे. शेकडो, हजारो, लाखो मासे. दिवाळीच्या सीझनला शे शंभर खारबी मोठी रांपण ओढू लागले की तिच्या पोटातल्या लाखो बांगड्यांचा थवा जिवाच्या आकांताने धडपडू लागतो. सुटकेसाठी उड्या मारू लागतो. अन् या उडत्या बांगड्यांना पकडण्यासाठी अर्धचंद्राकार जाळयाच्या तरत्या कांठावर शुभ्रसफेद समुद्रपक्ष्यांची धांवपळ चालते. बिचारे बांगडे! महासागराच्या वेगवान प्रवाहांतील धोक्यापासून आसरा मिळावा म्हणून मांडवीच्या मुखात येतात आणि भ्रमनिरास होऊन समुद्रपक्ष्यांचे व माणसांचे भक्ष्य बनतात.

आमच्या घराच्या गच्चीवरून मांडवीच्या मुखाचे हे दृश्य मोठे प्रेक्षणीय वाटते. नदीच्या जीविताचे इप्सित म्हणजे सागरमीलन. पण इथे, एकाद्या आधुनिक गिरणगांवी कौटुंबिक नाटकांत नायक–नायिकेच्या मीलनाच्या ऐन वेळी खलनायकाने दोन्ही हातांनी नायिकेला घट्ट पकडून ठेवावे, त्याप्रमाणे मांडवी पश्चिम सागराच्या कुशीत शिरत असतांनाच काब आणि आग्वाद या दोन्ही भूशिरांचे बाहू तिला असे अडवतात की त्यामुळे ती क्षुब्ध होते. आणि करंजाळयाच्या भूमीवर आक्रस्ताळेपणाने आक्रमण करते. त्याच कौटुंबिक नाटकांतल्या संतापलेल्या नायिकेसारखी!

रागावलेल्या मांडवीचे हे दृश्य केव्हाही पाहावे. रात्रीच्या चंद्रप्रकाशात फक्त शेदीडशे यार्डांवरून आमच्या गच्चीवर बसून गोवा पाहाण्यासाठी म्हणून घाईगर्दीने आलेले माझे पाहुणे जेव्हा हे दृश्य पाहातात, तेव्हा गोव्यांतला त्यांचा मुक्काम वाढतो आणि मासे व फेनिल यव किंवा द्राक्ष रसायन आणण्यासाठी मला धांवपळ करावी लागते!

रात्रीच्या त्या जड हवेत समुद्रावरून येणाऱ्या मंद झुळुका खारा वारा बरोबर घेऊन येत असतात. अजगरासारख्या किनारा जवळ करणाऱ्या

नागमोडी लाटा फुटल्याचा सौम्य आवाज कानांवर पडतो. उजव्या हाताला आग्वादच्या किल्ल्यातला दीपगृह थांबून थांबून तीव्र शुभ्र प्रकाशाचा झोत फेकीत असतो आणि डाव्या हाताच्या काबच्या उंचच उंच सुळक्यावर खडा असलेल्या राजनिवासातून ट्युबलाईटस्च्या निळसर मंद प्रकाशाच्या पाकळ्या गवाक्षागवाक्षातून बाहेर पडलेल्या दिसतात. काब व आग्वाद यांच्या मधल्या पट्ट्यात समुद्र व आकाश यांची शिवण स्पष्ट दिसते. या शिवणीच्या वरच्या निळ्या–भुऱ्या कापडावर मग नक्षत्रांची नकशी उलगडू लागते.

मुंबईपुण्याहून आलेला एखादा कविवृत्तीचा पाहुणा मग अभावितपणे उद्गारतो, ' किती सुंदर आहे तुमचा गोवा ! '

मग मी थोड्या अभिमानाने म्हणतो, ' अजून पुरा कुठे पाह्यलाय तुम्ही गोवा ? '

दुसऱ्या दिवशी पाहुण्यांना आमच्या गांवचे दोन स्पॉट्स मी दाखवतो. एक काबो राजनिवास आणि दुसरा दोना पावल. काबो म्हणजे केप— भूशिर. या भूशिरावर गोव्याच्या नायब राज्यपालांचा राजनिवास असतो. हे केवळ भूशिर नव्हे, ते भूशिखर असते. उंच उंच डोंगरासारखे. तीनशे वर्षांपूर्वी पोर्तुगीज पाद्र्यांचे निवासस्थान म्हणून ते बांधलेले असते, आणि मग पोर्तुगीज व्हाईसरॉय आणि गव्हर्नर तिथे राहून जातात. त्यांचा वारसा आतां आमच्या स्वदेशी गव्हर्नरांनी चालविलेला आहे. आमचा हा राजनिवास म्हणजे खरोखर एक स्वप्न आहे. ज्या ज्या वेळी मी या राजनिवासात जातो त्या त्या वेळी ' शांग्रीला ' या काल्पनिक राजमहालाची मला आठवण होते. मुख्य रस्त्यापासून मैल दोन मैल तुम्ही झाडीतून गेलात म्हणजे तुमची गाडी एकदम थांबते. पुढे मुळी रस्ताच नाही. आहे तो तुटलेला कडा, खोल समुद्रात गेलेला. इथे तुम्ही उतरता ते राजवाड्याच्या दक्षिणेला, चार पावले चालून गेलात की तुम्ही एका प्रशस्त बगीचांत येता. माडीवरच्या पहिल्याच दालनात राज्यपाल कागदपत्र पाहात बसलेले असतात; किंवा विश्रांतीची वेळ असली तर अंतर्गृहात असतात.

पूर्वपरवानगी घेऊन आपण त्यांना भेटूं शकतो. राज्यपाल मोठ्या आस्थेने तुमची चौकशी करतात उभयतांच्या आवडीच्या विषयावर गप्पा मारतात. व्हरांड्यात वेताच्या खुर्चीवर बसून राजनिवासाचे कौतुक करतात.

राजवाड्याच्या पश्चिमेकडच्या व्हरांड्यात उभे राहून तुम्ही बाहेर पाहातां तेव्हां एकाद्या प्रचंड बोटीच्या डेकवर आपण उभे आहोंत असा तुम्हाला भास होतो. समोर दर्या, दर्या आणि दर्या! डाव्या बाजूला दर्यासारखेच दिसणारे जुवारी नदीचे विस्तीर्ण मुख. त्यापलीकडे मुरगाव बंदर. बंदरात आणि जवळपासच्या समुद्रांत उभ्या असणाऱ्या प्रचंड बोटी. गोव्यांतून खनिज न्यायला आलेल्या. उजव्या हाताला मांडवी. हा काबो राजनिवास म्हणजे मांडवी, आगशी आणि सिंधुसागर यांच्या मीलनाचा साक्षी आहे. याच संगमावर महात्मा गांधीच्या रक्षेचे अवशेष विसर्जित करण्यात आले होते. याच संगमावर भारतीय युद्धनौकांनी गोव्याच्या विजयमोहिमेत पोर्तुगीजांच्या आल्बुकेर्क क्रुझरला खेळविले होते. त्यांपैकी विजयी विक्रांतला याच संगमावर मी भेट दिली होती. याच संगमावर अखिल भारतीय संपादक परिषदेसाठी आलेल्या भारतांतील नामवंत संपादकांना सहलीसाठी घेऊन जाणाऱ्या लाँचला तिन्हीसांजेच्या हेमंता-तल्या अंधारात भोक पडल्यामुळे, जलसमाधी मिळणार होती. राज-वाड्याच्या व्हरांड्यांत उभे राहून श्री. व सौ. तुमकूर शिवशंकर आणि दामलेसाहेबांसारख्या राज्यपालांना हे किस्से सुनावीत असल्याच्या प्रसंगांची मला याद येते.

इथून जवळच तीन किलोमिटर अंतरावर दोना पावल हे करंजाळे गांवचे आणखी एक आकर्षण आहे. इथे जुवारी नदीत बांधलेल्या लांबलचक धक्क्यावरून समोरच्या मुरगांव बंदरात जाण्यासाठी बाफोर नावाच्या लाँचेस सुटतात. या लांचमधून समुद्राच्या तोंडावरून, लाटांचे धक्के खात केलेला वीस मिनिटांचा प्रवास म्हणजे एक अविस्मरणीय अनुभव ? धक्क्याशेजारीच तीन बाजूंनी पाण्याने वेढलेले एक टेकाड आहे. या टेकाडावर एक काँक्रिचटा उघडा मंडप आहे. शारदीय चंद्रकळेत

हा स्पॉट पाहाण्यासाठी एका मित्राला घेऊन त्या दिवशी, नव्हे रात्री मी जेव्हा वृक्षलता नसलेल्या त्या टेकडावरल्या उपवनात आलो तेव्हा तो जणू भारल्यासारखा झाला. चहूकडे नजर फिरवीत तो म्हणाला, ' समुद्र मी पाहिला आहे. पर्वत आणि पर्वती पाहिल्या आहेत. राजवाडेही पाहिले आहेत. पण हे सारे अद्‌भुत आहे. ही स्वप्ननगरी आहे. तुझ्या बंगलीचे स्वप्नगंध हे नांव सुद्धा या स्वप्ननगरीत किती शोभून दिसते !'

मी चटकन् म्हणतो, ' स्वप्ननगरी नव्हे, शांग्रीला !'

' शांग्रीला !... शांग्रीला !' कांहीतरी हरवल्याची हुरहुर त्याच्या चेहऱ्यावर दिसते.

' बिस्कीट नव्हे ! ' मी म्हणतो.

आणि मग त्याला एकदम आठवते. शांग्रीला! हिमालयसदृश्य अशा हिमधवल पर्वतश्रेणीवरील तो महाल ! चाळीस वर्षांपूर्वी श्वास रोधून रूपेरी पडद्यावर पाहिलेला !

मित्र आनंदाने एकदम चित्कारतो ! ' हो, खरंच शांग्रीला ! फक्त पांढऱ्याऐवजी हिरव्या रंगाचा ! '

निसर्गसौंदर्याने नटलेला आमचा करंबाळे गांव मुख्यतः खिश्चन वस्तीचा आहे. बहुसंख्य लोक खारवी आहेत. त्यांची घरे मातीची असली तरी कौलारू आहेत. नीटनेटकी आहेत. प्रत्येक घरात कपाट, खुर्च्या, टेबल, खाट असे फर्निचर आहे. माझे बहुतेक सारे शेजारी हेच. त्यांचे आमचे संबंध फार चांगले आहेत. ' गणेसा 'ला त्यांना आम्ही ' नेवऱ्यां 'ची भेट पाठवितो, तर नाताळला त्यांच्याकडून ' बेबींक ' आणि केक्सचे ताट येते. सकाळच्या नास्त्याच्या वेळी कुणालातरी टेलिफोन करायला शेजारचे पीतमामा येतात तेव्हा त्यांचा नास्ताही आमच्याकडेच होतो, आणि संध्याकाळी कधीतरी बेळेवर फिरायला जातांना दांड्यावरल्या त्यांच्या बंगल्याला मी भेट दिली म्हणजे किमान बियरने माझे स्वागत केल्याशिवाय त्यांचा पाहुणचार पुरा होत नाही.

अशाच एका पाहुणचाराच्या प्रसंगी हजर असलेले माझे एक पुण्याचे मित्र उद्गारले, 'हे सारं अजब आहे!'

'काय अजब आहे?' मी विचारले.

'तुमच्या गांवचा निसर्ग तर स्वागतशील आहेच; पण तुमच्या गांवकऱ्यांनीही निसर्गाच्या स्वागतशीलतेला साथ दिली आहे.' माझ्या मित्रांतल्या लेखकाचे ते शब्द होते.

मला कांही बोलायला देण्यापूर्वीच ते पुढे म्हणाले, 'मला वाटतं, इथला निसर्ग शांत आहे, आणि माणसंही स्वास्थ्यप्रिय आहेत. या स्वास्थ्यांतून तुमची स्वागतशीलता निर्माण झाली असली पाहिजे.'

मी कांहीच बोललो नाही. काय बोलणार? लेखकमित्रच पुढे बोलत होता. 'या सुंदर, शांत वातावरणात तुमचे लेखन मोठ्या आरामात होत असेल, नाही?'

खरे बोलून मित्राचा भ्रमनिरास करणे मला बरे वाटले नाही.

मी मनातल्या मनात म्हटले, 'मित्रा, इथे या स्वास्थ्याची सुस्ती एवढी अंगावर येते की लिहायला मुळी मूडच लागत नाही. सृजनाच्या शक्तीला गतीची साथ हवी. ती नसली तर सृजनाची चाकेच मुळी गळून पडतात, खरे ना!'

# २ : वृक्षवल्लि आम्हा सोयरीं . . .

पांचसहा वर्षांपूर्वी मी स्वतःची अशी छोटीशी मठी बांधायचे ठरविले. मोठ्या उत्साहाने आर्किटेक्टकडून प्लॅन काढून घेतला. काँट्रॅक्टरला काँट्रॅक्ट दिले. आणि एका शुभ दिवशी साईटवर जाऊन प्लॅनप्रमाणे आंखणी करून घेतली. संध्याकाळपर्यंत आंखणी पूर्ण केली आणि घरी परतलो, तेव्हा सुरुवातीलाच उत्साह मावळला होता नि मन विषादाने भरून गेले होते.

विषादाचे कारण म्हणजे घर उभे करण्यासाठी पाचसहा तरणेताठे माड कापावे लागणार होते. माडांना वांचवून घर बांधणे कठीण होतं. ज्या दिवशी हे कल्पवृक्ष कापावे लागले त्या दिवशी मी साईटवर गेलोच नाही. घरांतही अस्वस्थता वाटायला लागली. मनाला अपराधीपणाची टोचणी लागली. माणसांशी नाते सांगणाऱ्या मित्रांच्या जिवावर मी उठलो आहे असा आक्रोश मन करू लागले.

पांच वर्षांनंतर असाच क्लेशकारक अनुभव गेल्या ईस्टर संडेच्या दिवशी आला. ख्रिस्ताच्या पुनरुत्थानानिमित्त पूर्वरात्री सुरू झालेला चर्च-मधला कार्यक्रम पहाटे दोन वाजतां आटोपला होता. भाविक जन घरोघरी परतले होते. पण चाळीस दिवसांच्या 'लेंट'च्या व्रताचे पारणे फेडण्या-साठी आमच्या गांवातल्या पद्धतीप्रमाणे गुंडांच्या टोळ्या मोकाट सुटल्या होत्या. बागेतली झाडे त्यांना कापायची होती, रोपट्याच्या कुंड्या

पळवायच्या होत्या.

पहाटे चार वाजता बागेत खूप मोठा आवाज झाला म्हणून आम्ही उठलो, घराबाहेर पडलो, आणि बागेतले दृश्य पाहून मनाला सुया टोचल्या. फळायला आलेल्या केळी कापल्या गेल्या होत्या, वयात आलेली पपयीची झाडे तोडली गेली होती. चार वर्षे अमृतासारखा मधुर रसास्वाद देऊन अंतरात्मा तृप्त करणारे, घाटदार पपयांनी नी छत्रचामरासारख्या पानांनी रथासारखे शोभणारे उभार पपयीचे आमचे लाडके झाड भुईसपाट झाले होते! वक्र गोलाकार अवयवांमुळे किंचित् स्थूल दिसणारी एकादी प्रौढा आपल्या चिल्लापिल्लांना बरोबर घेऊन राजरस्त्याच्या कडेला उभी असावी आणि एखाद्या बेलगाम ट्रक ड्रायव्हरने धडक देऊन तिला उभ्याची आडवी करावी, तसे ते दृश्य होते!

ते दृश्य पाहून मन एकदम व्यथित होऊन उठले. या पपयीचे बी एका पावसाळ्यात मी स्वत: पेरले होते. तिच्यांतून उगवलेल्या वाढत्या अंकुराचे लालनपालन केले होते. खाऊपिऊ घालून त्याला वाढवले होते. त्याच्या कोवळया लुसलुशीत पानांवरून हळुवारपणे हात फिरवला होता. तारुण्यांत येऊन पपयीला पहिले फूल फुलले तेव्हा आनंदाने वेडावलो होतो. पहिले फळ धरले तेव्हा सुखावलो होतो. पिकल्या पानांचे 'दांडारे' काढून नातवांना पिपाण्या करून दिल्या होत्या. आल्यागेल्या पाहुण्यांना तिच्या पिकल्या पपया खाऊ घातल्या होत्या, आणि जिभेवर पपयीच्या फोडी घिरघळत असतांना त्यांच्या तोंडून निघणाऱ्या स्तुतीच्या शब्दांनी तृप्त झालो होतो.

आणि पपयीचे ते झाड आज आडवे पडले होते. तिच्याकडे पाहाणेही मला शक्य होत नव्हते. तो सबंध दिवस मी बागेत फिरकलो नाही. पण कांहीही असले तरी तिची उत्तरक्रिया ही करायलाच हवी होती. छोट्या छोट्या फुलझाडांवर तिचे धुड पडले होते. दुसरे दिवशी बागेत गेलो आणि मन निष्ठुर करून तिचे तुकडे करायला लागलो.

रस्त्यावरून जाणाऱ्या आयाबाया क्षणभर थांबून बागेची नासाडी

केल्याबद्दल सांत्वनाचे शब्द बोलू लागल्या. एक बाई म्हणाली, ' कोहे हात येयले गे बाये ह्या देवचारांक ! झाडां आनी भुरगीं सारकींच. भुरग्यांच्या गोयार मुण कोण काती मारता खुंय ? '

हे उद्गार एका अशिक्षित बाईचे नव्हते ! ते होते एका मातृहृदयाचे ! निर्मितीच्या कळा जिने अनुभवल्या आहेत अशा नारीमनाचे ! माझ्या हृदयाला ते आरपार भेदून गेले.

अशा विषण्ण मनःस्थितींत दोन–तीन दिवस गेले. सकाळी उठल्याबरोबर बागेत फेरफटका करायचा माझा नेम; पण ते तीन दिवस मी बागेत फिरकलो नाही. चौथ्या दिवशी मी टेबलाशी बसलो असतांना माझा तीन वर्षांचा नातू धावत आला नि म्हणाला, ' आबा, आबा, बागेत यो. केयीक बाबू जाला, पोये. '

मी ताडकन् उठलो. ' केळीक बाबू जाला ? खंय रे शाण्या ? दाखव म्हाका. '

' बागेत यॉ. दाखयतां. '

नातवाबरोबर मी बागेत गेलो.

खरंच, केळीला बाबू झाला होता ! कापून टाकलेल्या एका केळीच्या मुळांतून कोवळा लुसलुशीत अंकुर डोके वर काढीत होता ! भूगर्भातून उघड्या जगात येण्याची धडपड करणाऱ्या त्या कोवळ्या अंकुराला पाहून माझ्या मनाची अस्वस्थता पार नाहीशी झाली. जुनाट हाडांत नवजीवनाने संचार केला. आम्ही दोघांनी त्या केळीच्या अंकुराचे मग किती कौतुक केले ! नातू आनंदाने नाचू लागला. मनाने मीही नातवाच्या पातळीवर गेलो.

आणि मग त्या बाईचे उद्गार मला एकदम आठवले... ' झाडां आनी भुरगीं सारकींच ! ' मुले आणि फुले हे समीकरण शेकडो वेळा मी साहित्यांत वापरलेले पाहिले होते; पण मुले आणि झाडे हा द्वंद्व समास मला नवीन होता. नवीन होता; पण मनाला भिडणारा होता. त्या विशिष्ट परिस्थितीत नि मनःस्थितीत झाडे आणि मुले यांच्यामधले साम्य मला नव्याने प्रतीत झाले होते. पहाटेचे तांबडे फुटल्यावर आणि सूर्योदयापूर्वी

मी अभावितपणे बागेत फेरफटका कां मारतो याचे उत्तर मला मिळाले होते. नातवंडांच्या सहवासांत माझे वय जसे मी हरवून बसतो, तसेच कांहीतरी वृक्षवल्लरीच्या सहवासांत घडत होते. सबंध दिवसाला पुरेल इतका उत्साह या बागेतल्या प्रभातफेरीत मला मिळत होता. संसारांतल्या तापलेल्या दुपारीचे चटके सुसह्य होण्याइतका तो उत्साह होता. भिवविणाऱ्या संध्याछायांची भीती दूर करणारा तो दिलासा होता.

हा दिलासा मिळाला तेव्हा मनाला कसे प्रसन्न वाटले! वस्तूच्या विनाशातच नव्या वस्तूच्या निर्मितीचे बीज असेल तर मग पपयी मोडली, केळ कापली म्हणून दुःख कां करावे? त्याऐवजी नवसर्जनांतला आनंदच कां मिळवू नये? बागेचा छंद लागल्यापासून अशा आनंदाच्या शेकडो क्षणांनी माझे जीवन समृद्ध झालेले नाही काय?

एकामागून एक आठवणी मनांत गर्दी करू लागल्या आहेत. घर उभारण्यासाठी मी पांच माड कापले; पण नंतर त्याच्या कितीतरी पटींनी अधिक 'कवाथे' रुजवले, वाढवले. कळंगूटची, बाणावलीची, सिंगापूरची रोपे मिळवतांना मनाला किती उत्साह वाटला! असोग्याहून आणलेल्या चिकूच्या कलमांपैकी एक मेले, तेव्हा दैववादाचा हवाला देऊन, झाडेसुद्धा लाभावी लागतात असे म्हणून मनाचे कसे सांत्वन केले! घाटावरची द्राक्षवेल आमच्या रेताड जमिनीत वाढेल का, दीड वर्षात तिला फळांचे घोस लोंबतील काय, ही फळे गोड निघतील की आंबट, अशा शंकाकुशंकांनी मन कसे हेलावून गेले होते! मला सीझनमध्ये फुलणाऱ्या आणि मग नाहीशा होणाऱ्या बिनवासाच्या बिलायती फुलांपेक्षा सुगंधाने परमळणारी गांवठी फुले अधिक आवडतात. विलायती फुलांमुळे बागेत रंगांचे इंद्रधनुष्य फुलते; पण सुगंधी गांवठी फुलांमुळे बागेचा नी घराचा देखील कोपरान् कोपरा सुगंधित होतो. जाई, जुई, चमेली, सायली आणि मोगरीच्या मंद, मदिर वासाने मन कसे ताजेतवाने होते! सोनचाफ्याचा उग्र वास माणसाच्या चित्तवृत्ती कशा धुंद करतो! आणि रातराणी! रातराणीचा मादक गंध रात्रीच्या पूर्वप्रहरी वातावरणांत दरवळू लागला म्हणजे तरुणपणातल्या त्या धुंद रात्रींच्या आठवणींनी मन कसे उत्तेजित होते! आणि

मग मन भरकटत जाते ते थेट प्राचीन काळांतल्या राजांच्या उपवनांत. तिथल्या वसंतोत्सवांत. अशोक वृक्षावर डाव्या पायाची लाथ मारणारी नवयौवना आणि बकुळीच्या झाडावर मद्याची चूळ फेकणारी राजललना दृष्टीपुढे साक्षात् उभ्या राहातात !

तरुणीच्या पदाघाताने किंवा मद्याच्या चुळीने वृक्ष फुलतात, हा कविसंकेत असला तरी आपल्या प्राचीन भारतांत सुगंधी झाडां-वेलींनी भरलेली राजोद्याने होती यात शंकाच नाही. इतिहासकाळी मोगल बादशहांना तर उपवने व पुष्पवाटिका निर्माण करण्याचा भलताच शौक होता. आजच्या आपल्या केंद्र सरकारनेही इंग्रजांनी चालविलेला मोगलांचा वारसा मोगल गार्डनच्या रूपाने जतन करून ठेवला आहे. दिल्लीच्या राष्ट्रपती भवनालगतचे मोगल गार्डन पाहावे आणि पृथ्वीवर नंदनवन अवतरले म्हणून खुशाल कुणालाही सांगावे !

पण अशी नंदनवने किंवा तुमच्याआमच्या घराशेजारच्या बागा निर्माण करणे हे एका दिवसाचे, महिन्याचे व वर्षाचेही काम नाही. निसर्गतःच विविध झाडां-वेलींच्या प्रवृत्ती-निवृत्ती, आवडीनिवडी आणि विकास-विनाश इतक्या वेगवेगळ्या असतात की, आज झाडे लावली आणि ठराविक काळाने ती एकदम फुल्-फळू लागली असे होत नाही. भोपळा, काकडी, शिराळी, घोसाळी या फळभाज्यांचा सारा संसार चार महिन्यांत आटोपतो. केळ एक वीत देऊन मरते, माड पन्नास वर्षे फळे देत राहातो. अक्रोडाचे झाड आजोबाने लावले तर नातवाला फळ दिसते. कांही झाडे हवेत वाढतात, तर कांही पाण्यात. कांही फळे देतात तर कांही कंद. कांही झाडे ठराविक ऋतूंतच मोहरतात तर कांही दररोज फुलतात. व्यक्ती तितक्या प्रकृती ही म्हण माणसांच्या बाबतीत तितकीच वृक्षविश्वा· बाबतही खरी ठरते.

अशा विविध व्यक्तित्वाची, वयाची, स्वभावाची झाडे-वेली असलेली बाग पाहिली की, मला जुन्या काळात होणाऱ्या लग्नसमारंभाची आठवण होते. एकाद्या गर्भश्रीमंत कुटुंबांत लग्न निघाले म्हणजे सोयरी–

धायरी, पावणे-रावळे यायला सुरुवात होई. विविध स्वभावाच्या, प्रकृतीच्या, वयाच्या, आवडीनिवडीच्या या पाहुण्यांची सरबराई करणे यजमानांना दिव्य वाटे. तसाच अनुभव बागेच्या मालकाला किंवा माळ्याला येतो. गुलाब हे राजस झाड. त्याला चहा लागतो. शेणखत हे तर त्याचे अन्न. चिकूला पेंडखत हवे असते. द्राक्षवेल बोनमिल मागते. कुणाला यूरिया, तर कुणाला फॉस्फेट हवा. माड म्हणतो मला चिखल आणि मीठ द्या. कंपोस्ट तर प्रत्येकालाच हवे. कुणाची प्रकृती इतकी नाजूक की, त्याला वारा सोसत नाही, तर कुणी वाऱ्याशिवाय जगत नाही. कुणाला पाणी थोडे हवे, तर कुणाला भरपूर. कुणी आजारी म्हणून त्याला औषधे पाजायला हवी. एक ना दोन, प्रत्येकाची उस्तवारी करता करता नाकी नऊ येतात. पण बागेतल्या या सोयऱ्यांचे मन राजी ठेवायचे तर हे करायलाच हवे.

बागेतल्या या वृक्षवल्लरींच्या फुलायच्या तऱ्हा नी वेळा तरी किती विविध ! सदाफुली, जास्वंदी या बारा महिने, तीस दिवस सारख्या फुलत असतात, आणि म्हणून अतिपरिचयात अवज्ञा अशी त्यांची स्थिती होते. अरुणोदयापासून सूर्य कासराभर वर येईपर्यंतच्या काळात एकेक पाकळी मोकळी करीत उमलणे ही बहुसंख्य फुलझाडांची रीत. पण कांही झाडे सकाळच्या पारी मुग्ध असतात. शब्दुली, मोगरी, जाई, जुई, सायली संध्याकाळी उमलतात. फक्त संध्याकाळी असे मोघम विधान इथे चालणार नाही. ठरलेल्या तासाला नी मिनिटालाच त्यांच्या पाकळ्यांचे ओठ हलू लागतात. शब्दुली पांचच्या ठोक्याला उमलते. घोसाळी फुलू लागली की, समजावे की, सहा वाजले आहेत. रातराणी सातला सुगंध सोडू लागते. आणि कृष्णकमळीच्या फुलांचे बोंगे सकाळी अकराला तोंडे उघडू लागतात. जमिनीवर पसरणारी, लाल गुलाबासारखी फुले येणारी एक विलायती वल्लरी तर सकाळी दहा वाजता फुलांनी बहरून येते. दहा वाजता फुलते म्हणून तिचे नांवच पडले आहे टेनऑक्लॉक.

पण मानवजातीच्या या वनसोयऱ्यांची खरी मिजास पाहायची असेल तर तुमच्या बागेच्या बंदिस्त जागेतून तुम्ही बाहेर पडले पाहिजे. कारवार

जिल्ह्यांतल्या निबिड जंगलांत तुम्ही कधी गेला आहांत काय? बागेतल्या झाडांना हवापाणी मानवेल की नाही, जमीन किती खणावी, खत किती द्यावे याची आपण काळजी करतो. पण रानावनांत जे प्रचंड वृक्ष वाढतात त्यांची देखभाल कोण करतो? एखाद्या ओसाड माळावर एखादा वटवृक्ष शेदोनशे वर्षे आपला प्रचंड विस्तार सावरीत उभा असतो. शहरांतल्या एखाद्या हमरस्त्यावर दोन्ही बाजूंनी हारीने उभी असलेली गुलमोहरची आणि कॅशियाची झाडे बहरतात तेव्हाचे दृश्य म्हणजे एक चमत्कार वाटतो. गांवांतल्या कुंपणाच्या एखाद्या कोपऱ्यावर पांगारा फुलतो तेव्हा मंदिरा-समोरच्या प्रज्वलित दीपमाळेची आठवण येते. गर्द हिरव्या वृक्षराजींनी भरलेल्या एखाद्या जंगलांत सफेत तुळतुळीत अंगाचा अर्जुन वृक्ष दिसला म्हणजे काळ्यासावळ्या लोकांच्या जमावांत एखाद्या फिकट पांढऱ्या वर्णाचा, शिडशिडीत बांध्याचा हिप्पी घुसल्यासारखे वाटते! पणजीच्या कांपालवर अलीकडेच सुरूची झाडे लावली आहेत. त्यांची उंची खूपशी वाढेपर्यंत थांबा; आणि मग पाहा. संध्याकाळच्या वेळी मांडवीवरून येणारा खारा वारा सुरूच्या बनात घुसू लागेल तेव्हा सनईचे सूर घुमल्या-सारखे वाटेल. अशा या वृक्षवल्लरींच्या दर्शनाने मन तृप्त झाले, कान सुखावले, त्यांच्या फुलांच्या सुगंधाने मनाला धुंदी चढली, फळांनी जीभ पाणावली म्हणजे वाटू लागते, खरेच ही झाडे-वेली म्हणजे माणसाचे मित्र आहेत, सगेसोयरे आहेत! प्रत्यक्ष खरेखुरे सोयरे तरी तुम्हाला याहून अधिक काय देतात?

# ३ : मी मंत्री असतों तर !

लहानपणी पुरेसा समज यायच्या पूर्वी कुणी कौतुकाने मला विचारत, 'बाळ, तू कोण होणार आहेस?' मी ताडकन् उत्तर द्यायचो, 'मी ड्रायव्हर होणार आहे.' माझ्या लहानपणी मोटार ही चीज नवीनच आली होती. बैल किंवा घोडा नसताना फक्त हातातले चाक फिरवून गाडी चालविणारा अजब मोटारड्रायव्हर हा आम्हां मुलांचा आदर्श होता.

त्यानंतर वय वाढलं तसातसा हा आदर्श बदलत गेला. ड्रायव्हरची जागा डॉक्टरने घेतली. पुढे डॉक्टरच्या जागी लेखक आला. नंतर लेखकापेक्षा संपादक बरा वाटू लागला.

अशा अनेक आदर्शांपैकी कांही आदर्शांपर्यंत हात पोचले. कांही आदर्श आदर्शच राहिले. आता साठी उलटली आहे. 'बाळ, तुला कोण व्हावंसं वाटतं?' असा प्रश्न आजच्या बाळांना विचारण्याचा अधिकार मला प्राप्त झाला आहे.

परवां हा प्रश्न माझ्या सहा वर्षांच्या नातवाला मी विचारला, तेव्हां त्यानं दिलेलं उत्तर ऐकून मी थक्क झालों. तो म्हणाला, 'मी मंत्री होणार आहे.'

मी म्हटलं, 'होशील बाबा, होशील. आजच्या लोकशाहीच्या प्रचंड लाटेवर कोण, केव्हां, कसा उचलला जाईल — आणि आपटलाही जाईल — हें सांगणं मोठं कठीण आहे.

माझा नातू मंत्री होईलही; पण त्याला पुष्कळ काळ जायला हवा. मला मात्र हाच नसला तरी असाच एक प्रश्न पणजी आकाशवाणीने विचारला, 'तुम्ही मंत्री असतां तर!...'

अंधारांतून सुसाट वेगानं बाण यावा आणि थेट काळजाला भिडावा तसं मला झालं. अरेच्या! ही मंत्री होण्याची कल्पना आपल्या डोक्यांत यापूर्वीच कधी कशी आली नाही? किती मजा आली असती मी मंत्री असतो तर! राहायला भलामोठा आलीशान, सुंदर बंगला. भोवती नाना प्रकारच्या फुलझाडांनी भरलेले आवार. आवाराच्या गेटवर पोलिसांचा पाहारा. पोर्चमध्ये एक आणि गॅरेजमध्ये एक अशा इंपोर्टेड कार्स! ड्राय-व्हिंग व्हीलवर बसलेला इस्त्रीच्या सफेत कपड्यांतला ड्रायव्हर! गेटवर साईनबोर्ड नसला तरीसुद्धा या भपक्यावरूनच कुणालाही कळावे, 'इथे मंत्री राहातात.'

आणखी एक विचार मनांत आला. मी मंत्री असतो तर! तर मी काय केलं असतं? लोकांनी काय केलं असतं? दोन वर्षांपूर्वी माझी साठी उलटली. माझ्या कांही मित्रमंडळींनी आणि चाहत्यांनी मुंबईत आणि गोव्यांत साठीनिमित्त माझा जाहीर सत्कार करायची टुम काढली. मी या कल्पनेला विरोध केला. माझ्या विरोधाची कारणे माझ्या मित्रांनी समजावून घेतली. साठीचे सत्कार मोठ्या माणसांचे करावे, जीवनांत यशस्वी झालेल्या नेत्यांचे करावे, आदर्श व्यक्तींचे करावे. अल्पयशी व्यक्तींचे आदर्श समाजापुढे ठेवू नयेत.

माझ्या मित्रांनी मग ही सत्काराची कल्पना सोडून दिली.

पण मी मंत्री असतो तर! जनतेच्या आग्रहापुढे मला हार खावी लागली असती. मी मोठा नाही, मी यशस्वी नाही, मी आदर्श नाही ही माझी नकारघंटा कुणी ऐकून घेतली नसती. मंत्री असूनही मोठा नसणे, यशस्वी नसणे, आदर्श नसणे हा विरोधाभास ठरला असता. साठीच्या सत्काराला मी विरोध केला असता तर माझ्या चाहत्यांनी सत्कारसमारंभांत करावयाच्या भाषणांची तयारी फुकट गेली असती. लेखक-संपादकांनी तयार केलेले स्तुतिपर लेख रद्दीत गेले असते. माझी रसिकता, माझे वाचन, माझे

वक्तृत्व, माझे दातृत्व, माझे कर्तृत्व अशा गुणांवर एकेक सर्ग लिहून थोर कवींनी रचलेली महाकाव्ये प्रकाशांत आली नसती. व्यापाऱ्यांनी आणि उद्योगपतींनी सत्कारसमारंभांसाठी द्यावयाच्या देणग्यांचे चेक फाडण्याचा प्रसंग न आल्यामुळे त्यांच्या कोमळ मनाला फार दुःख झाले असते. नाना प्रकारच्या भेट-वस्तूंनी घर भरून गेल्यामुळे आणि माझ्याबरोबर आपलीही छबी वृत्तपत्रांत छापून आल्यामुळे सौभाग्यवतीला जो आनंद झाला असता त्यापासून तिला वंचित करावे लागले असते. इतक्या लोकांची मने दुखवून सत्कारसमारंभाला नकार देणे मला शक्यच होणार नव्हते.

आणि आयुष्यांतला हा महान सत्कारसमारंभ होऊन गेल्यावर पहिला माणूस मारल्यावर वाघ जसा माणसाच्या रक्ताला चटावतो तसा मी सत्कारसमारंभांना चटावलो असतो. अध्यात्मावरील प्रवचनांची, धर्म-परिषदांच्या अध्यक्षपदांची, नाटकांच्या उद्घाटनांची, पुस्तकांच्या प्रकाश-नांची, पुतळ्यांच्या अनावरणाची, सायन्स कॉन्फरन्स, हिस्टॉरिकल कॉन्फ-रन्स, मेडिकल कॉन्फरन्स यांच्या प्रमुख पाहुणेपदाची, रस्ते, विहिरी, पूल, इमारती, प्रदर्शने, ताव्हेनें, हेअर कटिंग सलून्स खुली करण्याची आमंत्रणे मला आली असती. आपण होऊन आली नसती तर आणायची व्यवस्था करतां आली असती. अशी आमंत्रणे आली नसती तर माझ्या पुढ्यांतल्या वर्तमानपत्रांतून माझ्या फोटोंसह माझ्या भाषणांचे वृत्तांत आले नसते. असे वृत्तांत वाचणे आणि माझे निरनिराळ्या पोझेसमधले फोटो पाहाणे हा माझा छंद झाला असता. कांही दिवस वृत्तपत्रांतून माझे नांव आले नाही तर माझा जीव कासावीस झाला असता आणि त्या दिवशी मी पत्रकारांना बोलावून मुलाखत दिली असती. ही मुलाखत विरोधी पत्रांतून सुद्धा छापून येणारच होती. कारण मुलाखतीचे वार्ताहरांसह अस्मादिकांचे फोटो घेतले गेले असते आणि त्या फोटोंत विरोधी पत्राच्या रिपोर्टराचा किंवा संपादकाचाही फोटो आला असता !

मी मंत्री झालो असतो तर माझा आणखी एक फायदा होणार होता. पैशाचा खर्च न करतां मला देश-विदेशचे दौरे करतां आले असते. कामानिमित्त दिल्लीला तर वारंवार जावे लागले असते. अशोक हॉटेलमध्ये

एक सूट नेहमीच राखून ठेवावा लागला असता.

आपल्या भारतांत अखिल भारतीय मंत्रीपरिषदा भरत असतात. पर्यटन मंत्र्यांच्या परिषदा, मुख्य मंत्र्यांच्या परिषदा, उद्योग मंत्र्यांच्या परिषदा, वन मंत्र्यांच्या परिषदा! जितके मंत्र्यांचे प्रकार तितक्या प्रकारच्या परिषदा. अशा परिषदांना दिल्ली नेहमीच मानवते असं नाही. दिल्ली उन्हाळ्यांत उकडते तर हिवाळ्यांत काकडते. ही विषम हवा मंत्रीपरिषदांना चालत नाही. म्हणून उन्हाळ्यांत सिमला, श्रीनगर, दार्जीलिंग, उटी अशा ठिकाणी अखिल भारतीय मंत्री परिषदा भरतात. अशा परिषदांना मी न चुकतां सहकुटुंब हजर राहिलो असतो. माझ्याकडे असलेल्या खात्याच्या विशेष अभ्यासासाठी किंवा एकाद्या स्थानिक शिंप्याने युरोप-अमेरिकेंत खरेदी केलेल्या कपड्यांना बटनें लावायचे ऑटोमॅटिक मशीन बोटीवर चढवायच्या समारंभासाठी किंवा एकाद्या उद्योगपतीने खरेदी केलेली बोट समुद्रांत लोटण्यासाठी परदेशचे दौरे केले असते. या दौऱ्यांतच माझ्या खात्यांतील एकद्या प्रकल्पासाठी परदेशी भांडवलाची मदत मिळेल का याविषयी तिथल्या उद्योगपतींशी बोलणी केली असती आणि या बोलण्याची वार्ता साऱ्या भारतांतील वृत्तपत्रांतून प्रसिद्ध होईल अशी व्यवस्था केली असती. त्यामुळे एकाद्या राज्यांतील मंत्र्याला परदेशांत अशा वाटाघाटी करतां येतात का असा प्रश्न पार्लमेंटमध्ये उपस्थित झाला असता किंवा उपस्थित करण्याची व्यवस्था मी केली असती. कारण त्यामुळे मला एकदम अखिल भारतीय प्रसिद्धी मिळाली असती. अशी अखिल भारतीय प्रसिद्धी मिळवून प्रथम दिल्लीचे लक्ष माझ्याकडे ओढून घेणे, नंतर पार्लमेंटमध्ये निवडून येणे आणि पुढे केंद्रीय मंत्री होणे ही माझी अंतिम महत्त्वाकांक्षा साध्य होणार होती. राज्यांतले मंत्रीपद म्हणजे हे साध्य गांठायची एक शिडी ठरणार होती.

पण हे सारे विचारतरंग उठत असतांनाच मनांत एक शंका येते. माझा स्वभाव लक्षांत घेतला तर मी हे सारे करू शकलो असतो का? वृत्तपत्रांतल्या निर्दय, कठोर टीकेकडे, विरोधकांच्या प्रखर आक्षेपांकडे आणि राजकारणांत पैदा केलेल्या शत्रूंच्या आणि कालपरवांपर्यंतच्या

मित्रांच्या मर्माघाती आरोपांकडे दुर्लक्ष करून मी हे करू शकेन का ! त्यांना उत्तरे देऊन निरुत्तर करण्याइतकी माझी भूमिका शुद्ध असेल का ! खुद्द माझ्या मनाला फसवण्याइतका मी मुर्दाड बनू शकेन का ?

मनाला फसवण्याच्या गोष्टी सोडून द्या. मनाप्रमाणे वागायला तरी मी मोकळा असतो काय ? हिवाळ्यांत सकाळच्या पारी ताज्या भाजीपाल्याच्या राशी पडलेल्या मंडईत जाऊन भाजी खरेदी करण्यांत मला आनंद वाटतो. पावसाळ्याच्या दिवसांत बाहेर पाऊस बरसत असतांना भाजलेले गरम गरम चणेदाणे खाण्यांत मला मौज वाटते. उन्हाळ्याच्या दिवसांत रानातल्या 'भाटी'वर जाऊन काजूचा नीरा पानाच्या द्रोणांतून घटाघट पिण्यांतले सुख मला माहीत असते. पण मंत्री झाल्यावर असल्या गोष्टी मी करू शकलो असतो काय ? आवडीच्या हॉटेलच्या दारांत गाडी उभी करून टेसदार भजी विकत घेणारा किंवा नामदेव न्हाव्याच्या सलुनांत पूर्वीप्रमाणे केस कापायला जाणारा काकासाहेब गाडगीळांसारखा मंत्री विरळाच. त्यांचे अनुकरण करणे मला शक्य झाले असते काय ? माणसे गोळा करून गप्पा छाटायची मला हौस आहे; पण शास्त्री, गोविंद वल्लभ पंत किंवा रफीअहमद किडवाई यांच्यासारखा बंगल्याची चावडी करून सामान्यांचा दरबार भरविणे मला जमले असते काय ? मंत्रीपदाची प्रतिष्ठा आणि घाईगर्दीचे जीवन यांच्या बंधनांमुळे माझे मन तडफडले नसते काय ?

धांवपळीच्या जीवनांत एकादा शांत, निवांत क्षण गवसला आणि अंतर्मुख होऊन मी विचार करू शकलो तर ! अशा वेळी मन आक्रंदन करून उठले तर ! कशासाठी, कशासाठी हे सारे करतो आहेस ? असा प्रश्न त्याने केला तर ! व्हाईटहाऊसमधला अध्यक्ष चार वर्षांच्या मुदतीसाठीच तिथे राहायला जातो. १० डाऊनिंग स्ट्रिटमधला प्रधानमंत्री वाटेल त्या क्षणी जागा खाली करायला सिद्ध असतो. युरोपांतल्या एका समाजवादी देशांतला मंत्रीगण मंत्री नसतांनाच्या सवईप्रमाणे सायकलवरून किंवा बसमधून सचिवालयांत जातो. दुसऱ्या एका देशाचा मंत्री परदेशी पाहुण्यांना स्वत: कॉफी बनवून देतो. आणि प्रगत देशांतले हे सारेच मंत्री

travel only if you must ह्या युद्धकाळांतल्या घोषणेचे अनुकरण करून सोळा सोळा तास आपल्या ऑफिसांत बसून फायलींच्या ढिगाऱ्यांत स्वतःला गाडून घेतात. या पाश्चात्य मंत्र्यांचे अनुकरण करणे हे आपले कर्तव्य नव्हते काय? ज्या समाजवादी समाजरचनेच्या घोषणा देऊन मी निवडून आलो तो समाजवाद कृतीत आणण्याचा प्रारंभ स्वतःपासूनच करणे योग्य ठरले नसते काय? बेकारांना काम, गरीबांना दाम आणि श्रीमंतांना घाम देण्याची थोडी तरी जबाबदारी माझ्यावर नाही काय? अधिक धान्य पिकवा, भाजीपाला लावा, उत्पादन वाढवा, प्रजोत्पादन घटवा असा संदेश मी जनतेला देत आलो असतो; पण हा संदेश काय फक्त जनतेनेच पाळायचा? मंत्र्यांनी नाही? माझ्या बंगल्या पाठीमागच्या आवारांत मी कितीसा भाजीपाला पिकवला असता? माझ्या गांवाकडल्या शेतीवाडीत संकरित पिकाचा कितीसा प्रयोग केला असता? पांच मुलांच्या जन्मानंतर तरी फॅमिली प्लॅनिंगच्या केंद्रांत मी जातीने गेलो असतो काय?... एक दोन नव्हे, डझनावारी प्रश्न! या प्रश्नचिन्हांच्या गुंतवळ्यांत मी चक्रावून जातो.

पण विचारांचा प्रवाह एकदम पलट खातो. हे सारे मी करायला हवे. करायलाच हवे! पण मी तरी काय करू? मंत्री झाल्यापासून मंत्री नांवाच्या एका नव्या जातीत मी प्रवेश केला आहे. मंत्रीजीवनाच्या एका उसळत्या, वाहत्या, बेगवान प्रवाहांत मी सांपडलो आहे. इतर मंत्री वागतात तसेच मला वागायला हवे. ते करतात तेच करायला हवे. प्रवाहाच्या विरुद्ध पोहणारा मंत्री अखेर भोवऱ्याचे भक्ष्य ठरणार!

मग काय? हे सारे सोडून द्यायचे? एक साधासुधा सामान्य नागरिक म्हणून जगायचे?

छे छे! केवढा हा भयंकर विचार! प्रवाहांत एकदा उडी टाकल्यावर अखेरची तड गांठलीच पाहिजे. मी नको म्हटले, परत फिरायचे म्हटले तरी माझे मित्र, चाहते मला थोडेच परत फिरायला देणार! 'तुझे आहे तुजपाशी 'मधल्या त्या आचार्यांप्रमाणे हे माझे हितचिंतक काठ्या ढोसून

ढोसून मला पोहायला लावणार! त्यांचेही बरोबर आहे. मंत्र्यांचे मित्र म्हणून त्यांना समाजांत मान मिळतो. आपल्या नात्यागोत्याच्या माणसांना मंत्री–कृपाप्रसादाची खिरापत वांटता येते. वेळीअवेळी फोन उचलून 'तूच बोलतो आहेस काय?' असा मंत्र्याचा एकवचनी उल्लेख करून ऐकणाऱ्यांत भाव खाता येतो.

मित्रांचे एक सोडून द्या. आम जनतेचे काय? या निराकार, निर्गुण, जनतेसाठीच तर मंत्रीपदाचा हा काटेरी मुकुट मी शिरी धारण केला! त्याचे काटे बोचतात म्हणून तो फेकून द्यायचा?... हो, मी सत्कार घेतले असते, उद्घाटने केली असती, अध्यक्षपदे भूषविली असती; पण हे सारे जनतासंपर्कासाठी. जनतेची दुःखे समजावून घ्यावी म्हणून. जनतेत मिसळतां यावे म्हणून. मंत्र्याने एकाद्या जन्तेच्या खांद्यावर हात ठेवून बातचीत केली तर त्या जन्तेला किती आनंद वाटतो! सभासमारंभांत गळ्यांत पडलेले हार बालगोपालांच्या अंगावर फेकले म्हणजे त्यांचे इवलाले डोळे कसे लुकलुकतात! स्पर्धेत विजयी झालेल्या स्पर्धकांना सौ. च्या हातून बक्षिसे वांटली गेली म्हणजे ती घेणाऱ्यांना आणि देणारीला किती अभिमान वाटतो! हा दुहेरी अभिमान कॅमेऱ्याच्या डोळ्याने टिपला म्हणजे तर पाहायलाच नको! अभिमानांत आनंदाची भर! हा अभिमान, हा आनंद मी हिरावून घेऊ शकलो असतो काय? केवळ माझे मन तडफडते म्हणून? समाजवादी समाजरचनेचे गुलबकावलीचे फूल हातांत येत नाही म्हणून? शत्रूमित्रांनी चालविलेल्या चारित्र्यहननाच्या प्रयत्नांनी मन रक्तबंबाळ होते म्हणून?

नाही, नाही. हे चालणार नाही. माणूस म्हणून मी जन्माला आलो; पण मंत्री म्हणून माझा पुनर्जन्म झाला. आतां तिसरा जन्म नाही. मरायचे ते मंत्री म्हणूनच. आजच्यापेक्षांही मोठा मंत्री म्हणून. आज मंत्री, उद्यां मंत्री, अखेरपर्यंत मंत्री!

● ●

# ४ : पंचकन्या स्मरेन्नित्यम्

लहानपणी प्रात स्मरण व सायंस्मरणासाठी कांही सुभाषिते व स्तोत्रे गुरुजींनी पाठ करवून घेतली होती. कराग्रे वसते लक्ष्मी, याकुंदेंदुतुषार हार धवला, शुभंकरोती कल्याणम् असे कांही श्लोक आजही सहजपणे जिभेवर खेळत असतात. यांतलाच एक श्लोक अहिल्या, द्रौपदी, सीता वगैरे पंचकन्यांना वंदन करणारा. या स्त्री पंचकाचे स्मरण प्रातःकाळी करायचे असते. संवय म्हणून हा श्लोक मी लहानपणी म्हणत होतो. पुढे ही संवय कशी व केव्हा सुटली हे कळलेही नाही.

वयाने वाढलो होतो आणि स्तोत्रे विसरून गेलो नव्हतो तेव्हां, मनापुढे एक प्रश्न उभा राहात होता. लक्ष्मी, सरस्वती, पार्वती या आपल्या देवता आहेत. त्यांना वंदन करणे हे योग्यच; पण अहिल्या, द्रौपदी, सीता, तारा आणि मंदोदरी या देवता आहेत का? छे! या तर पौराणिक कालांतील मानवी स्त्रिया! त्या प्रातःस्मरणीय कशा?

कुणा देवादिकांच्या वा वीरपुरुषांच्या त्या प्रेयसी वा प्रेमिका आहेत का? लक्ष्मीने रुक्मिणीचा अवतार घेऊन विष्णुरूपी कृष्णाला वरले तशा या मानवरूपधारिणी देवता आहेत का? छे! हेही बरे नव्हे. दमयंती, शकुंतला, रुक्मिणी, सुभद्रा या खऱ्या प्रेमिका. आपला जोडीदार मिळबिण्यासाठी त्यांनी किती सोसले! बिचारी कन्याकुमारी! शिवाच्या प्राप्तीसाठी आज कित्येक शतके हातात वरमाला घेऊन तिष्ठत उभी आहे!

बरे, अहिल्या, द्रौपदी, सीता वगैरे पंचकन्या महान विदुषी होत्या का ? गार्गी, मैत्रेयी, मंडनमिश्राची भार्या सरस्वती यांच्यासारख्या त्या ब्रह्मवादिनी तरी होत्या काय ? जनकाच्या राजसभेत गार्गीने याज्ञवल्क्याशी वाद केला, तिची भाची मैत्रेयी खुद्द याज्ञवल्क्याशी लग्न करूनही विरक्त राहिली, सरस्वतीने मंडनमिश्राच्या बरोबरीने आद्य शंकराचार्यांच्या अद्वैत-वादाला आव्हान दिले तसे कांही या पंचकाच्या जीवनात घडलेले दिसत नाही.

आणि तरीही या पंचकन्यांना जनमानसात एक खास स्थान आहे. त्यांच्याविषयी अतीव आदर आहे. तो का ? आदर्श पतिव्रता म्हणून का ? होय, असेच असावे. हिन्दू स्त्रीचा पातिव्रत्य हा पहिला आणि मोठा गुण, म्हणूनच त्यांना स्तोत्रकारांनी प्रातःस्मरणीय व्यक्तीत स्थान दिले आहे.

पण शंकेखोर मनाचे समाधान होत नाही. थोडासा विचार केला तर ही पंचकन्यांची यादी अपुरी वाटते आणि चुकीचीही वाटते. हिंदू स्त्रियांसमोर आदर्श पातिव्रत्याचे प्रतीक म्हणून जी सावित्री सतत उभी असते, यमधर्माला कोंडीत पकडून जिने पतीचे प्राण परत मिळविले, सीतेच्या जोडीने सीता-सावित्री असा द्वंद्व समास रूढ झाला आहे. आजचाच पती जन्मोजन्मी लाभावा म्हणून वटसावित्रीचे एकमेव व्रत हिंदू स्त्रिया करीत असतात त्या सावित्रीचे नांव या पंचकन्यांच्या यादीत मुळीच नाही ! अहिल्या, द्रौपदी, सीता, तारा आणि मंदोदरी ! यांतली पहिली आणि अग्रगण्य म्हणून मानली गेलेली अहिल्या ही खरीच पतिव्रता होती काय ? तिने अगदी जाणून बुजून गौतमाचे रूप घेऊन आलेल्या इंद्राशी व्यभिचार केला नव्हता काय ?

पांचही पतींवर सारखे प्रेम करीन असे सासूला वचन देऊनही द्रौपदीने अर्जुनावरच अधिक प्रेम केले नाही काय ? धर्मराजाचा तिने प्रत्येक अडचणीच्या वेळी पाणउतारा केला. भीम तिला आवडत असे तो बलदंड म्हणून. नकुल-सहदेव तर तिच्या खिजगणतीतही नव्हते. तिचे खरेखुरे प्रेम होते ते अर्जुनावर. तो तीर्थाटनाला गेला तेव्हा ती सैरभैर झाली

होती. सुभद्रेला घेऊन तो परत आला तेव्हा तिचा सवतीमत्सर जागा झाला होता.

आणि सीता. अनेक स्त्रियांशी लग्न करण्याची प्रथा रूढ होती त्या काळात रामाने एकपत्नीत्वाचे व्रत निष्ठेने पाळले. सीतेनेही आपला पतिव्रताधर्म अनेक संकटे येऊनही निष्ठेने पाळला. रावणाच्या बंदीत असल्यामुळे तिच्या पातिव्रत्याबद्दल लोकांनी शंका घेऊ नये म्हणून रामाने तिला अग्निदिव्य करायला लावले. आणि तरीही लोकांची तोंडे तो धरू शकला नाही. एका रजकाच्या कुत्सित बोलण्यामुळे रामाला सीतेचा त्याग करावा लागला. सीता पतिव्रता होती हे तर खरेच, पण मनाला शंका चाटून जाते. रावण भिक्षा मागायला आला तेव्हां तिने लक्ष्मणरेषेच्या बाहेर पाऊल टाकले ते का? चुकून की मुद्दाम? रावणाने आपले हरण करावे अशीच तिची इच्छा होती काय?

तारामतीच्या बाबतीत मात्र अशा कांही शंका कुशंका काढणे कठीण आहे. सीतेसारखीच ती पतिपरायण होती. हरिश्चंद्राला प्रत्येक सुखदुःखात तिने साथ दिली. आदर्श पातिव्रत्याचा तारामती हा एक नमुना होय. मंदोदरी होती तारेसारखीच पतिव्रता. सीतेचा मोह धरू नका, असे तिने रावणाला परोपरीने विनविले; पण त्याने तिच्या विनवणीला भीक घातली नाही. बिचारी मंदोदरी पतीला सुबुद्धी सुचावी म्हणून परमेश्वराची प्रार्थना करू लागली.

पण तरीसुद्धा प्रातःस्मरणीय पंचकन्यात त्या केवळ पतिव्रता होत्या म्हणून श्लोककर्त्याने त्यांचा समावेश केला असे मला वाटत नाही. या पांच स्त्रियांची नांवे एकत्र गुंफण्यात त्याचा कांही वेगळा हेतू असला पाहिजे. ही पांच स्त्रीरत्ने एकत्र आणून कुणा श्लोककर्त्या महाभागाने भारतीय आदर्श स्त्रीची प्रतिमा आपल्यासमोर उभी केली असली पाहिजे. त्यांच्या चरित्रावर उलट्या क्रमाने आपण थोडी नजर टाकू. म्हणजे मला काय म्हणायचे आहे ते वाचकांच्या लक्षात येईल.

रावणाची पट्टराणी मंदोदरी ही मयासुराला रंभेपासून झालेली कन्या. ती साध्वी होती. पतिव्रता होती. सीतेवर रावणाने अत्याचार करू नये, तिची अभिलाषा धरू नये म्हणून तिने खूप प्रयत्न केले. रामायणात तिच्या व्यक्तिचित्रणावर फारसा भर दिलेला नाही. वाल्मीकीने रामायण लिहिले तसे एखाद्या द्रविड वाल्मिकनने रावणायण रचले असते तर मंदोदरीच त्या महाकाव्याची नायिका झाली असती; पण तसे काव्य निर्माण झाले नाही आणि महासाध्वी मंदोदरी उपेक्षित राहिली. तरीही रामायण आणि स्कंदपुराण यांच्यावरून एक गोष्ट आपल्या लक्षांत येते की, पतीच्या हातून चूक आणि पाप होऊ नये म्हणून मंदोदरी कमालीची जागरूक राहिली. रावणाला जी गोष्ट माहीत नव्हती ती मंदोदरीला माहीत होती. सीता तिची कौमार्यावस्थेत जन्माला आलेली कन्या होती. सीतेला रावणाने भ्रष्ट केले असते तर ते महापाप ठरले असते. या पापापासून मंदोदरीने रावणाला वांचविले. पतीला कर्तव्याकर्तव्याचा उपदेश करून त्याला सन्मार्गावर ठेवण्याचे पत्नीचे कर्तव्य तिने चोखपणे बजावले. पुरुष वहावत जात असला तर त्याला प्रेमबंधनाने बांधून ठेवण्याची भारतीय स्त्रीची परंपरा मंदोदरीने सुरू केली असे म्हटले तर ते चुकीचे ठरेल काय? उपेक्षित उर्मिलेप्रमाणेच उपेक्षित मंदोदरीचे चरित्र आणि चारित्र्य हे आपल्या ललित साहित्यकारांना चित्रित करतां येण्यासारखा एक विषय आहे.

तारामतीने मंदोदरीहून एक वेगळा आदर्श घालून दिला. शैब्य देशाच्या राजाची तारामती ही कन्या आणि अयोध्याधीश हरिश्चंद्राची पट्टराणी. लाडात आणि ऐश्वर्यात वाढलेली; पण तिच्या नशिबी किती भोग आले! विश्वामित्राला स्वप्नांत दिलेल्या राज्यदानावर दक्षिणा देण्यासाठी प्रथम त्याने बायको-मुलाला एका ब्राह्मणाला विकून टाकले आणि स्वतःलाही एका चांडाळाला विकून घेतले. स्वप्नांतले वचन सत्य करणारा हा अव्यवहारी राजा! पण सत्यवचनी रघुकुलात सून म्हणून आलेल्या तारामतीने हरिश्चंद्राला एका शब्दानेही विरोध केला नाही. अर्थ आणि काम यांच्या प्रमाणेच धर्माच्या पालनातही सहभागी होईन अशी शपथच मुळी तिने लग्नाच्या वेळी घेतली होती! नवऱ्याचे ऐश्वर्य व सत्ता त्याला

सोडून गेली म्हणून माहेर जवळ करणे किंवा हरिश्चंद्राला वाऱ्यावर सोडून स्वतः राज्य चालविणे तिला कठीण नव्हते; पण नवऱ्याच्या सुखात आणि दुःखांतही समरसतेने सहभागी होण्याचा एक आदर्श तिला घालून द्यायचा होता.

कांही पंडितांच्या मते पंचकन्यांतली ही तारा म्हणजे हरिश्चंद्राची तारामती नसून वाली वानराची पत्नी तारा ही आहे. ती वाली-पत्नी असली तरीही कांही बिघडत नाही. मंदोदरीप्रमाणेच तीही पतिव्रता म्हणून गौरविली गेली आहे. अर्थात वानर जमात ही अनार्य असल्यामुळे त्यांच्यातील पातिव्रत्याच्या कल्पना वेगळ्या होत्या. नवरा वारल्यावर दिराशी लग्न करण्याची प्रथा वानर जमातीत रूढ होती. त्याप्रमाणे रामाने वालीची हत्या केल्यावर तिने सुग्रीवाशी लग्न केले; पण वालीची पत्नी असतांना ती त्याच्याशी एकनिष्ठ होतीच. रामाची मदत घेऊन वालीशी लढायला सुग्रीव सज्ज झाला तेव्हा आपसांतील यादवी टाळण्यासाठी तारेने सुग्रीवाशी समझोता करण्याचा वालीला सल्ला दिला, आग्रह केला. पण वालीने तो मानला नाही. म्हणूनच रावणाप्रमाणे वालीही नाश पावला.

वरवर पाहिले तर सीता सुद्धा रामाच्या दुःखात सहभागी होण्यासाठी वनवासाला गेली असे दिसते. रामायण आणि पुराणे हेच सांगतात; पण मला शंका वाटते. तारामती व सीता या दोघीही रघुकुलांतल्या सुना. दोघीही पतिव्रता. दोघींच्या नशिबी दुःखे आली. परंतु त्यांच्या दुःखांची कारणे वेगळी. तारेचे दुःख हरिश्चंद्राने निर्माण केले होते तर रामाच्या वनवासात सीता आपण होऊन सहभागी झाली होती. केवळ पतिप्रेमामुळेच ती वनवासाला गेली असेल काय? अयोध्या सोडण्याचा तिचा दुसरा कांही उद्देश असेल काय? रामाचा वनवास हा केवळ वनवास नव्हता. दक्षिणेच्या आर्यीकरणाचा तो एक यशस्वी प्रयत्न होता. अगस्तीने सुरू केलेल्या मिशनरी कार्याचा रामाने त्या चौदा वर्षांत किती विस्तार केला. दक्षिण भारतांतल्या वानरादी अनार्यांचे मित्रत्व तर त्याने जोडलेच; पण लंकेत विरोध करणाऱ्या रावणाला मारून बिभीषणाशी सख्य केले. रामाच्या

या आर्यीकरणाच्या प्रयत्नात लक्ष्मणाप्रमाणेच सीतेचाही भाग होता. रावणासारखा झुंझार व स्वाभिमानी राक्षस सहजपणे रामाला वश होणार नाही हे ओळखूनच त्याच्याशी संघर्ष निर्माण करण्यास रामाला निमित्त मिळावे म्हणून सीतेने स्वतःला पळवून नेण्याची संधी रावणाला दिली असेल का? पूर्वनियोजित अशी ही घटना असेल काय? नाहीतर सीतेसारखी सावध स्त्री चुकून लक्ष्मणरेषा ओलांडते याचा अर्थ काय?

रामचरितांतील काव्याचा धागा सोडून निखळ इतिहासाकडे पाहिलें तर रामाचा वनवास हा दक्षिणेच्या आर्यीकरणाचा एक डाव होता असे वाटू लागते. रामाच्या या साहसात साथ देणे हे सीतेचे कर्तव्य होते. या कर्तव्यांतला धोका ओळखूनच सीता वनवासाला निघाली असली तर जगातल्या सर्वस्थलीन आणि सार्वकालीन स्त्रीवर्गाला तिने कर्तव्याचा एक आदर्श पाठ घालून दिला असेच म्हणावे लागते.

आणि सीतेचे काव्यात आणि पुराणात अवगुंठित असलेले हे रूप द्रौपदीच्या व्यक्तित्वात तर अधिक स्पष्टपणे दिसते. पांच पतींची प्रीती, मानलेल्या भावाची भक्ती आणि व्यावहारिक नीती तर द्रौपदीच्या ठिकाणी दिसतेच; पण स्त्रीजातीची सारी शक्ती तिच्या ठिकाणी एकवटली होती. ही शक्ती नसती तर कौरवसभेत विटंबना चालली असतांना रडत न राहातां, भीष्मद्रोणांना मान खाली घालण्यासारखे जे धीरोदात्त भाषण व वर्तन तिने केले ते केलेच नसते. ही शक्ती नसती तर श्रीकृष्णाने गीता सांगण्यापूर्वी पांडवांना ती युद्धाला प्रवृत्त करू शकली नसती. त्या महायुद्धांतील महान अनर्थाची काय तिला कल्पना नव्हती? विधवा आणि विपुत्र होण्याचा धोका काय तिने ओळखला नव्हता? पण स्त्रीजातीची मान जगात ताठ ठेवावी म्हणून मुत्सद्दी श्रीकृष्णाप्रमाणेच मानिनी द्रौपदीनेही युद्धाचा धोका पत्करला होता. सीतेमुळे रामायण घडले हे खरे नाही; पण द्रौपदीमुळे मात्र महाभारत घडले ही गोष्ट त्रिवार सत्य आहे. महाभारत ही स्त्रीजातीच्या मार्दवाची आणि शक्तीची–अपमानाची आणि मानाची गाथा आहे.

आणि शेवटी उरली अहिल्या! नित्यस्मरणीय स्त्रियांत जिला पहिला

क्रमांक मिळाला आहे ती. ती रूढार्थाने पतिव्रता नव्हती असे मी म्हटले तर तुमच्यापैकी अनेकांना धक्का बसेल. अहिल्येने तर चक्क व्यभिचार केला होता! गौतमाच्या रूपाने आलेल्या इंद्राशी आपण रममाण होत आहो याची तिला कल्पना नव्हती म्हणून ती निर्दोष आहे असे पुराणे सांगत असली तरी मूळ वाल्मिकी रामायणांत मात्र ती जाणीवपूर्वक इंद्राशी शय्यासोबत करीत होती असा उल्लेख आहे.

अहिल्येची ही कथा तशी सर्वपरिचित आहे. ब्रह्मदेव ने निर्मिलेली अहिल्या अत्यंत सुंदर होती. जिच्यात हृ य म्हणजे व्यंग नाही ती अहिल्या. कौमार्यावस्थेत असतांना इंद्रादी अनेक देवांचा तिच्यावर डोळा होता. परंतु ब्रह्मदेवानं तिचे लग्न गौतमाशी लावून दिले. पुढे एक दिवस गौतम ब्राह्ममुहूर्ती उठून नदीवर स्नानाला गेला असतांना इंद्र गौतमाचे रूप धारण करून गौतमाच्या आश्रमात आला आणि त्याने अहिल्येपाशी संभोगाची इच्छा व्यक्त केली. अहिल्येने ती पुरवली. पुढे दररोजच हा प्रकार होऊ लागला. शिष्यांना ही गोष्ट विचित्र वाटू लागली. शेवटी एक दिवस इंद्र-अहिल्या समागम चालू असतांनाच गौतम आश्रमात परत आला. आंत एक आणि दुसरा बाहेर असे दोन गौतम! शिष्यांनी खऱ्या गौतमास आंत दुसरा गौतम असल्याचे सांगितले तेव्हा तो आश्रमात घुसला. इंद्र बोकयाचे रूप घेऊन पळून जाऊ पाहात होता. परंतु गौतमाने त्याला हटकले. तो इंद्र आहे हे गौतमाने ओळखले. त्याच्या अंगाला सहस्र भोके पडतील असा शाप दिला आणि अहिल्येलाही ती शिळा होईल असा शाप दिला. मग रामाच्या पदस्पर्शाने तिचा उद्धार होईल असा उःशाप दिला. अशी ही अहिल्येची कथा.

आतां प्रश्न असा की, पहिल्याच दिवशी इंद्र गौतमाच्या रूपाने समागमासाठी आला आहे ही गोष्ट अहिल्येने ओळखली होती की नाही? प्रश्नाचे उत्तर होय असे आहे. कारण या गौतमाच्या अंगाला दैवी गंध येत होता. तो मनुष्य नव्हता. तर मग या कित्येक दिवस चाललेल्या व्यभि-

चाराला तिने संमती का दिली ? इंद्राने तरी अहिल्येचा सतत उपभोग का घ्यावा ? तो इतका विषयलंपट होता का ?

या व्यभिचार प्रकाराची कारणमीमांसा थोडी वेगळी आहे. गौतमाचे तपःसामर्थ्य शिगेला जाऊन पोचले होते. ते इतके की, त्याला कधी राग येऊन त्याने आंधळेपणाने शाप दिला असता तर जग नष्ट होऊन गेले असते. त्याच्या उग्र तपाचे स्वर्गलोकालाही भय वाटत होते. त्याच्या पत्नीच्या व्यभिचारामुळे त्याच्या शापाचे धनी फक्त अहिल्या आणि इंद्र हे दोघेच झाले असते आणि मग त्याच्या तपाचे पुण्य कमी झाले असते. पृथ्वीला आणि स्वर्गाला मग भय उरले नसते. आणि शेवटी झालेही तसेच. स्त्रीजातीची शान मान राखण्यासाठी द्रौपदीने स्वतःवर दुःख ओढवून घेतले तर जगाला वाचवण्यासाठी अहिल्या स्वतः शीलारूप बनली!

आणि म्हणूनच अहिल्या, द्रौपदी, सीता, तारा आणि मंदोदरी या देवता म्हणून, अवतारी स्त्रिया म्हणून, प्रेमिका किंवा अभिसारिका म्हणून किंवा पतिव्रता म्हणून त्या सुप्रसिद्ध नित्यस्मरणी श्लोकात त्यांचा समावेश झाला नसून स्त्रीजातीच्या ठिकाणी आवश्यक असलेल्या किंवा आवश्यक आहे असे श्लोककर्त्याला वाटणाऱ्या म्हणा–गुणांची प्रतीके म्हणून त्यांना नित्यस्मरणीय मानण्यात आले आहे.

● ●

# ५ : आपण सारी माणसे

दैनिक ‘ गोमन्तक ’चा संपादक असतांनाची गोष्ट. मुंबईचे माझे जोशी नांवाचे एक परिचित वृद्ध गृहस्थ मुद्दाम माझ्या कार्यालयात भेटायला आले. आल्या आल्या अन् खुर्चीवर बसता बसताच गहिंवरल्यागत म्हणाले, ‘ फार छान जम बसवलात सातोस्कर. मला माहीतच होतं, तुम्ही नांव काढणार, मोठे पुढारी होणार. ’

‘ अहो, मी पुढारी नाही. एका छोट्याशा प्रादेशिक पत्राचा संपादक आहे. माझा सारा वेळ पेपरच्या कामात जातो. आता दोन वर्षं झाली. चांगला जम बसला आहे पेपरचा. लोकांनी चांगलाच उचलून धरलाय पेपर. यांत माझ्या कर्तबगारीचा भाग थोडा आहे. ही सारी परमेश्वराची कृपा. ’ थोर वगैरे पुढाऱ्यांनी असे नम्रपणे बोलायचे असते हे मला माहीत होते.

पण जोशीबुवा आपला मुद्दा सोडायला तयार नव्हते. ते म्हणाले, ‘ हे तुम्ही विनयाने बोलताहां सातोस्कर. बाकी ‘ विद्या विनयेन शोभते ’ म्हणतात ते खोटं नाही. अहो, गेले चार दिवस मुक्काम आहे माझा गोव्यात. मंगेशीला उतरलोय मी भावेभटजींकडे. देवस्थानं पाहात हिंडतोय आमच्या सौ. सह. परवाचे दिवशी तुमचा सत्याग्रह झाला ना, मंगेशीला. तेव्हा मी हजर होतो. तुमचं भाषण ऐकलं मी. ’

गोष्ट खरी होती. गोव्यांतील हरिजनांना मंदिरांत प्रवेश मिळावा

म्हणून कांही समाजधुरीणांनी चळवळ चालविली होती. एक दिवस मंगेश देवस्थान हरिजनांना खुले व्हावे म्हणून प्राकाराबाहेरील जागेत सत्याग्रह झाला होता. मी माझ्या दैनिकातून हरिजनांच्या मंदिरप्रवेशाला पाठिंबा दिला होता आणि सभेसमोर इतर पुढाऱ्यांप्रमाणे भाषणही ठोकले होते.

जोशीबुवा या सत्याग्रहाचा धागा धरून पुढे बोलतच होते. म्हणाले, 'त्यावेळी देवस्थान कमिटीने तुमची वाटाघाटीवरच बोळवण केली. बाकी त्यांचंही खरं आहे म्हणा. ही देवस्थानं खाजगी मलकीची आहेत म्हणे. त्यांची इच्छा नसली तर तुम्हा हरिजनांना कसे प्रवेश देतील ते ?'

'अहो, पण...'

मला माझे वाक्य पुरे करायला देण्यापूर्वीच जोशीबुवा म्हणाले, 'हे पाहा सातोस्कर, तुम्हाला काय म्हणायचं ते मला माहीत आहे. पण साऱ्या गोष्टी गोडीगुलाबीने घेतल्या पाहिजेत. आंबेडकरांप्रमाणे तुम्हाला भारतीय कीर्ती मिळावी अशी माझी इच्छा आहे. पण आंबेडकरांनी केलेली चूक तुम्ही करू नये. चवदार तळ्याच्या सत्याग्रहाने आंबेडकर पुढारी बनले. पण शेवटी काय झाले ?'

'काय झाले ?' मी विचारले.

'काय झालं ? आंबेडकरांना हिंदू धर्म सोडून बौद्ध धर्म स्वीकारावा लागला. हजारो हरिजन बौद्ध बनले. हिंदू धर्माची केवढी हानी झाली ! तेव्हा हे कांही खरं नाही. त्यापेक्षा असं करा. तुम्हाला देवमंदिरे हवी असतील तर स्वतः बांधा. सरकारकडून ग्रँट मिळवा. पण त्यापेक्षा स्वतःच्या लोकांना शिक्षण देण्याची, त्यांचा आर्थिक उद्धार करण्याची मोहीम हाती घ्या. आर्थिक आणि सांस्कृतिक दृष्ट्या हरिजन वरच्या पातळीवर आले तर मंदिरप्रवेशासाठी तुम्हाला झगडा देखील करावा लागणार नाही. तुमचे पुरुषोत्तम मंगेश लाड आंबेडकरांना ब्राह्मण म्हणत असत हे तुम्हाला माहीत असेल. तेव्हा तुम्ही या दृष्टीने चळवळ करा. तुमच्या हातात पेपर आहे. पेपर म्हणजे एक शस्त्र आहे महाराजा...'

आणि मग असेच कांही बरेचसे बोलून जोशीबुवा निघून गेले. कँटिनमधून मागविलेला चहा पिऊन आणि खूप समाधान पावून.

मला मग एक फार जुनी आठवण झाली. तीस वर्षांपूर्वी त्यांना एक दिवस मी चहाची ऑफर दिली होती ती त्यांनी नाकारली होती.

त्या जुन्या काळात मुंबई युनिव्हर्सिटी ठरलेल्या वेळी परीक्षा घेत होती आणि ठरलेल्या वेळी निकालही जाहीर करीत होती. वृत्तपत्रांतून उत्तीर्ण विद्यार्थ्यांची क्रमांकासह नांवेही छापली जात असत. एक दिवस बी. ए. चा निकाल लागला. मी पास झालो होतो. बनाम हॉल लेनमधून डाव्या हाताला वळून पोर्तुगीज चर्चजवळच्या कोपऱ्यावर पोचलो अन् समोरून येणारे जोशीबुवा भेटले. मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालयांत त्यांची माझी ओळख झाली होती. ते एक पट्टीचे वाचक होते नि मी बी. ए. चा विद्यार्थी होतो. मराठी विषय प्रमुख होता. त्यांत ऑनर्स घेतले होते. म्हणून संग्रहालयात जाऊन मराठी पुस्तकांचा फडशा पाडीत होतो.

'अभिनंदन.' जोशीबुवा माझा हात पकडून नि नंतर पाठीवर थाप मारीत म्हणाले, 'चांगल्या मार्कांनी पास झालात. आता पुढे काय, एम्. ए. करणार आहा ना?'

'हो. बहुतेक एम्. ए. ला जाईन.'

'जा, जा. जरूर जा. अहो, एम्. ए. झालात तर कुठेही प्रोफेसर व्हाल. तुमच्या जातीचंही तुम्हाला कल्याण करता येईल. तुमच्या जातीनं शिक्षण घेऊन पुढं आलं पाहिजे. तुमच्या समाजात शिक्षणाचा सार्वत्रिक प्रसार झालेला नाही. वेगवेगळ्या क्षेत्रांत तसे मोठे लोक आहेत; पण थोडे आहेत.' आणि मग ज्या इमारतीखालच्या फुटपाथवर उभे राहून आम्ही बोलत होतो त्या इमारतीच्या पहिल्या मजल्यावरच्या उघड्या खिडकीकडे बोट दाखवीत जोशीबुवा म्हणाले, 'इथे कवळेकर राहातात. तरुण वयात मोठं नांव मिळवलं आहे वकिलीत. डॉक्टरी पेशात मुळगांवकर, शिरोडकर, शिक्षणक्षेत्रात वेलिंगकर बंधू आहेत. त्यांचा आदर्श ठेवा समोर. प्रत्येक

जातीतल्या तरुणांनी उच्च शिक्षण घेतलं पाहिजे.'

जोशीबुवांच्या बोलण्यातली शिक्षणाविषयीची, समाजाच्या उद्धाराविषयीची कळकळ मला जाणवत होती. चित्पावन ब्राह्मण संघातर्फे दिल्या जाणाऱ्या शिष्यवृत्त्या वाढवल्या पाहिजेत, शिक्षण निधीसाठी देणग्या मिळवल्या पाहिजेत म्हणून ते कसे राबत आहेत हे मला माहीत होते.

शेवटी आपल्या उपदेशपर भाषणाचा समारोप केल्यावर जोशीबुवा म्हणाले, 'चला, आपण समोरच्या व्हॉईसरॉयमध्ये चहा घेऊ. असं वाटेवरचं कोरडं अभिनंदन नको.'

'हो, घेऊया की.' मी म्हणालो, 'पण त्यापूर्वी थोडा खुलासा करतो. तुम्ही म्हणतां त्या कवळेकर, मुळगांवकरांच्या जातीतला मी नाही.'

'काय म्हणतां?' जोशीबुवांनी आश्चर्यानी विचारले, 'तुम्ही कवळेकरांच्या जातीतले नाही?'

'नाही.'

'तर मग तुमची जात कोणती?'

'तुम्हीच ओळखा पाहू.'

'तुम्ही भंडारी का? कोकणांतल्या मराठ्यांना भंडारी म्हणतात म्हणून विचारतो.'

जोशीबुवांसारख्या सच्छील, भाबड्या माणसाची फिरकी घ्यायची दुर्बुद्धी मला कशी सुचली कोण जाणे. मी म्हटले, 'जोशीबुवा, मी महार आहे. महात्मा गांधींच्या भाषेत हरिजन.'

जोशीबुवांचे विमान एकदम खाली आले. ते म्हणाले, 'तुम्ही सांगता म्हणून खरं मानतो. पण तुमचं बोलणं चालणं, भाषा पाहिली तर तुम्ही महार आहात असं...'

त्यांना मध्येच तोडून मी म्हटले, 'जोशीबुवा, असं रस्त्यावर किती वेळ बोलत राहणार? चला आपण व्हॉईसरॉयमध्ये जाऊ. चहा घेता घेता

गप्पा मारू.'

मी महार आहे हे सांगितल्यावर जोशीबुवांनी आपल्या हातात घेतलेला माझा हात सोडला होता. तो मी पुन्हा हातात घेतला तेव्हा तो सोडवून घेत जोशीबुवा घाईने म्हणाले, 'आपण पुन्हा केव्हा तरी चहा घेऊ. आतां थोडा घाईत आहे. भाजीबिजी घेऊन लवकर घरी गेलं पाहिजे.'

आणि जोशीबुवा तुरुतुरु बनाम हॉल लेनमध्ये वळले.

गिरगांव नाक्यावर घडलेली ही घटना मी विसरूनही गेलो होतो. जोशीबुवा संग्रहालयात अधूनमधून भेटतच होते. असेच एक दिवस भेटले तेव्हां म्हणाले, 'सातोस्कर, मतदान करून आलात!'

'मतदान! निवडणुकांना अवकाश आहे.'

'अहो, असं काय करतां? तुमचं मतदान आज आहे हे विसरलात का?'

आणि मग माझ्या डोक्यात एकदम प्रकाश पडला. देशाच्या घटनेनुसार हरिजनांना विधानसभेत खास प्रतिनिधित्व देण्यात आले होते. हरिजन उमेदवाराची निवडणूक सार्वत्रिक निवडणुकांपूर्वी कांही दिवस घेण्याची तरतूद करण्यात आली होती. आणि आज ती निवडणूक होणार होती.

पंधरा वर्षांपूर्वी गिरगांव नाक्यावर घडलेली ती घटना मला एकदम आठवली. पंधरा वर्षांत मी हरिजन असल्याची जाणीव जोशीबुवांनी मला कधीच करून दिली नव्हती. पण आज मात्र पर्यायाने माझ्या जातीचा उल्लेख त्यांनी केला होता. ते म्हणत होते, 'सातोस्कर, घटनेने तुम्हा आम्हांला दिलेला मतदानाचा हक्क हा पवित्र हक्क आहे. तुम्हाला तर त्याचं महत्त्व अधिक वाटलं पाहिजे. मला वाईट वाटतं सांगायला; पण तुमच्याबाबतच्या माझ्या अपेक्षा फोल ठरल्या आहेत. पूर्णपणे आत्मकेंद्रित बनला आहात तुम्ही. वाचन, लेखन करतां. संस्थांचं कार्य करतां. राजकारणात भाग घेतां. पण तुमच्या स्वतःच्या समाजासाठी मात्र कांहीही

करत नाही. स्पष्टपणे बोलतो म्हणून माफ करा...'

आणि हरिजनांचा उद्धार करण्याची माझ्यावर केवढी जबाबदारी आहे, आंबेडकरांनी केलेल्या चुका टाळून मी कोणत्या दृष्टीने कार्य केले पाहिजे याचा सल्ला ते मला देत राहिले.

आणि जोशीबुवांचे भाषण ऐकत असतांना माझ्या मनात विचार येत होते—गेली पंधरा वर्षे जोशीबुवा नि मी संग्रहालयाचे कार्य खांद्याला खांदा लावून करतो आहो, सभासंमेलनाच्या वेळी हॉटेलमधून आलेला चहा बरोबर घेत आहो, सभा आटोपतांच बरोबरच बाहेर पडत आहो; पण कोपऱ्यावरच्या बिल्डिंगमधल्या आपल्या घरी शिरतांना जोशीबुवांनी मला कधी म्हटले नाही, 'सातोस्कर, चला की आमच्या घरी. चहा तरी घेऊन जा!'

आणि गोवा मुक्तीनंतर जोशीबुवा गोव्याला आले होते. मी मोठा संपादक झालो म्हणून आणि माझ्या समाजाच्या उन्नतीसाठी कांहीतरी करतो आहे म्हणून माझे अभिनंदन करीत होते. आणि गोव्याच्या छोट्या क्षेत्रात मी कोणत्या दिशेने काम केले पाहिजे याबद्दल कळकळीने मला सल्ला देत होते. हरिजनांचा मी पुढारी झालो म्हणून समाधान मानीत होते!

आणि तब्बल एका तपानंतर या माझ्या हितचिंतकाची परवा अचानक गांठ पडली. कोकणांतील चित्तपावन कुलोत्पन्न जोशी कुटुंबियांचे एक संमेलन गोव्यात भरले होते. जोशीबुवा आवर्जून या मेळाव्याला उपस्थित राहिले होते. गोव्यांतील इतर जातींप्रमाणेच चित्तपावनांच्या इतिहासाचा मी थोडाफार अभ्यास केला होता आणि म्हणून या विषयावर माझे भाषण ठेवले होते. माझे भाषण संपतांच जोशीबुवा स्वयंस्फूर्तीने व्यासपीठावर आले आणि त्यांनी माझी स्तुती करणारे भाषण केले. कोकणस्थेतर माणसाने कोकणस्थ ज्ञातीचा एवढा अभ्यास केला म्हणून त्यांनी माझे कौतुक केले. हे तोंडदेखले कौतुक नव्हते. प्रेमाच्या मधाने ते थबथबलेले होते. मात्र त्या सबंध भाषणांत माझ्या हरिजन जातीचा उल्लेख

मात्र त्यांनी कटाक्षाने टाळला. खरेच सांगतो, त्यांच्या त्या प्रेमाने मी भारावून गेलो.

संमेलनाचे सूप वाजले तेव्हा मी निघालो. निघतांना जोशीबुवांना म्हटले, 'येणार का आमच्या घरी ? रात्री वस्तीलाच राहा. तुमच्या तोंडून एवढी स्तुती ऐकल्यावर तुम्हाला घरी बोलावणं हे माझं कर्तव्यच आहे, नाही का ?'

जोशीबुवांची प्रतिक्रिया काय होईल याबद्दल मी साशंक होतो. पण ते चटकन् म्हणाले, 'चला की. चहा तर घेऊ. मुक्कामाचं म्हणत असाल तर या मंडळींनी ती सोय आधीच केली आहे.'

जोशीबुवांना घेऊन गाडीत बसलो आणि ड्रायव्हरला म्हटले, 'शांताराम, आता थेट घरी.'

पिसासारखी गाडी सुसाट सुटली. आवाज न करतां. धक्के न देतां.

'गाडी तुमची सातोस्कर ?'

'हो ना. फॉरेन मेकची. नवी कोरी. गोव्यात आल्यावरची ही पहिली खरेदी.'

जोशीबुवांनी मोठ्या कौतुकाने गाडीचे निरीक्षण केले. दरवाजा उघडला नी पुन्हा ओढून घेतला तेव्हा 'गुंय' असा आवाज आला नी मिनिटभर टिकला.

'हा आवाज कसला सातोस्कर ? मघाशी आपण दरवाजा लावून घेतला तेव्हां असाच आवाज निघाला होता. म्हणून आवाज दारातूनच येतो का याची खात्री करून घेतली.' जोशीबुवा म्हणाले.

'या गाडीला म्युझिकल स्टोअर्स आहेत जोशीबुवा.'

'असा चमत्कार कुठं पाहिला नव्हता.'

मी फक्त हसलो.

घरी पोचलो. घरात शिरताच पत्नीला चहाची ऑर्डर दिली.

‘ बंगला भाड्याचा ? ’ जोशीबुवा कोचावर बसतां बसतां म्हणाले.

‘ नाही. स्वतःचा. आठ वर्षं झाली बांधून. ’

जोशीबुवा उठले. घरभर हिंडले. घरांतल्या माणसांची ओळख करून घेतली. मग चहा घेतां घेतां म्हणाले, ‘ मला तुमचं घर आवडलं. माणसं आवडली. त्यांची वागणूक आवडली. तुमच्या दिवाणखान्यांतली ही पुस्तकांची कपाटं आवडली. या कपाटांतल्या शेकडो ग्रंथकारांच्या सहवासात तुम्ही वावरतां. मला तुमचा अभिमान नि हेवाही वाटतो सातोस्कर. तुम्हाला महार कोण म्हणेल ? ब्राह्मण म्हणवणाऱ्या आम्हा मंडळींना तुम्ही लाजवलंत. घरातलं हे पवित्र, सात्विक वातावरण, घरच्या माणसांची शुद्ध, लाघवी मराठी भाषा, अन् तुमचे टेबलावर बसलेले नि कपाटात राहाणारे हे ग्रंथकार मित्र !... मी आज रात्री इथंच मुक्काम करीन सातोस्कर. ’ आणि मग माझ्या पत्नीला उद्देशून म्हणाले, ‘ स्वैंपाकासाठी फार श्रम घ्यायचे नाहीत हं वैनी. फक्त पिठलं–भातावर बोळवण करायची पाहुण्यांची. ’

तासाभराने पानावर बसलो तेव्हां दूधपाक पुरी पुढे आली. जोशीबुवांचे डोळे पाणावले. ‘ काय हे वहिनी ? कशाला त्रास घेतलात एवढा ? मी कांही परका नाही. चाळीस वर्षांचा स्नेह आहे आमचा. विचारा तुमच्या यजमानांना. ’ आणि मग अत्यंत समाधानी, तृप्त स्वरात म्हणाले, ‘ सत्तर वर्षांच्या आयुष्यात मी आज पहिल्या प्रथम हरिजनाकडे जेवतो आहे. फार फार बरं वाटलं मला. शेवटी ब्राह्मण काय, हरिजन काय, सारी माणसंच आहोत आपण ! ’

त्या रात्री आम्ही खूप गप्पागोष्टी केल्या. दुसऱ्या दिवशी चहापाणी झाल्यावर जोशीबुवा निघून गेले. पण मी कोणताही खुलासा केला नाही. चाळीस वर्षांपूर्वी हॉटेलमध्ये एका ‘ अस्पृश्याबरोबर चहा घेण्यास नकार देणारे जोशीबुवा त्याच्या घरी आज आनंदाने जेवले होते ! अत्यंत समाधानाने माझ्या घराच्या पायऱ्या उतरत होते !

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. २३०४४
शाखा (स्थळ प्रत)

# ६ : मांडवी आणि जुवारीच्या काठावर

परवांच एका तरुण मित्राच्या गाडीने बोरीच्या पुलावरून पणजी-कुडचड्याचा प्रवास केला. सावर्डे स्टेशनसमोरच्या जागेत गाडी उभी करून मित्राने घड्याळात पाहिले नि म्हटले, 'पाह्यलंस ? फक्त एका तासात आपण कुडचड्याला पोचलो.'

आपल्या गतिमान सारथ्याचं मी कौतुक करीन अशी त्याची अपेक्षा होती.

पण मी त्याचा अपेक्षाभंग केला. मी म्हटलं, 'हो, फक्त एका तासात आपण कुडचड्याला पोचलो. पण पाह्यलं मात्र कांहीच नाही !'

'काय पाह्यलं नाही ?' त्याने आश्चर्याने विचारले.

'किती पाह्यचं होतं गड्या या साठ किलोमिटर्सच्या प्रवासात ! मांडवी अन् आगशीच्या साथीने आपण हा प्रवास केला. पण पणजीच्या पाट्यावर भरतीच्या लाटा आदळून त्याचे तुषार कारंजासारखे उसळत होते हे तू पाह्यलंस का ? रायबंदरच्या तोंडावर पांच पन्नास पन्हेळ मांडवीच्या मध्यभागी सुस्तपणे डुलत होते हे तुझ्या लक्षात आलं का ? जुन्या गोव्याच्या चौकात दोन्ही बाजूंच्या इगर्जींच्या भव्य वास्तू आपल्या अंगावर येत आहेत असं तुला वाटलं का ? तिथल्या चौकात महात्मा गांधी एका दलित बालिकेला कुरवाळीत आहेत याकडे तुझं लक्ष गेलं

का? भाणस्तरीचा पूल क्रॉस करतांना तीनशे वर्षापूर्वी या पुलापासून जवळच गोवा घेण्याच्या जिद्दीनं संभाजी राजानी भरतीच्या पाण्यात घोडा घातला होता त्याची तुला याद आली का? मंगेशी-कुंडईच्या घाटीवरून दिसणारा मुरगांवपर्यंतचा परिसर पाहून अन् फर्मागुडीवरून फोंड्याला जातांना हिरव्या वनराईतून दिसणारा नागेश मंदिराचा हिमधवल घूड पाहून तुझे मन प्रसन्न झाले का? बोरीच्या सिद्धनाथच्या उत्तुंग उंचीनं नि पुलाजवळच्या आगशीच्या फेसाळणाऱ्या विशाल पात्रानं...'

मांडवी-आगशीच्या किनाऱ्यावरच्या परिसराचं माझं वर्णन असंच पुढं चालू राहिलं असतं. पण मला मध्येच तोडून माझा तरुण व्यापारी मित्र म्हणाला, 'तुम्हाला काय म्हणायचं आहे ते माझ्या लक्षात आले. गोव्याच्या नद्या-खाड्या, गोव्याचे डोंगर, गोव्याचा साराच निसर्ग सुंदर आहे हे मला मान्यच आहे. पण या गोष्टी पाहायला बाहेरचे लोक येतात. आपल्याला हे नेहमीचंच आहे.'

माझ्या या मित्राचे म्हणणे त्याच्या दृष्टीने खरे होते. गोव्याचे हे सौंदर्य नेहमीचेच होते. ते पुरातन काळापासून असंच होतं. पण एकाद्या महाकवीच्या प्रतिभेप्रमाणं ते नित्यनूतन होतं हे मात्र त्याला माहीत नव्हतं. सहा ऋतूंत अन् बारा मासांत हे सौंदर्य विविध रूपांनी प्रगट होतं आणि सौंदर्यवेधी मनाला मोह घालतं याची त्याला कल्पना नव्हती. साऱ्या गोव्याच्या सौंदर्याचं सोडून द्या. पण ज्या मांडवी नि आगशीच्या सान्निध्यानं आम्ही पणजी-कुडचड्याचा प्रवास केला त्या नद्यांचा विचार करा. या दोन नद्या म्हणजे गोव्याच्या गंगा-जमुना किंवा पद्मा-मेघना आहेत. यांनी गोव्याचा निसर्ग आणि गोव्याचा माणूस घडवला आहे. गोवेकराचे गोंयकारपण आणि त्याच्या स्वभावातले 'गोवे' या गोष्टीही या सलील सरितांचीच देण आहे!

गोव्यांतल्या नद्यांत मांडवी ही विस्ताराने मोठी. गोव्यांतल्या ईशान्य कोपऱ्यांतल्या भीमगडात ती उगम पावते आणि सत्तरी तालुका उभा दक्षिणोत्तर फिरून भिरोंड्यापर्यंत येते. मग पश्चिमवाहिनी होऊन जुव्यापर्यंत

वायव्येला जाते ती पुढे सरळ पश्चिमेचा मार्ग धरून काब व आग्वादच्या आवळलेल्या बाहूतून सुटून पश्चिम सागराला मिळते. या नदीला आपण मांडवी म्हणतो. पण हिची जुनी नांवे वेगळीच होती. गांज्यापर्यंत हिला मादय म्हणत. आजही म्हणतात. पुढच्या भागाला खांडेपारची नदी. आणि उरलेली मांडवी. या नदीचे जुने नांव गोमती होते हे तुम्हाला माहीत असेल. पण तिला गंधमादिनी म्हणत हे तुम्हाला कदाचित माहीत नसेल. पण एका काळच्या मादिनीचे मादय कसे झाले आणि मादयने पुढे मांडवी हे नांव का धारण केले हे मात्र कुणी सांगू शकत नाही. मांडवी म्हणजे जकात नाके. हे इथे कुठून उपटले? इतिहास कांही उत्तर देत नाही.

आपला नागमोडी मार्ग काढत असतांना वाटेत सांखळीची, डिचोलीची, म्हापशाची, दूधसागरची, रगड्याची अशा अनेक उपनद्या मांडवीला मिळतात तेव्हां पिळगांवच्या पुढे तिचे उदर इतके फुगते की, चोडण-दिवाडी-जुवे-आखाडो सारखी कित्येक बेटे पोटात रिचवून आणि रायबंदरला मोठा विस्तार धारण करून ती पश्चिम सागरास मिळते. रायबंदरच्या डोंगराच्या माथ्यावरून तुम्ही मांडवीकडे पाहा, एकाद्या अजगराने चारसहा शेळ्यामेंढ्या गिळल्यामुळे त्याचे पोट तट्ट फुगलेले दिसावे अन् आणखी एक शेळी त्याच्या घशात अडकलेली असावी असे तुम्हाला वाटू लागेल.

मांडवीच्या मानाने जुवारी लांब असली तरी तिचे गणगोत कमी आहे. सांगे तालुक्यांत गोव्याच्या आग्नेयीकडील सह्यशिखरांत ती उगम पावते अन् सांगे-सावर्ड्यांहून पुढे साष्टी अन् फोंडा हे तालुके दुभंगून मुरगांव-तिसवाडी तालुक्यांच्या मध्ये प्रचंड उपसागराचे रूप धारण करते.

गोव्यांतल्या या नद्यांना उगाच आपले नद्या म्हणायचे. खरे म्हणजे अर्धनारीनटेश्वराप्रमाणे त्यांचा अर्धा प्रवास गोड्या पाण्याचा असतो तर अर्ध्या खाऱ्या पाण्याचा. खाऱ्या पाण्यात मत्स्यमंडळी स्वैर जीवन

जगण्याचा प्रयत्न करते तर किनाऱ्यावरील माणसे शेवल्यांपासून सुंगटां-पर्यंतच्या जलजीवांना आपले भक्ष्य बनवितात! शेकडो हजारो वर्षे या जलचरांना पकडून खाण्याचा माणूस नांवाच्या जीवांनी सपाटा चालवला आहे. महागाई, टंचाई, बेकारी या गोष्टींची गोवेकरांना जितकी चिंता वाटते त्यापेक्षा कितीतरी अधिक पटींनी चिंता वाटते ती 'आयज नुस्त्याक किते?' या प्रश्नाची.

गोव्यांतल्या या नद्या-खाड्या म्हणजे केवळ जलवाहिन्या नाहीत. त्या रक्तवाहिन्या आहेत. माणसाच्या शरीरांतल्या नीला हातापायातले रक्त हृदयात नेतात आणि रोहिणी हृदयातील रक्ताचा अवयवांना पुरवठा करतात. त्या रक्तातील अणुरेणू या नीला-रोहिण्यांतून सारखे धांवत असतात. एक काळ असा होता की, गोमंतकाच्या देहातून धावणाऱ्या या वाहिन्यातून—वाहिन्यातून म्हणण्यापेक्षा वाहिन्यांवरून म्हणू-माणसे आणि माल सारखा वाहात रहायचा. फारसे जुने न झालेले ते युग आजच्या-सारखे मोटारयुग नव्हते. ते होते नौका-युग. किती प्रकारच्या नौका! होड्या, होडकी, पन्हेळ, तारवे, फत्तेमाऱ्या, कोठवे, वाफोर आणि मन्वरे सुद्धा! फत्तेमाऱ्या-कोठवे मुंबईहून माल आणायच्या आणि पणजी-मुरगांव बंदरात ओतायच्या! तिथून हा माल होड्यांतून खेडोपाडी पोचायचा. माणसे रेल्वेतून व बोटीतून गोव्यात यायची आणि होड्यांतून आपापल्या गांवी जायची. प्रवास किती आरामात व्हायचा! वल्ह्यांच्या तालबद्ध आवाजाने मनाला एक विचित्र गुंगी यायची. वाऱ्याने तट्ट फुगलेले शीड होडीला घेऊन तुरुतुरु चालू लागले की, वाटायचे आपण कापसाच्या म्हातारीसारखे हवेतून तरंगतो आहोत!

परवा आम्ही पणजी-मडगांवचा प्रवास फक्त पाऊण तासात केल्याचे मी तुम्हाला नुकतेच सांगितले. पण माझ्या लहानपणी १९२० च्या सुमारास हा प्रवास करायला मला सात आठ तास लागले होते असं सांगितलं तर तुम्हाला खरं वाटेल? पणजीहून ११ वाजता सावर्डेचा वाफोर सुटायचा. पाऊण तास डुलत डुलत चालून तो रायबंदर हॉस्पिटलला लागायचा.

त्यानंतर अर्ध्या-पाऊण तासाने जुने गोवे. नंतर कुंभारजुवे, मग कुंडई, मडकई, बोरी करीत रायतूरला पोचायला त्याला चार वाजत. तिथे उतरून मग एकदोन एकदोन करीत मडगांवला जायचे.

पण या प्रवासात किती मजा यायची! प्रथम मांडवी, नंतर जुवारीला जोडणारा कुंभारजुवेचा कॅनाल, पुढे मडकईच्या टोकाला डावीकडे वळून जुवारीत प्रवेश. आणि शेवटी रायतूरहून सावडर्याला पोचायला वाफोराला सहा वाजायचे. दिवसभर केलेला हा नागमोडी प्रवास म्हणजे एक अविस्मरणीय अनुभव. निळेभोर पाणी, काठावर निर्गुडीची झुडपे, पलीकडली हिरवी पोपटी शेते, बांधावरले माड, थोडे दूर लाल मातीची नी करड्या कौलांची बैठी घरे, मधूनच दिसणाऱ्या एकाद्या इगर्जीचा क्रॉस, पाण्यात होणाऱ्या वाफोराच्या हालचालीमुळे घाबरलेल्या शेवठ्यांच्या पाण्याबाहेर उड्या! या साऱ्या गोष्टींचा ठसा माझ्या मनावर आजही उमटलेला आहे.

पण या वाफोराच्या प्रवासापेक्षा रात्री केलेल्या होडीच्या प्रवासाची मजा काही औरच. माझा गांव माशेल आणि आजोळ पणजीला. अंतर अवघे दहा मैल. पण या प्रवासाला अख्खी रात्र लागायची! 'आज पाणी केन्ना?' हा प्रश्न होडीवाल्याला प्रथम विचारायचा. त्याने रात्री नऊ म्हणून सांगितले म्हणजे जेवून खावून पणजीला जाणारे प्रवासी नदीवर गोळा व्हायचे. एक, दोन, तीन जरूर तेवढ्या होड्या तयार असायच्या. साऱ्यांनी होड्यांतून पथाऱ्या पसरून झोपी जायचे. मग सुकती आणि शीड यांच्या सहाय्याने होडीचा प्रवास सुरू व्हायचा आणि सकाळी सहाला पणजीच्या गुजरांच्या काशीवर म्हणजे आजच्या फेरीबोटीजवळ संपायचा. वारा पडला आणि भरती सुरू झाली तर वल्ह्यांवर होडीवाले बसायचे. निःशब्द स्तब्धतेत वल्ह्यांचे असे तालबद्ध आवाज घुमायचे की, त्या तालाच्या ठेक्यावर डोळ्यावर झोपेची गुंगी यायची. पण काळोख्या रात्री वल्ही असली तर माझे डोळे सताड उघडे असायचे. कारण वल्ह्याच्या प्रत्येक आघाताने चकाकत्या पाण्याचे असे एक अग्निवर्तुळ वर उठायचे

की, त्या चमत्काराकडे तासन् तास पाहात राहावे. खाऱ्या पाण्यातल्या फॉस्फरसमुळे पाणी चकाकते हे शास्त्रीय ज्ञान मग पुष्कळ वर्षांनंतर झाले.

मांडवी-जुवारीच्या असल्या कितीतरी गंमती सांगता येतील. त्यांतली एकच सांगतो. कॉलेज शिक्षणासाठी मुंबईला गेलो. अधूनमधून गोव्याला येत होतो. पण मांडवी-जुवारीची संगत सुटली आहे याची खंत वाटत होती. एका मुक्कामात ठरवले, पन्हेळ घेऊन निदान मांडवीची परिक्रमा करावी. चार समवयस्क मित्र मिळून पणजीहून पन्हेळातून निघालो. दिवाडी, चोडण, आखाडा, जुवे मिळून मांडवीचा जो चक्रव्यूह बनला आहे त्यांतून पन्हेळ वल्हवीत जाऊ लागलो. आणि अचानक अशा एका ठिकाणी आलो की, जिथे नदीचे पात्र इतके चिंचोळे झाले होते की, दोन्ही बाजूंच्या निर्गुंडीच्या झाडांचे शेंडे एकमेकांत गुंतून गेले होते. वर सूर्य तळपत होता; पण नदीच्या पृष्ठभागावर कोवळे चांदणे फुलले होते! पर्णराजींतून झिरपणाऱ्या कवडशांच्या फुलांची नकशी पाण्यावर उठली होती! मला एकदम आठवण झाली ती पुण्याच्या जंगली महाराज रोडवरून गणेशखिंडीकडे जाणाऱ्या रस्त्याची!

परत येतांना अशा एका ठिकाणी पोचलो की, ज्या ठिकाणी दोन-चार खाड्यांचे फाटे एकत्र आले होते. दिवाडी-नावें यांच्यामधला हा भाग होता. चार रस्ते एकत्र आल्यावर शहरांतला एक चौक बनतो तसा हा 'चौक' होता. या चौकाला म्हणतात पंचगंगा. उजव्या हाताला वळून पाहिले तेव्हा लहानपणची आठवण झाली. इथे याच डोंगराच्या पायथ्याशी कृष्णजन्माष्टमीच्या यात्रेत तीर्थस्नान करायला मी आलो होतो. अन् मन एकदम तीनशे वर्षें मागे गेले. मीच नव्हे. संभाजी राजांनी १६८३ साली याच पंचगंगेच्या किनाऱ्यावर जन्माष्टमीच्या दिवशी स्नान केले होते. जुवे बेट ताब्यात घेऊन संभाजी महाराजांनी गोवा बेटावर मोर्चे लावले होते. गोवे घ्यायचेच असा कृतनिश्चय त्यांनी केला होता. याच मुक्कामाच्या वेळी जन्माष्टमीचा दिवस आला होता. महाराजांनी पंचगंगेत स्नान करायचे ठरवले. पोर्तुगीजांना बातमी कळली. त्यांनी तीनशे

सैनिक साध्या वेषात यात्रेत सोडले. संभाजीला जिवंत पकडायचा त्यांना हुकूम होता. पण या घुंगुरट्यांची पर्वा न करतां संभाजी राजे खंडोजीसह पाण्यात उतरले, स्नान केले नि सरळ निघून गेले. गोमतीच्या स्पर्शाने राजांचे शरीर पावन झाले आणि राजांच्या स्पर्शाने गोमतीच्या अंगावर शहारे उठले! राजांनी मग गोवा शहराला वेढा दिला. पण दुर्दैवाने घाटावरून मोगली संकट कोंकणात उतरले आणि राजांना वेढा उठवून परत जावे लागले. बखरकार म्हणतात, 'त्या दिवशी राजांनी गोवे घ्यावयाचेच. पण फिरंग्यांचे दैव समुद्रीं रक्षिले.'

मांडवी–जुवारीनी गोव्याच्या इतिहासांतल्या अशा रोमांचक घटना पाहिल्या आहेत! त्यांत भाग घेतलेला आहे. बाराव्या शतकात गोव्यात आक्रमक मुसलमान आले, त्यांनी आर्यधर्मांचा उच्छेद केला. दिवाडीच्या सप्तकोटेश्वराला 'उचलोनी बांधासी घातले.' पण विजयानगरच्या माधव-मंत्र्यांनी गोवा घेतला. सप्तकोटेश्वराला हिंदळे गांवात आणून वसविले. शिवाजी महाराजांनी त्याचे भव्य मंदिर बांधले. आजही ते डौलाने उभे आहे.

विजयानगरचे राज्य गेले आणि विजापूरकर आले. युसुफ आदिल-शहा गोवे घ्यायला आला आणि गोव्याच्या प्रेमात पडला. त्याने गोवा हीच आपली राजधानी करायचे ठरवले. त्याने जुन्या गोव्याला इमारती बांधल्या. पणजीला राजवाडा बांधला. पण पोर्तुगीजांनी त्याचे स्वप्न धुळीला मिळविले. मसाल्याचे जिन्नस न्यायला म्हणून भारतात आले आणि गोवे घेऊन राज्यकर्तें झाले. जुन्या गोव्यात त्यांनी अत्याचार केले. प्रथम मुस्लीमांची अन् मग हिंदूंची कत्तल केली. मांडवीचे पाणी रक्तरंजित झाले. तिने पोर्तुगीजांना शाप दिले. त्या शापांनी जुन्या गोव्याचा विध्वंस झाला. पणजीला नवी राजधानी वसली. टुमदार, छोटीशी, गोव्याच्या आंगठीवर खड्यासारखी दिसणारी पणजी. या पणजीने मुक्तिलढा पाहिला. त्यांत भाग घेतला. शीख सैनिकांचे तिनेच स्वागत केले. आदिलशहाच्या राजवाड्यासमोरील ध्वजस्तंभावर चढणारे भारतीय सेनेचे निशाण पाहून

पणजीचे डोळे भरून आले नि तिचे खारे अश्रू मांडवीच्या खाऱ्या पाण्यात मिसळून गेले!

आणि आगशी—अघनाशिनी! ती तर मांडवीहूनही अधिक भाग्यवती. तिने गोव्याचा प्राचीन इतिहास पाहिला, घडवला नि गोव्याच्या सांस्कृतिक घडामोडीतही भाग घेतला. इतिहाससंशोधक सांगतात की, आदिमानवाची संस्कृती ही मत्स्योपजीवी होती. सरितांच्या सान्निध्यांतच ही संस्कृती वाढली, बहरली आणि तिचे रूपांतर मग धान्योपजीवी संस्कृतीत झाले. गोव्यात फार प्राचीन काळी जुवारी नदीच्या अन् इतर नद्यांच्या काठावर हे संस्कृती—रूपांतर घडले आहे. आदिमानवांना मांडवी—जुवारी-तल्या माशांचा वास लागल्यामुळे ते इथे स्थिरावले. तो वास आजच्या गोवेकरांच्या नाकांना सुखवीत आहे अन् ज्या खाजनात त्यांनी शेती केली, त्याच खाजनात आज पिकत असलेले तांदूळ तो खात आहे. शीत नि माशांची कढी यांनीच गोवेकरांची प्रकृती घडवली आहे आणि याच प्रकृतीच्या बळावर त्यांची संस्कृती वाढली आहे.

म्हणूनच मी म्हणेन की, गोव्यांतल्या जुवारी—मांडवीसारख्या सरिता या केवळ जलवाहिन्या नाहीत, रक्तवाहिन्या नाहीत तर अन्नवाहिन्याही आहेत. ए पासून झेडपर्यंत व्हिटॅमिन असलेले किती प्रकारचे चवदार मासे आमच्या या नद्या—खाडयांत असतात याची कल्पना जावे त्याच्या, नव्हे खावे त्याच्या वंशाच येते! मासे समुद्रात असतात अन् मांडवी—जुवारीतही असतात. पण गोवेकरांना सागरमत्स्यांपेक्षा सरिता—मत्स्यांची प्रीती अधिक! कारण ही 'सुवादिक' असते. ती सुद्धा ठराविक ठिकाणची असली तर विचारायलाच नको! रायबंदरला पहिल्या पावसाच्या औराने लाल झालेल्या पाण्यात मिळालेली सोनेरी खवल्यांची मत्स्यराणी मुडदुशी आणि खडयांची गुबगुबीत काळवे, शिवोलीची चांदीच्या कांबीप्रमाणे लखलखणारी कर्ली, एकोशीची बिरमुट्याप्रमाणे दिसणारी मोतयाळी, मडकई—कुंडईचे भरदार अंगाचे शेवटे आणि आफ्रिकेतील 'सुलातां'च्या रंगाची काळुंदरे, साष्टीचे टणटणीत बांगडे, आगशीच्या खणखणीत

वाजणाऱ्या तिसऱ्या, कुठल्याही मानशीत गवसणाऱ्या लांब मिशांच्या वागया आणि सुंगटे यांची चव ज्यांनी रुचीने घेतली नाही ते गोवेकरांच्या लेखी अभागी!

गोव्याच्या शीत-कढीची ही पारंपरिक मुख-संस्कृती घडवण्यात कोल, गावडे, महार वगैरे अनार्य आणि आर्य जमातींचा वाटा आहे. आर्यांतल्या परशुरामाचे भृगुकुळ व श्रीकृष्णाचे यदुकुळ यांनी गोव्याच्या इतिहासाला नि संस्कृतीला आकार दिला. जुवारीच्या परिसरात भोजांनी चंद्रमंडळाची स्थापना केली. चंद्रपूर म्हणजे आजचे चांदर हे राजधानीचे शहर वसविले. सुवर्णाची द्वारका आणि सुवर्णनगरी लंका यांचा समन्वय केला. कांही वर्षांपूर्वी चांदरच्या नदीतल्या वाळूत सुवर्णाचे कण सांपडत म्हणे.

दहाव्या शतकांत कदंबांनी चांदरहून राजधानी थोरल्या गोव्याच्या आगशीजवळ नेली. जयकेशीच्या काळात गोवापुरी या नांवाने ती सर्व-प्रसिद्ध झाली. जुवारी उपसागराच्या मुखातून पश्चिम व पूर्व जगाशी व्यापार चालू लागला. राजाच नव्हे तर पंडितही सुवर्णाच्या पालख्यांतून रस्त्यात हिंडू लागले. मध्ययुगीन काळातले भारताचे पहिले आरमार गोवापुरीच्या बंदरात निर्माण झाले. आपल्या काठावर दोन समृद्ध राज-धान्यांना जागा द्यायचे भाग्य ज्या जुवारीला लाभले ती खरीच भाग्यवती नव्हे का?

आजही या दोन सरितांचे भाग्य कांही कमी झालेले नाही. मांड-वीच्या काठावरची पणजी आजही गोवा राज्याची सुंदर राजधानी म्हणून गाजते आहे अन् जुवारीवरचे मुरगांव बंदर भारतातले एक नामवंत बंदर आहे. सृष्टीसौंदर्याने या नद्यांनी व्यापलेला परिसर आजही समृद्ध आहे. जगातल्या प्रवाशांना तो साद घालतो आहे—तुम्ही मंदिरे आणि चर्चेस, समुद्रकिनारे नि बॅकवॉटर्स खूप पाहिल्या असतील. पण एकदा इथे या. मांडवीच्या किनाऱ्यावरच्या करंजाळे-मीरामार या वेळा पाहा. रोमची आठवण करून देणारी जुन्या गोव्याची चर्चें बघा, तिसवाडीतली मंदिरे

बघा, जुवारीच्या अंतर्भागातल्या तांबडी सुर्लच्या हेमाडपंती मंदिराला भेट द्या, दोना पॉलच्या टेकडीवरून जुवारी–मांडवीचा प्रीतिसंगम पाहा असे आवाहन जुवारी–मांडवी तुम्हाला एका सुरात करीत आहेत. या त्यांच्या आवाहनाला जरूर साद द्या. तुमची गोव्याची वारी फुकट जाणार नाही! गोवेकरांनाही त्या हेच सांगत आहेत. या गोष्टी पाहा नि तृप्त व्हा. त्या पाहिल्या नाहीत तर तुम्ही तुम्हालाच ओळखले नाही असे होईल.

● ●

# ७ : व्यसने आणि छंद

माझा उजवा खांदा घुसळला गेला आणि उजव्या कानाच्या पडद्यावर बॉम्बस्फोटाचा आवाज आदळला !

मी खाडकन् डोळे उघडले.

उजव्या बाजूच्या खुर्चीजवळ मित्र उभा होता.

' काय झालं ? ' मी विचारलं.

' कुठं काय झालं ? ' तो म्हणाला, ' सारी माणसं निघून गेली. मीही वधुवरांना भेटून आलो. पण पाहातो तर तुझ्या हातांतल्या आईस्क्रीमचं पाणी झालंय नि तू डोळे मिटले आहेस. म्हणून तुझ्या कानात विचारलं, तुझी तब्येत एकाएकी बिघडली की काय ?'

मी आजूबाजूला डोळे वळवून पाहिलं. समोरच्या मेघडंबरीत वधुवरांची जोडी बसली होती. कबुतरांसारखी एकमेकांच्या कानाशी तोंडं नेऊन कुजबुजत होती. अवतीभवती स्त्रीपुरुषांची गर्दी होती. हॉलमधील खुर्च्या मात्र अर्ध्याअधिक रिकाम्या झाल्या होत्या !

मला ओशाळल्यासारखे झाले अन् मी पटकन् उठलो. हातांतलं आईस्क्रीम बाजूच्या खुर्चीवर ठेवून दिलं.

' काय झालंय तुला ? आईस्क्रीम कां नाही खाल्लंस ? ' मित्राचा प्रश्न. ' वधुवरांना भेटून येतोस ना ? मी थांबतो बाहेर गाडीत. '

'नको. तू जा. मी थांबतो थोडा वेळ. मागून बसनं येईन.'

मित्र निघून गेला. तो निघून गेला; पण त्यानं दोन वेळा केलेला 'काय झालंय तुला?' हा प्रश्न अनुत्तरित राहिलाय हे त्याच्या लक्षातच आलं नव्हतं. त्यानं तिसऱ्यांदा तो प्रश्न विचारला नाही याचं मला समाधान झालं.

खरंच! असं काय घडलं होतं त्या लग्नसमारंभात की, अशी तास मी स्वतःला हरवून बसलो होतो?

घडलं होतं ते हे की, लग्नमंडपाच्या आवारात प्रवेश करतांच बिस्मिल्लाखांच्या सनईच्या मंदधुंद स्वरांनी आमचं स्वागत झालं होतं. बँडबाजाची आरडाओरड आणि लाऊडस्पीकरवरून आसमंत प्रदूषित करणारा फिल्मी गीतांचा गोंधळ यांचा संपूर्ण अभाव होता.

रिसेप्शन हॉलमधल्या खुर्चीवर येऊन बसलो तो एका धुंदीतच. बिस्मिल्लांच्या सनईला साथ करणाऱ्या ढोलकची लय वाढली होती आणि बिस्मिल्लांची विशिष्ट शैलीतली आवर्तने धून संपत आल्याचं सुचवीत होती.

बिस्मिल्लांची धून फेडआऊट झाली आणि कांही सेकंदांच्या आंतच रविशंकर व व्ही. जी. जोगांच्या जुगलबंदीच्या धुंद सुरांनी कपाळावर कुणीतरी मोरपीस फिरवल्यासारखे वाटले! रविशंकरांचे मिंड काम सुरू झाले. तो आवाज मंद झाला आणि व्हायलीनमधून तेच स्वर जशाचे तसे बाहेर पडू लागले. आणि मग माझे जमिनीवरून आधीच सुटलेले पाय अधांतरी लोंबकळू लागले! खुर्चीची बैठक नाहीशी झाली. एका अपार्थिव, अदृश्य, अमानवी विश्वात मी तरंगू लागलो! ज्या जगात माणसे नाहीत, त्यांचे राग-लोभ, द्वेष-मत्सर, नातीगोती, कामधंदा नाही अशा एका अनामिक जगात!

या स्थितीतून बाहेर पडून मित्राच्या गाडीतून मला पणजीला जायचे नव्हते. बसमधल्या गर्दीच्या एकांतांत मला आणखी कांही वेळ तरी बिस्मिल्ला, रविशंकर, व्ही. जी. यांच्या साथसंगतीत प्रवास करायचा

होता. बसमधल्या वरच्या दांडीला लोंबकळून! लोंबकळणाऱ्या, निसट-णाऱ्या सुरांना मुठीत पकडण्याचा प्रयत्न करून!

म्हणूनच मी मित्राला म्हटले होते, 'तू जा. मी थांबतो थोडा वेळ. मागून बसनं येईन.'

आजचा हा अनुभव तसा कांही मला नवीन नव्हता. पस्तीसेक वर्षांपूर्वी मुंबईच्या कावसजी जहांगीर हॉलमध्ये चोवीस तासांची एक अखंड संगीतसभा आयोजित करण्यात आली होती. सकाळी सातला बिस्मिल्लांच्या सनईने ती सुरू होणार होती आणि दुसऱ्या दिवशी सकाळी कुणाच्या तरी भैरवीने संपणार होती.

साडेसहालाच मी हॉलमधील माझी खुर्ची पकडली. जसजसे संगीत-सृष्टींतले राजे-महाराजे प्रवेशद्वारांतून पुढल्या रांगांकडे जाऊं लागले तसे त्यांचे उत्स्फूर्त स्वागत होऊं लागले. या स्वागतात अर्धा तास कसा गेला कळलेच नाही. आणि अचानक स्टेजवरून सनईतून निघणाऱ्या सुषीर स्वरांनी सारा हॉल गजबजून गेला. मी स्टेजवर पाहिले, पन्नाशीच्या घरातले दोन काटकोळे इसम लांबच लांब अशा दोन सनयांतून सुरांची कारंजी आसमंतात उडवीत होते. भारताचे सुषीर वाद्यांतले अग्रमानाचे अधिकारी खांसाहेब बिस्मिल्लाखां आणि त्यांचे बंधू. त्यांना प्रत्यक्ष पाहायची, ऐकायची ही पहिली संधी. सारी इंद्रिये कानात नि डोळयांत गोळा करून ती सनई मी काजळात साठवू लागलो.

आणि सनईचे ते जीवघेणे सूर तीरासारखे काजळात घुसत असतां-नाच जमिनीवरचे पाय सुटू लागले! हलक्या वायूने भरलेले बलून अलगद आकाशात चढावे तसा मी हवेत तरंगू लागलो! दशदिशांनी अंगावर येणाऱ्या सुरांच्या वक्र आवर्तात विरघळून गेलो!

त्यानंतर अनेक वेळा मी बिस्मिल्लांना प्रत्यक्ष ऐकले, त्यांच्या ध्वनिमुद्रिका ऐकल्या. पहिल्या वेळेइतका तीव्र नसला तरी ह्याच जातीचा अनुभव येत गेला. हा अनुभव मन उत्तेजित करणारा, तितकाच तृप्त करणारा होता, मनाला शांती देणारा होता.

पण बिस्मिल्लांची सनई किंवा रविशंकरांची सतार ऐकून मनाला भिडणारा हा अनुभव सिगार म्हणजे चिरूट ओढल्याने येतो हे तुम्हाला माहीत आहे का? निदान मला तरी आला आहे. फार जुनी गोष्ट आहे. ४५ वर्षांपूर्वीची. त्यावेळी मी कॉलेजात होतो. अन् माझा एक श्रीमंत मित्र होता. आम्ही दोघेही नवी नवलाई म्हणून सिगारेट ओढायला प्रारंभ केला होता. त्या मित्राचे वडील हवाना चिरूट ओढीत होते. एक दिवस त्याने दोन चिरूट आणले. मी एक तोंडात घातला, दुसरा त्याने. धोबी-तलाववरल्या इराण्याच्या हॉटेलात चहापानाबरोबरच आमचे हे धूम्रपानही चालू होते.

पंधरा मिनिटे गेली आणि आमची विमाने वर चढू लागली. अर्ध्या तासाने अर्धा चिरूट संपल्यावर आम्ही स्वर्गात पोचलो! आम्हाला हॉटेलातली माणसे दिसत नव्हती, पोऱ्यांचे 'तीन पावणा', 'दो पानी कम और दो मस्का स्लाईस' हे शब्द ऐकू येत नव्हते; कारण पृथ्वीवरचा आमचा संबंधच सुटला होता! डोळ्यांवर साय आली होती, कानांवर मृदंगाच्या ठेक्यांचा आवाज आदळत होता, गात्रे सैल सैल झाली होती आणि हत्ती रोग झाल्यावर पाय जड व जाड होतात तसा आमच्या पाव-लांना जडपणा आला होता!

आणि तरीही गंमत अशी होती की, आमचा मेंदू कमालीचा तल्लख बनला होता. कधी सुचल्या नव्हत्या अशा विलक्षण मौलिक कल्पना सुचत होत्या. वर्गभगिनींशी बोलायला कोणते निमित्त शोधावे अशा विवंचनेत नेहमीच असणाऱ्या मला कितीतरी कन्व्हिन्सिंग कारणांचा शोध लागला होता! माझ्या मित्रावर अर्ध्या सिगारचा काय परिणाम झालाय हे समजून घ्यावं म्हणून मी विचारलं, 'वेल सोराब, हाऊ डु यू फील?'

'आय फील दॅट आय ॲम इन हॅवन. घणी मजा आवी यार.' तो डोळे वर छताकडे लावीत उत्तरला.

माझा हा मित्र सोराब पारशी होता.

हातातल्या अर्ध्या जळल्या चिरूटाकडे पाहात मग आम्ही पंधरा

मिनिटे स्वस्थ बसलो. अर्ध्या चिरूटाने आम्हाला स्वर्गात नेले. सबंध चिरूट कुठे घेऊन जाईल याची कल्पना येत नव्हती.

इराण्याचे आमच्याकडे लक्ष होते. त्याने आपण होऊन आमच्या टेबलावर पुडिंग आणि चहा पाठवला. आणखी अर्ध्या तासाने हॉटेलमधून आम्ही बाहेर पडलो.

बाहेर पडलो आणि आठवण झाली. कित्येक वर्षांपूर्वी असाच एकदा मी स्वर्गाच्या पायऱ्या चढलो होतो आणि देवगुरु बृहस्पतीप्रमाणे वाचाविद् झालो होतो.

मी सात वर्षांचा असतांना आमच्या घरी एक कन्नड ज्योतिषी आले होते. बरेच दिवस ते राहिले. एक दिवस त्यांनी दोनचार शेर दुधाची ऑर्डर दिली. नंतर छोट्या खलबत्त्यांत कसला तरी मसाला कुटला. तो दुधात घातला. दोन पातेल्यांतून दूध वरखाली केले. कांही वर्षांनंतर कळलं की, या क्रियेला दूध चढवणं म्हणतात. त्या वयात ज्योतिषीबुवा असं कां करतात हे कळलं नाही.

मग ते आंघोळ करून आले. आपला छोटा देव्हारा त्यांना दिलेल्या खोलीत मांडला होता. देव्हाऱ्यात महादेवाचा फोटो होता. महादेवाची पूजा करून त्यांनी त्या दुधाचा नैवेद्य देवाला दाखवला.

मी हे सारे पाहात होतो. त्या दुधातले थोडे दूध प्रसाद म्हणून ज्योतिषीबुवा मला देतील असे मला वाटले होते. पण ते पातेल्यावर झांकण ठेवून निघून गेले. माझ्यावर एक तीव्र कटाक्ष फेकून. आमच्या घरी तशी दूधदुभत्याची चंगळ होती. पण ते मसाल्याचे दूध मला खुणावत होते. देवाचा प्रसाद आपण ग्रहण केलाच पाहिजे असे माझे मन मला बजावून सांगत होते.

तिन्हीसांजा झाल्या आणि मला संधी मिळाली. घरांतून एक पेला आणून मी त्यांत पातेल्यातले अर्धा पेला दूध ओतले व पिऊन टाकले.

थोड्या वेळाने मी मी उरलो नाही. मी कुणीतरी वेगळा आहे असे

वाटू लागले. आईने जेवायला बोलावले तेव्हां पानावर बसून म्हणे मी घडाघड उजळणी म्हणत होतो. सारी रात्र दुसऱ्या इयत्तेच्या पुस्तकांतले धडे 'वाचत' होतो. रामरक्षा म्हणत होतो. कविता कधीही सुरावर म्हणू न शकणारा मी गाणी म्हणू लागलो.

घरांतल्या माणसांची पाचावर धारण बसली. ताप न येतांही मला भ्रम झाला होता! ज्योतिषीबुवांनी माझा आजार ओळखला व आईवडिलांना धीर दिला. कुंडली मांडून मी सकाळी पूर्ण बरा होईन असे छातीवर हात मारून सांगितले.

आणि दुसऱ्या दिवशी सकाळी माझे देवगुरु बृहस्पतीपद नाहीसे होऊन मी पुन्हा एक सर्वसामान्य बुद्धीचा विद्यार्थी झालो! आणि मग ज्योतिषीबुवांकडून कळले की, मला देवगुरु केले होते ते त्यांच्या शांभवीने! भांगेने!

पण पृथ्वीवरचे पाय सोडून अंतराळात विहार करायला लावणारे आणि नसलेली प्रतिभा कांही काळ तरी निर्माण करणारे व असलेली प्रतिभा उत्तेजित करणारे सर्वपरिचित साधन म्हणजे मद्य. व्यावहारिक भाषेत दारू. या दारूला १९६२ पर्यंत मी स्पर्श केला नव्हता. १९४६ मध्ये नाशिकच्या एका लेखकाचे पुस्तक मी प्रसिद्ध केले तेव्हां नाशिकच्या एका थोर कलावंताने आपल्या स्टुडियोत मला पार्टी दिली. पार्टीला बहुतेक स्थानिक साहित्यिक उपस्थित होते. टेबलावर भजी आणि व्हिस्कीची बाटली आली तेव्हां हे असले कांही मला चालत नसल्याचे मी सांगितले. तेव्हां यजमान म्हणाले, 'अहो, आम्हालाही हे असलं नेहमी चालत नाही. पण आज तुमच्यासाठी हा खास बेत केला. तुम्ही गोव्याचे म्हणून.' पण गोवेकर दारू पिणारे असतात हा भ्रम असल्याचे सांगून त्या पार्टीचा मी बेरंग केला!

त्यानंतर पंधरा वर्षे मुंबईतल्या व्हिस्कीप्रिय साहित्यिकांच्या वर्तुळात वावरूनही मद्याच्या मोहात कधी पडलोच नाही. स्वतःच्यातला प्युरिटॅनिझम गोंजारावा म्हणून नव्हे, मद्यपी मित्रांबद्दल तिरस्कार वाटत होता म्हणून नव्हे, तर मद्याबद्दल कधी आकर्षण वाटले नाही म्हणून.

पण एक दिवस असा आला की, स्त्रीदाक्षिण्यामुळे हा नवा अनुभव घ्यावा लागला. दैनिक गोमन्तक सुरू करण्यासाठी टाईम्स ऑफ इंडियातले एक जुने मशीन ( शिलाईचे नव्हे छपाईचे ) मला विकत घ्यायचे होते व त्याची तपासणी एका तज्ञाकडून करून घ्यायची होती. हा अँग्लोइंडियन तज्ञ कुलाब्याला राहात होता. कामावरून तो संध्याकाळी सहा वाजतां घरी येत होता. मी साडेसहा वाजतां त्याच्या घरी गेलो. तज्ञ आला नव्हता. 'आत्ता येतील, थोडा वेळ बसा' असे त्याची लाल-गोरी तरुण बायको मला सांगत होती. पण दीड तास उलटला तरी तज्ञाची स्वारी घरी आली नाही. मी अस्वस्थ झालो होतो. बाई आंतबाहेर करत होती. औपचारिक गोष्टी केव्हाच संपल्या होत्या. माझं काम महत्त्वाचं आहे आणि ते दुसऱ्याच दिवशी व्हायला हवं याची तिला जाणीव होती. आणि म्हणून मला आणखी थोडा वेळ गुंतवून ठेवावं म्हणून ती म्हणाली, 'वुड यू लाईक टु हॅव सम हॉट ड्रिंक सर ?'

क्षणाचाही विलंब न लावता मी उत्तरलो, 'थँक यू मॅडम. बट धीस ईज नॉट द प्रॉमर टाईम फॉर अ हॉट ड्रिंक.'

रात्रीच्या जेवणापूर्वी चहाकॉफी घेतली तर मला झोप येत नाही म्हणून तो नकार मी दिला होता.

'ओऽह !' असा तिने उद्‌गार काढला आणि एखाद्या मुलाची समजूत घालतात तशा स्वरात ती म्हणाली, 'सध्या हिवाळा आहे. रात्रीचे आठ वाजले आहेत. हवेत गारवा आहे. खरं तर हॉट ड्रिंक घ्यायची हीच वेळ अ हे.'

आणि मग माझ्या डोक्यात एकदम ट्यूब पेटली. हॉट ड्रिंक म्हणजे गरम चहा-कॉफी नव्हे. जे आधी थंडगार असते आणि पोटांत गेल्यावर शरीर गरम करते ते हॉट ड्रिंक !

माझ्या होकार-नकाराची वाट न पाहाताच बाई घरांत गेली. पांचच मिनिटांत तिने पाण्याच्या रंगाचा, लिंबाची कापे तरंगत असलेला ड्रायजीनचा सोड्यासह तयार केलेला ग्लासभर द्रव समोरच्या टिपॉयवर ठेवला. दुसरा एक तसलाच ग्लास तिने स्वतःसाठी आपल्या डाव्या

हातात घेतला होता.

आम्ही दोघांनीही ग्लासाचे काठ एकमेकांना भिडवले आणि 'टु द स्वीट कोल्ड इव्हिनिंग' असे तिने म्हटले तेव्हां मी स्मित केले.

ड्रायजीनचा पहिला सुवासिक घोट मी घशाखाली लोटला व ग्लास टीपॉयवर ठेवला. घोडा घोडा म्हणतात तो कसा असतो असा प्रश्न रामपुत्र कुश-लवांना पडला होता, त्याचे उत्तर यज्ञीय घोडा पाहून त्यांना मिळाले होते. माझीही गत अशीच झाली होती. दारू दारू म्हणतात ती अशी असते!

तश येईपर्यंत दोन दोन ग्लास आमच्या पोटांत गेले होते. बाई बोलत होती आणि माझीही जीभ आता सैल सुटली होती. शरीरातली नसन् नस मोकळी झाली होती. कानशिले गरम झाली होती. मेंदू उत्तेजित झाला होता. नवनव्या कल्पना डोक्यात घोळू लागल्या होत्या. प्रतिभेला पंख फुटले होते. साऱ्या शरीरात एक अनोखे चैतन्य निर्माण झाले होते. देहाची जडता नाहीशी होऊन वेटलेसनेसची अवस्था आली होती आणि मनाचे पाखरू चंद्राच्या दिशेने झेप घेत होते!

दारूबंदीचे ते दिवस होते. पब्लिकमध्ये तोंडाचा वास आला तर पोलिसांना दारूबाजाला अडकावण्याचा अधिकार होता. म्हणून बसचा नाद सोडून सरळ टॅक्सी करून घरी आलो.

हा पहिला प्याला घेतला म्हणून मी मद्यपी झालो नाही. पहिला प्याला अनेकांच्या बाबतीत तरी जीवनाच्या अखेरीचा प्रारंभ ठरत नाही. सर्व प्रकारच्या मद्यांचा मोठमोठ्या हॉटेलांतून आस्वाद घेऊनही मला मद्याचे आजही आकर्षण नाही. सबंध भारतात आणि गोव्यांतही दारूबंदी आली तर तिचे मी स्वागतच करीन. कारण या व्यसनाचे दुष्परिणाम आर्थिक दृष्ट्या दुर्बल असलेल्या समाजातील घटकांवर कसे होतात याची भयानक दृश्ये मी पाहिली आहेत. श्रमजीवि वर्ग श्रमपरिहारासाठी आणि भूक मारण्यासाठी मद्याच्या आहारी जातो तर आर्थिक दृष्ट्या संपन्न असलेला घटक भूक लागण्यासाठी ॲपेटायझर म्हणून मद्यसेवन करतो. हा फरक म्हणजे आपल्या देशातील विषमतेचे विदारक उदाहरण आहे.

पण या मद्यपानाला आणि सिगार–सिगरेटच्या पानाला एक वेगळी बाजूही आहे. त्यांचे आणि कलांचे एक नाते आहे कलानिर्मितीसाठी कलावंताच्या बुद्धीला धार आणणे हेही त्यांचे एक कार्य आहे. जगातल्या अनेक कलावंतांची प्रतिभा मद्याच्या नशेशिवाय उत्तेजित होत नाही. मद्यपान हे व्यसन खरेच. पण या व्यसनाने अमर कलाकृती निर्माण होत असतील तर त्याच्या व्यसनाकडे मी दुर्लक्षच करीन. कला फुलविणाऱ्या या कलावंतांप्रमाणेच संवय म्हणून, आरोग्यवर्धन म्हणून आणि ॲपेटायझर म्हणून मितपान करणाऱ्यांना त्यांच्या या छोट्याशा सुखापासून वंचित करू नये.

या व्यसनांनी सामान्य मनुष्य दुःख विसरतो. कांही काळ तरी पृथ्वीवरून त्याचे पाय सुटतात आणि तो स्वर्गसुखाचा आस्वाद घेतो. पण ही दुःखविस्मृती, हे स्वर्गसुख क्षणिक असते. बुद्धीची तरलता आणि प्रखरता हाही अल्पकाळाचाच खेळ असतो. त्याने मानवाची बुद्धी कायमची प्रखर व प्रगल्भ होत नाही की मनाचेही पोषण होत नाही. हे पोषण होते, मन विशाल होते आणि उल्लेखित व्यसनांनी जो तात्पुरता आनंद मिळतो, तशासारखाच पण अधिक काळ टिकणारा आनंद लाभतो तो छंदांनी. सुरांच्या तुषारांनी, तालाच्या ठेक्याने, नृत्याच्या झंकाराने आणि रंगांच्या तुषारांनी चैतन्य आणि उद्दीपनाबरोबरच शांती आणि तृप्ती यांचाही एक विलक्षण प्रत्यय येतो. म्हणूनच रविशंकरांची सतार, अली अकबरची सरोद, व्ही. जीं. चे व्हायलिन किंवा बिस्मिल्लांची सनई कुठल्या तरी घराच्या खिडकीतून सुरांचे तुषार फेकू लागली की माझे पाय रस्त्यावरच थबकतात, मी चालायचं विसरून जातो आणि वरवर जाणाऱ्या धुरांच्या वलयांप्रमाणे सुरांच्या वक्र वलयात गुरफटून हवेत तरंगू लागतो !

# ८ : शेंवतूचे दुःख

राजवैभवात वाढलेल्या, दारिद्र्य, वृद्धत्व आणि मृत्यू या जीवनातल्या तीन महान् दुःखांपासून नेहमीच दूर ठेवलेल्या बुद्धाला उपरती कशी झाली, या विषयावर एक फीचर लिहून पाठवा अशी आकाशवाणीच्या अधिकाऱ्यांनी मला विनंती केली होती. कॉंट्रॅक्ट फॉर्म सही करून पाठवला होता रेकॉर्डिंगचा दिवस जवळ आला होता. आज ते लिखाण लिहून हातावेगळे करायलाच हवे होते. आणि ज्या विषयावर लिहायचे त्या विषयावरची एकदोन तरी अधिकृत पुस्तके वाचल्याशिवाय लिहायचे नाही अशी माझी पद्धत असल्यामुळे काल मी बुद्धचरित्रावरची दोनतीन पुस्तके वाचून टाकली होती. मनाने मी अडीच हजार वर्षांपूर्वीच्या काळात शिरलो होतो. गौतमाच्या मानसिक परिवर्तनाला नाट्यरूप कसे द्यावे याची योजना मनात तयार होती. फीचर फार चांगले होईल असा विश्वास वाटत होता.

आज सकाळी नेहमीप्रमाणे पहाटे पाचला उठलो. चहा घेतला आणि लिहायला बसलो. पण ज्या आत्मविश्वासाने आज मी लिहायला बसलो होतो त्याने कुठे अन् कशी दडी मारली हेच कळेनासे झाले! तीन वेळा वेगवेगळ्या प्रकारे सुरवात केली आणि तिन्ही कागद फाडून टाकले. एका भोवऱ्यात मन सापडले होते. मेंदू भिरभिरत होता. चौथ्या कागदावर प्रयत्न करूनही अक्षरे उमटत नव्हती. कालच्या, परवांच्या, गेल्या

महिन्यातल्या, वर्षामागच्या घटनांच्या भुतांनी मला धरले होते. ती विचारत होती, कशासाठी लिहितो आहेस तू हे? बुद्धाच्या मानसिक यातनांवर प्रकाश टाकण्यासाठी? बुद्धाच्या निमित्ताने आजच्या जगातली दुःखे वेशीवर टांगण्यासाठी? दिसामाजी काहीतरी ते लिहावे हा रामदासांचा संदेश अंमलात आणून स्वत:च्या मनाचे समाधान मिळविण्यासाठी? की रेडियोचा चेक पदरात पाडून घेण्यासाठी?

या प्रश्नांना माझ्याजवळ उत्तरे नव्हती.

काल संध्याकाळी एका मित्राच्या वाढदिवसाच्या पार्टीला गेलो होतो. खाणेपिणे झाले होते. गप्पाटप्प्यात, थट्टाविनोदात, मौजमजेत वेळ गेला होता. सातला घरी आलो. रात्री जेवायचे नाही असे सांगूनआरामखुर्चीवर पडलो. रेडियो चालू होता. कुणा बाईची मुलाखत चालू होती. कानावर काही वाक्ये पडली आणि मी सावरून बसलो.

प्रश्नकर्ती विचारत होती, 'मग तुझा संसार कसा चालतो शेवतू? नवरा तर घरीच बसून असतो म्हणतेस तूं'

'कसा चालतो ते एका देवाला माहीत!'

'देवाला सारं काही कळतं. तुझाही संसार कसा चालतो तेही त्याला माहीत असणारच. पण नवरा कमवीत नाही, चार मुलं पदराला, अन् तुझ्यासारखी कर्तबगार बाई खंबीरपणे घरसंसार चालवते हे रेडिओ ऐकणाऱ्या हजारो लोकांना कळायला नको का? तुझं उदाहरण पाहून तुझ्यासारख्या संकटात सापडलेल्या गरीब बायकांना धीर येईल. मग सांग बघूं तुझी हकीकत. तुझा नवरा घरी कां बसून राहातो? तो आजारी असतो का? त्याचं...'

मुलाखत घेणाऱ्या बाईचे वाक्य पुरे होण्यापूर्वीच शेवतू उसळून म्हणाली, 'नाव काढूं नका मेल्याचं! मेला असता तर सुटले असते. लहानपणी लग्न झालं तेव्हां किती चांगला होता. माझ्या मागं मागं घोटाळायचा. कोळंबीवर कपडे धुवायला गेले तर कारण नसतांना तिथे

यायचा. इस्तरी आपण होऊन तापवून द्यायचा. किती लाड केले त्यानं माझे...' शेंवतूच्या आवाजातला सुरवातीचा राग आता नाहीसा झाला होता आणि त्याकाळच्या आठवणीने हेलावून गेल्यासारखी ती बोलत होती.

'म्हणजे तुमचा व्यवसाय मडवळाचा होता वाटतं?' प्रश्नकर्तीचा प्रश्न.

'होता म्हणजे काय? आतांही आहेच. शेंवतू म्हणाली. आतां मीच गावात कपडे गोळा करायला हिंडते. घुडाला मीच घालते, मीच इस्तरी करते, मीच घरोघरी पोचवते.'

'चार पैसे सुटतात ना?'

'कसले चार पैसे! हल्ली लाव्होंदाऱ्या झाल्यायत ना सर्वकडे? तिथे आठ आठ आणे नगाला देऊन माणसं कपडे धुवून घेतात, पण मला चार आणे कुणी देत नाही. वीस रुपये शेकडा दर परवडतो का मावशीबाय, तुम्हीच सांगा. खार, साबण, नीळ किती महाग झाला आहे!'

'मग कसा काय संसार चालतो तुझा?' मागचाच प्रश्न प्रश्नकर्त्या बाईने पुन्हा बिचारला.

'कसं नी काय सांगू वयनीबाय!' चार पोरं, नवरा नी मी. घरात सहा माणसं. सहा माणसांच्या रेशनलाच म्हैन्याला साठ रुपये लागतात. ते सुद्धा सगळे गंव आणले नाहीत तर. शिवाय मीठ–मिरची आहे, नारळ आहे. तीन दगड मांडले म्हणजे काय लागत नाही संसाराला? मासळी तर इतकी महागलीय की दररोज पोरं कडवणाला कंटाळतात. भाजीला तर हात घालायची सोय नाही. मग शेजारच्या भाटकान्नीकडून कधी कालवण, कधी सुका बांगडा, कधी दोणातली आमली घेऊन येते. सकाळच्या पारी पोरांना चहा हवा असतो. कुठून देऊं त्यांना चहा? मग पेजेवर भागवते. माझी पोरं सुद्धा गुणी हो! माझ्याच वळणावर गेलीयत.'

'मुलांना शाळेत घातलंय ना?'

'लहानग्या दोघांना घातलंय. मोठी मुलगी चिमू. तिच्या पाठीवर दोन वर्षांनी नारायण झाला. मग एका वर्षानं कमळा झाली. मग तीन वर्षांनी सगळयात धाकट्यात बच्चन.'

'बच्चन?'

'अहो तो कोण सिनेमातला माणूस आहे म्हणतात. तर एक दिवस माझा घरकारी गेला सिनेमाला. अकरा दिवस झाले होते मला बाळंत होऊन. हा घरी आला आणि हट्ट धरून बसला मुलाला बच्चन नाव ठेवायचं म्हणून. मी म्हटलं, हे कसलं नाव? मी नाही ठेवणार हे नाव. तर मेल्यानं अकरा दिवसांच्या बाळंतिणीला मार मार मारलं हो! दुसऱ्या दिवशी घरी राहिला, आपणच साखर वांटली नी सांगायला लागला मुलाचं नाव बच्चन ठेवलंय म्हणून मग काय करायचं? नवऱ्यानं मारलं अन् पावसानं झोडपलं तर कुणाला सांगायचं?'

'म्हणजे नवरा मारतो की काय तुला?'

'नवऱ्यानं बायकोला मारलं तर त्यात इप्रीत कसलं वैनीबाय? पण हा दारू पिऊन मारतो हो.'

'पण पूर्वी लग्न झालं तेव्हां तर चांगला होता म्हणता तुम्ही! मग दारूचं व्यसन कसं लागलं त्याला?'

'त्याचं काय झालं बाई, हा कपडे पोचवायला जात होता ना घरोघरी. हे मडवळाचं काम भारी कटकटीचं. नवऱ्यानं कपडे आणायचे, पोचवायचे, घुडाला घालायचे, अन् मी ते धुवायचे, वाळवायचे, इस्तरी करून घड्या करायचे अशी आम्ही वांटणी केली होती कामाची. तर एक दिवस काय झालं, एका श्रीमंताच्या घरी कपडे पोचवायला गेला. सकाळी सकाळी. तर घरमालक अगदी खुषीत होता. त्याला नातू झाला होता. पहिल्या दिवशी रात्री म्हणे मोठी मेजवानी झाली होती. हा गेला तेव्हां तो भाटकार बायकोला म्हणाला, 'जा ग, कालच्या जिलब्या, लाडू

शिल्लक राहिल्या आहेत ना, त्या दे ह्याला. भरपूर दे. खाऊं दे याच्या पोरांना पोटभर.' आणि मग भाटकाराने कोपऱ्यातल्या बाटल्यातली एक बाटली उचलली नी माझ्या घरकाराला देऊन म्हटले 'ही पण घेऊन जा. संध्याकाळी यांतली दोनतीन घोट पी. पाणी घालून चांगली कडकडून भूक लागेल.''

'मग पुढे काय झालं?'

'पुढे काय होणार! संध्याकाळी ह्यानं चांगली अर्धा कोष बाटलीतलं ते औषध घेतलं आणि खूपसं खाऊन सारी रात्र मेल्यासारखा पडून राहिला. दुसऱ्या दिवशी प्याला. मग ते औषध प्यायची संवय झाली. तसली एक बाटली विकत आणावी म्हणून बाजारात गेला. तर तर काय हो?'

'काय झालं?'

'तर ती बाटली पाहून फार्मसीवाला म्हणाला ही बाटली आमच्याकडे मिळत नाही. आणि मिळाली असती, तर तू घेणार कशी! याची किंमत आहे दीडशे रुपये!'

'एका बाटलीची किंमत दीडशे रुपये?' प्रश्नकर्तीने विचारले. 'असली कसली बाटली होती ती!' बाईच्या सुरावरूनच मी ओळखले की तिला ती बाटली कसली होती त्याची कल्पना आली होती.

'अहो, ती दारूची बाटली होती. आणि आपल्याकडली नव्हती फारीन होती म्हणे. आणि मग दीडशे रुपयांची बाटली परवडेना म्हणून ताव्हेर्नात जायला लागला. दारूची इतकी सवय लागली की एक वेळ जेवण नसलं तरी चालतं, पण ते तांबडं पाणी घेतल्याशिवाय चैन पडेनासं झालं. कामधाम सोडून दिलं. संसाराचा भार माझ्यावर पडला. वर आणखी दारूला पैसे माझ्याकडे मागूं लागला. पैसे दिले नाहीत तर मारूं लागला. हे थोडं म्हणून वाट्टेल तेव्हां मला अंगाखाली ओढायला लागला. पोरांच्या देखत हा तमाशा नको म्हणून मोठ्या

मुलाला वहिणीकडे ठेवला. दुसरीला मावळणीकडे पाठवून दिली. रानात जाते, गोवऱ्या थापते त्यामुळे मावळणीलाही ती जड वाटत नाही. धाकट्या पोरांना काय कळतं? ती बिचारी हा घरी आला म्हणजे कोंबड्यांच्या पिल्लांसारखी गुपचुप पडून राहातात. तर अशी आहे माझ्या संसाराची कर्मकहाणी.'

मग प्रश्नकर्त्या बाईने मुलाखत आटोपती घेतली. ती म्हणाली, 'बरं तर. तुम्ही मुद्दाम इथं येऊन अनुभवाचे चार शब्द सांगितले म्हणून मी तुमचे आकाशवाणीच्या वतीने आभार मानते. पुढे भेटूंच केव्हा तरी.'

किती शुष्कपणाने बाईने या मुलाखतीचा ठराविक पद्धतीने समारोप केला होता! मला चीड आली. चीड आली ती मुलाखत घेणाऱ्या बाईची, मुलाखत देणाऱ्या शेंवतूची, ज्या भाटकाराने शेंवतूच्या नवऱ्याला फॉरेन व्हिस्कीची बाटली दिली त्याची, ज्या मित्राच्या घरी ओली पार्टी झोडून मी काल घरी आलो होतो त्या मित्राची आणि ज्या समाजात ही सारी माणसे वावरतात, त्या समाजाची!

रेडिओ ऑफ करून मी डोळे मिटून पडून राहिलो. शेंवतूने आपल्या संसाराचे वर्णन केले होते. असल्या अनेक संसारांचे एक प्रातिनिधिक दृश्य म्हणून रेडियोने ही मुलाखत पेश केली होती! पण किती श्रोत्यांच्या काळजापर्यंत जाऊन ती भिडली होती? कित्येकांनी तर ती मुलाखत सुरू होतांच रेडियो बंद केले असतील किंवा विविध भारती ट्यून केली असेल. शेंवतूपेक्षा एकाद्या शेवंतीबाईची मुलाखत घेऊन स्वेटरच्या विणा, किंवा एकाद्या नव्या डिशची माहिती रेडियोने द्यायला हवी होती म्हणून कुरकूर केली असेल. त्यांचेही खरेच आहे! दररोज हलके-फुलके खायला काय करायचे? मासळी महाग झाली म्हणून काही बिघडत नाही हो! पण ती मिळत नाही ना? मग दररोज काय करायचे? दमूनभागून घरी जेवायला आलेल्या पतिराजांना, कॉलेजात शिकणाऱ्या युवराजाना पानावर चार सुग्रास पदार्थ तर वाढले पाहिजेत!

फार मस्ती चढलीय या नुस्तेंकान्नींना. आठ रुपये रत्तल मुडदुशा म्हणजे काय झालं ? घरातली पोरगी दीड दिवसाच्या गणपतीला म्हणून जाते ती आठ आठ दिवस उगवतच नाही ! वेळेवर धोबीण कपडे आणत नाही, आणले तर फाडून आणते म्हणून लाँड्रीत कपडे द्यावे लागतात. वीस रुपये शेकडा दर म्हणे या मडबळणीला परवडत नाही !

आरामखुर्चीवर पडल्या पडल्या मला सोफिस्टिकेटेड समाजातल्या गृहिणींच्या या अडचणींची आठवण झाली. या अडचणींचा पाढा माझ्या नी माझ्या मित्रांच्या घरी अनेक वेळा ऐकला होता. काल‌च्या पार्टीतही पार्टीच्या तयारीसाठी किती श्रम नी खर्च करावा लागला, शेवटे मिळविण्यासाठी किती आटापिटा करावा लागला, मटण हॉटेलांतून आणायला कशी धावपळ करावी लागली, सैंपाक करायला आचारी बोलावला तर कसा उशीरा आला अशा तक्रारी मित्राकडून ऐकल्या होत्या. एक पार्टी द्यायची तर किती अनंत अडचणी ! या अडचणी ऐकून आम्ही भारावून गेलो होतो आणि चिंताग्रांतही झालो होतो ! आणि या चिंतेला प्रयत्नाने दूर सारून व्हिस्कीचे प्याले हातात घेत मित्रांचे शुभचिंतन केले होते !

शेवतूची मुलाखत संपली तेव्हा कालचा हा सारा प्रकार मला आठवला, हायब्रो समाजांतल्या गृहिणींच्या अडचणी आठवल्या आणि मी एकदम पत्नीला हाक मारून म्हटले, ‘अग, हे बघ, उद्यापासून आपले कपडे लाँड्रीत टाकायचे नाहीत हं !’

‘लाँड्रीत कपडे टाकायचे नाहीत ?’ पत्नीने आश्चर्याने विचारले, ‘मग ते धुणार कोण ?’

‘त्या शेवतूला शोधून काढ. पन्नास पैसे नगाला द्यायचे तिला.’

‘कुठली शेवतू काढलीत ही ?’

तिने अशा स्वरांत हा प्रश्न विचारला की मला वेडबीड तर लागले नाही ना, अशी तिला शंका आली असावी.

बाकी तिचेही काही चुकले नव्हते. शेंवतूची मुलाखत स्वैपाकघरात रात्रीच्या भरपेट जेवणाची तयारी करत असल्यामुळे तिने ऐकलीच नव्हती!

मी तिच्या प्रश्नाला कांहीच उत्तर दिले नाही. कारण मन भरकटत चालले होते. काल वाचलेल्या बुद्धाच्या जीवनातील प्रसंगांकडे वळले होते. दारिद्र्य, वृद्धत्व आणि मृत्यू या तीन दुःखापैकी शेंवतूने एका लहानशा दुःखाची एक छोटीशी झलक दाखवली होती. तिचे दारिद्र्य हे भारतातील दहा कोटी दरिद्र्यांच्या मापाने पाहिले तर खरे दारिद्र्य नव्हतेच! नगाला वीस पैसे का होईना तिला मिळत होते. ते तिला पुरत नव्हते. नवरा व्यसनी होता हे तिचे आणखी एक दुःख होते. संसाराचा भार एकटीने उचलणे हे तिसरे दुःख होते. पण बुद्धाने पाहिलेल्या दुःखाच्या पासंगालाही ते पुरत नव्हते. आणि या दारिद्र्याच्या जोडीला त्याने पाहिलेले वृद्धत्व आणि मृत्यू! दहा मिनिटांच्या भाषणात मी हे रेडियोवर कसे सांगणार होतो! कशासाठी सांगणार होतो! समाजसुधारणेसाठी? श्रोत्यांना माझे वक्तृत्व ऐकवण्यासाठी? रेडियोचा चेक पदरात पाडून घेण्यासाठी?

माझा मेंदू भणाणून गेला. मन बधिर झाले. आकाशवाणीसाठी टॉक लिहायचे विसरून गेलो!

● ●

# ९ : निर्मितीचा आनंद !

गेल्या वर्षीच्या दिवाळी अंकात, मागची दिवाळी ते आजची दिवाळी या कालखंडातल्या माझ्या राशीचे भविष्य मी आवडीने वाचले होते. त्यांत म्हटले होते की, वृषभ राशीच्या लोकांना — हो, माझी रास मेष आहे असे मला ओळखणाऱ्या अनेक मित्रांना वाटते, पण ज्योतिषी सांगतात ती वृषभ आहे; आणि मला स्वतःला वाटते, ज्योतिष्यांचेच म्हणणे खरे असावे ! — तर सांगत होतो गेल्या वर्षीच्या एका दिवाळी अंकातले माझ्या राशीचे भविष्य. त्यांत म्हटले होते की, तुम्हाला हे वर्ष आर्थिक दृष्ट्या अडचणीचे जाईल, उसनवट दिलेल्या पैशांची वसुली होणार नाही. बायकोच्या आजारात खर्च होईल. एप्रिल–मे महिन्यात घरात लग्नकार्ये निघणार आहेत. दूरच्या नातेवाईकांच्या लग्नात भरपेट अहेर द्यावे लागणार आहेत. आणि या सगळ्यांसाठी तुम्हाला कर्ज काढावे लागणार आहे. पण ही सारी दुःखदायक वार्ता सांगूनही ज्योतिषीबुवांनी पुढे म्हटले होते, तरी सुद्धा तुमच्या जीवनात कांही आनंददायक गोष्टी घडतील, पुष्कळ वर्षे न भेटलेले नातेवाईक भेटतील, मित्रांच्या सहवासात आनंद लाभेल आणि पूर्वी केलेल्या श्रमांची फळे चाखायला मिळतील !

एके काळी दैनिकाचा संपादक असल्यामुळे ही भविष्ये वाचकांच्या करमणुकीसाठी द्यायची असतात याची कल्पना होती. म्हणून गेल्या वर्षीच्या त्या दिवाळी अंकातले ते माझे भविष्य मी चवीने वाचले आणि

विसरून गेलो.

गेल्या महिन्यामागे जुनी रद्दी उलटीपालटी करत असतांना तो अंक माझ्या हातात आला आणि त्यांतले ते भविष्य सहज म्हणून पुन्हा एकदा वाचले. आणि ते वाचून चमत्कार वाटला! ज्योतिषीबुवांनी वर्तविलेल्या गेल्या वर्षीतल्या घडामोडी तंतोतंत खऱ्या उतरल्या होत्या! हातात पैसे आले नव्हते, माझ्या स्वतःच्या आणि नातेवाईकांच्या घरी लग्ने निघाली होती, त्या लग्नांत लांबचे नातेवाईक कित्येक वर्षांनंतर भेटले होते, गोवा पाहायला कुठले कुठले मित्र-पाहुणे आणि परिचित, पावसाळा सोडून इतर महिन्यात उगवले होते. या साऱ्या खर्चासाठी कर्ज काढावे लागले होते. ज्योतिषीबुवांचे पाऊण भविष्य खरे ठरले होते.

पण उरलेल्या भविष्याचे काय? याच वर्षी केल्या श्रमांची फळे-फळे! फळांचे अनेक वचन!– चाखायचा योग कांही आला नव्हता. पण वाटले, भविष्य येत्या दिवाळीपर्यंतचे आहे. अजून दोन महिने अवकाश आहे. तेवढ्या मुदतीत कांही चमत्कार घडू शकेल. लिहिण्याचे श्रम आपण वर्षभर करतोच आहो. एखाद्या दिवशी फळे चाखायला मिळतील! केल्या श्रमाचे चीज करणारा एखादा दिवस तरी उगवेल! सरकारकडून आपला लेखक म्हणून गौरव होईल! सत्तरी पूर्ण होणार आहे. त्या दिवशी आपले चाहते सत्कारसमारंभ घडवून आणून थैलाबियली देतील! नव्या पुस्तकाच्या प्रकाशनासाठी कला अकादमीकडून शंभर टक्के प्रकाशन-अनुदान मिळेल! मग हे अनुदान की बक्षीस असा वाद माजून माझे नांव वृत्तपत्रांतून गाजत राहील! किंवा एखाद्या फाऊंडेशनतर्फे किंवा परदेशी सरकारतर्फे माझ्या महान् विद्वत्तेचा गौरव म्हणून परदेश प्रवासाचा योग तर येणार नसेल? कोणता बरे असेल हा देश? रशिया की अमेरिका? मनातल्या मनात मी विचार करू लागलो. चाळीस वर्षांच्या लेखनी कारकीर्दीत आपण कोणत्या देशाच्या बाजूनं अधिक लिहिलं आहे? अमेरिकेच्या की रशियाच्या? पण कांहीच लक्षांत येईना. आतांपर्यंत लिहिलेलं साहित्य इतकं प्रचंड आणि वजनदार आहे की त्याचं मूल्यमापन

आजच्या बाजारभावाने किलोला अडीच रुपये या दरानं करावं लागेल! अशा शेकडो किलो साहित्यांत रशिया व अमेरिका ह्यांच्यापैकी कोणाच्या बाजूने, कोणत्या संदर्भात, कोणत्या शब्दांत मी लिहिले आहे, त्या लिहिण्याला शैली आहे का, खोली आहे का, विस्तार आहे का, आशय आहे का, वगैरे गोष्टी शोधून काढायला मराठीतले सारे कुळकर्णी आणि त्यांचे घराणे सांगणारे कुळकर्णीतर समीक्षक अपुरे पडतील!

मी काळजीत पडलो. भविष्यलेखक माझा मित्र होता. त्याचे वृषभ राशीचे तीन चतुर्थांश भविष्य खरे ठरले होते. उरलेले एक चतुर्थांश खरे ठरावे अशी इच्छा होती. मला माझ्या श्रमांची फळे तर चाखायचीच होती. पण संपूर्ण भविष्य खरे ठरले म्हणून त्या ज्योतिषीमित्राला पत्र लिहून अभिनंदन करायचे होते. कसल्याही क्षुल्लक निमित्ताने मित्रांना, परिचितांना, माझ्या साहित्याच्या चाहत्यांना—आणि या चाहत्यात पुरुषांप्रमाणे स्त्रिया आणि त्यांतल्या त्यांत तरुण मुलीही आल्याच—पत्रे लिहून सरकारी पोस्ट खात्याचा मालाचा खप वाढवण्याची मला संवय होती. आणि माझ्या या पत्रव्यवहारातला 'व्यवहार' माझ्या कांही लेखकमित्रांनी नेमका ओळखून माझ्या मर्मावर नेमके बोट ठेवले होते! हे बोट ठेवले तेव्हा मात्र मी ठरवून टाकले, पोस्टखात्याचा खप नाही वाढला तरी चालेल, पण यापुढे पत्रलेखन करायला दोन बोटांनी सुद्धा लेखणी उचलायची नाही! पण जित्या जिवाचा स्वभाव थोडाच बदलतो! ज्योतिषीमित्राचे भविष्य खरे ठरावे, त्याला अभिनंदनपर पत्र लिहावे आणि त्याचे आभाराचे पत्र यावे असे मला राहून राहून वाटत होते.

असे राहून राहून वाटत असतांनाच एक दिवस नवल वर्तले. दोन महिने संतत धारेने बरसत असलेल्या पावसाने आज थोडी विश्रांती घेतली होती म्हणून आमची सौभाग्यवती घराभोवतालच्या बागेत अर्धा तास हिंडून आली होती. आल्या आल्या ती लॉटरी फुटल्यासारख्या आनंदी स्वरात म्हणाली, 'ऐकलं का?'

'नाही. कांहीही ऐकलं नाही मी. मी इथं कामात इतका गाढून

गेलोय की माझ्या कानाना दडे बसले आहेत.'

'पाह्यलंत का...'

'हे बघ. माझ्या लेखनात असा व्यत्यय आणू नकोस. एकदा म्हणतेस ऐकलत का? दुसऱ्यांदा म्हणतेस पाहिलंत का? माझं मन नुकतंच कुठं कॉन्सेंट्रेट होतंय, तर तुझे हे ऐकलंत का, पाह्यलंत का असले अर्थशून्य प्रश्न!'

'अहो, जरा बाहेर जाउन बघा. कवाथा चवरलाय. मुठीएवढे पांच 'बोंडे' दिसले मला.'

हातातली लेखणी मी पटकन् टाकून दिली नी उठून उभा राहात म्हटले, 'कुठल्या कवाथ्याला?'

'सायलीचा मांडव आहे ना, तिथल्या!'

दोन चार टांगात मी सायलीचा मांडव गांठला. अन् तिथे पोचता पोचता निसरड्या पायवाटेवरून पाय घसरून खाली आदळलो. कंबरेत कळ उठली.

पाठोपाठ सावकाश पावले टाकित येणारी जन्माची सोबतीण एकदम पुढे आली नि तिने मला हात दिला. 'कुठं लागलं का? आतां वय झालं, जपून चाला, पावसाळ्यात जमीन निसरडी होते, असं हजार वेळा सांगते. पण उड्या मारायची सवय कांही सुटत नाही. आतां वय आहे का हे असं उड्या मारायचं?'

पण बायकोच्या या बडबडण्याकडे लक्ष न देता मी कंबर दुखत असतानाहि पटकन् उठून उभा राहिलो आणि 'कवाथ्या'च्या शेंड्याकडे पाहिलं. खरंच तो तरणा माड 'चंवरला' होता. एक, दोन, तीन 'शेंड्या'तून चवऱ्या बाहेर आल्या होत्या. खालच्या चवरीला मुठीएवढे पांचवे-हिरवे, लालसर झाक असणारे पांच 'बोंडे' लटकत होते. त्यांच्या भाराने पोयीसह शेले खाली झुकले होते. दुसऱ्या वरच्या शेल्याला दहा पंधरा असोल्या सुपारीसारखी दिसणारी लाल, तकतकीत

कांतीची नारळाची पिटुकली देठाला पकडून घट्ट उभी होती आणि तिसऱ्या बाजूची शेंगलाच्या फुलासारख्या पांढऱ्या शुभ्र फुलांनी बहरून आलेली नाजुक चंत्री!

कितीतरी वेळ एकटक मी त्या दृश्याकडे पहात राहिलो. मन समाधानाने भरून आले. तृप्ती तृप्ती म्हणतात ती याहून वेगळी असते का? दहा वर्षांपूर्वी घर बांधण्यासाठी म्हणून पांचसहा कल्पवृक्षांना छाटतांना मला माणसाची मान गिलोटिनखाली देण्यासारखे दुःख झाले होते आणि या दुःखाचे परिमार्जन करावे म्हणून मी कापलेल्यांच्या दुप्पट कवाथे घराभोवतीच्या परिसरात माझ्या स्वतःच्या हाताने लावले होते. पहिली दोनतीन वर्षे त्यांना खाऊंपिऊं घातले होते. आणि मग त्यांना अक्षरशः सागराच्या खाऱ्या वाऱ्यावर सोडून दिले होते. कवाथे वाढत होते. आठ वर्षांत आठदहा फुटांची उंची त्यानी गाठली होती. पण माझे त्यांच्याकडे लक्ष नव्हते. माझ्या साहित्याच्या निर्मितीकडे मी वळलो होतो.

कवाथ्यांकडेच नव्हे तर इतर अनेक वृक्षवेली, फळझाडे फुलझाडे यांच्याकडे माझे लक्षहि नव्हते. अनाथाश्रमात निसर्गनियमानुसार वढणाऱ्या मुलांप्रमाणे माझ्या बागेतली ही निसर्गाची मुलें वाढत होती.

पण आज कवाथ्याच्या त्या तीन चवऱ्यांनी मला नवीन दृष्टी दिली. माणसांप्रमाणे वनस्पतीलाही मन असते, मुलाप्रमाणेच त्याना प्रेम दिले पाहिजे, आंजारले गोजारले पाहिजे असा साक्षात्कार आज मला पांच वर्षांनी पुन्हा एकदा झाला. पांच वर्षांपूर्वी खतमाती घालून आणि घामाचे शिंपणे करून फुलझाडे नी फळझाडे वाढवली होती. त्यांच्या वाढत्या कोवळ्या कायेवरून मायेने हात फिरवला होता. गुलाबाच्या, डेलियाच्या, शेवंतीच्या जाईजुईच्या डहाळीडहाळीच्या टोकाला पानांच्या बेळक्यांतून अकस्मात कळी दिसते, तिचा एक दिवस बोंगा होतो, बोंग्याचे फूल होते आणि अखेर कोमेजून जाते हे पाहून त्या फुलांच्या मातांप्रमाणेच हर्षविषादाच्या भावनांनी हेलावून गेलो होतो.

कवाथ्याच्या त्या पांच बोंड्यांकडे पाहाता पाहाता हे विचार मनात आले आणि बागेतल्या इतर फळझाडांची विचारपूस करावी अशी एक तीव्र प्रेरणा झाली. कंबरेतली सणक विसरून मी बागेत हिंडू लागलो.

दोन महिने माथ्यावर झेललेल्या आणि मुळांनी शोषून घेतलेल्या पावसाने वृक्षाच्या रूपात किती फरक पडला होता! मे महिन्यात पोटाला वळी पडलेल्या आणि पाठीला पोंक आलेल्या म्हाताऱ्यांप्रमाणे दिसणाऱ्या या वृक्षांचे अस्तित्वच मला जाणवत नव्हते. पण आज मस्तीत आलेल्या पुष्ट हत्तींप्रमाणे ते दिसत होते. एकमेकांच्या गळ्यात गळा घालून ते वाऱ्याबरोबर खेळत होते. डाळींब, रामफळ, सीताफळ, पेरू, आंबाडा, आवळा, बिमल या झाडांना फळे लटकत होती. शेवगा रथासारखा पालवला होत. आंबा कोवळ्या पालवीने डवरला होता. मला खूप खूप बरे वाटले.

आणि मग मस्तकात एकदम एक सणक आली आणि मी पायऱ्या चढून टेरेसवर गेलो. इथे आमची टेरेस गार्डन होती. गुलाब, शेवंती, झीनिया, डेलिया, अबोली, मोगरा, जाईजुई, सायली, चमेली, सोनटक्का आणि नावे माहीत नसलेली कित्येक विलायती झाडांनी सारी गच्ची तुडुंब भरली होती. मी प्रत्येक झाडाशी जाऊन त्यांच्याशी हितगुज करू लागलो. कांही जुनी झाडें माझी ओळख विसरली होती तर बरीच नवी मला ओळखतच नव्हती! कारण त्यांचा-माझा गेली पांच वर्षे संबंधच आला नव्हता. त्यांच्या दृष्टीने मी जणु एक त्रयस्थ होतो, पाहुणा होतो! माझ्या हाकेला ती साद देत नव्हती. स्पर्श केला तर अंग चोरत होती!

मग मी 'माझ्या' गुलाबांकडे वळलो. जी कलमे मी पुणे, बेळगांव, मुंबई, बंगलोर, इथून आणली होती, काकोडे, मडगांव, पणजी इथून पैदा केली होती, ती सगळी कुठे दिसतच ना. कुठे गेली ही सारी गुलाब मंडळी? मी बायकोला हाकावर हाका मारल्या. ती येताच तिला म्हटलं, 'अग, आपले-तुझे माझे आवडीचे गुलाब गेले कुठं?'

ती म्हणाली, तुमचं लक्ष तरी होतं का त्यांच्याकडे? पाण्यानं नि

रोजमीलने गुलाब वाढतात का? मुलांसारखी त्यांची माया केली पाहिजे. त्यांना जपलं पाहिजे. काटछाट करून त्याना आकार दिला पाहिजे. आम्ही आपलं आमच्यानं होईल ते करतो. पण तुम्ही होता तुमच्या नादात. गेल्या वर्षी काय झालं कुणाला माहीत! पण कितीतरी गुलाब सुकस गेले. त्यांच्या काड्या शिल्लक राहिल्या. मग त्या उपटून टाकल्या.'

पश्चात्तापाने माझं मन पोळून गेले. पत्नी एका भयानक दुखण्यानं तीन वर्षं आजारी पडल्यामुळे माझी एक मुलगी रिकेट्सच्या आजाराने अगदी लहानपणी गेली होती, त्यावेळी जे क्लेश भोगावे लागले होते त्याची एकदम आठवण झाली आणि त्याच क्लेशाचे कांटे आता मनाला बोचकारूं लागले.

पण आज वय खूप वाढलं होतं. क्लेशांचे काळजाला बोचणारे काटे मी ओढून काढूं शकत होतो. रक्तस्राव न करतां, किंवा रक्तस्रावाची पर्वा न करतां.

मी तेच केलं आणि बायकोला म्हटलं, 'हे पाहा, आता वानप्रस्था-श्रमाचं वय होत आलं आ लं. आपण आपल्या प्राचीन ऋषिमुनींचं अनुकरण करूंया का?'

'म्हणजे काय? संसार सोडून कुठं रानावनात जाऊन राह्यचं?'

'हो, कांहींसं तसंच! संसार करायचाच, पण तो रानावनात नव्हे. आपला एक मळा आहे ना! तिथं फक्त माड आहेत. मोकळी जागा खूप आहे. तिथं तूं नि मी जाऊन राहायचं. आणि तिथंच फलवृक्षांचे रान अन् फुलझाडांचं उपवन फुलवायचं. साम्राज्याचा कारभार युवराजाच्या हातात सोपवून जुन्या काळातले राजे आपल्या सम्राज्ञींना घेऊन रानात जाऊन राहिले नव्हते का? तसंच हे. पटत असलं तर जाऊं आपण. तुला पसंत नसेल तर माझा काही आग्रह नाही.'

'हे आतां बोलतांय तुम्ही. तुम्ही किती हट्टी आहां हे मला माहीत का नाही? तुम्ही ठरवावं अन् मी तसं वागावं हेच आज चाळीस वर्षं

चालत आलंय.'

'नव्या उमेदीने मग आम्ही आमच्या उजाड, भाकड मळयातल्या छोट्याशा घरी जाऊन राहिलो. अजून पावसाळयाचे दोन महिने शिल्लक होते. एळा फार्ममधली मिळाली ती ती कलमे विकत घेतली. आंबे, पेरू, चिकू, लिंबू, नीरफणस, पपया, केळीं, दुधी भोपळा, शिराळीं, भेंडीपासून कोथंबिरीपर्यंत भाज्या लावल्या. सारी जमीन आधी नांगरून घेतलीच होती. कुठून कुठून फुलझाडे आणून घरासमोरच्या अंगणांत लाऊन बाग तयार केली. स्वतः आम्ही तण काढू लागलो. शेणराखेने अंग बरबटून घेतले. झाडाझाडांच्या अंकुराला अंगातल्या घामाने अक्षरशः अभिषेक केला.

पण एक दिवस खूप काम केल्यामुळे अंग दुखूं लागले. पाठीत कळा यायल्या लागल्या. लेखनाचे बैठे काम आणि मळयातले श्रमांचे काम यांचा त्या दिवशी ताळमेळ जमला नाही. दोन्ही कामे निर्मितीची म्हणून मनाला आनंद देणारी. लेखन आणि बागकाम यांची स्वरुपे वेगळीं असली तरी प्रकार, प्रयोजन आणि परिणाम तोच. निर्मिती आणि पुनर्निर्मितीच्या प्रक्रियेमुळे तर जगाचे हे रहाटगाडगे अखंडपणे चालू राहिले आहे, सेल्फ प्रिझर्वेशन प्रमाणेच सेल्फ प्रोपागेशन ही सुद्धा मानवाची एक मूलभूत धारणा आहे. सेक्स नावाची चीज जोपर्यंत मानवात, पशुपक्ष्यादि प्राण्यांत आणि वनस्पतीतही अस्तित्वात असेल तोपर्यंत स्वतःची समूर्त प्रतिमा निर्माण करण्याची अर्ज ही माणसाच्या जीवनातलीं, self-preservation नंतरची दुसरी धारणा म्हणून कायम रहाणार नाही का? वंशसातत्य याच धारणेने चालू राहाणार नाही काय?

आरामखुर्चीवर पडल्यावर विचार करता करता या विचारापर्यंत आलो आणि मनातला सारा उत्साहच नाहीसा झाला. आधी शरीर मळाढले होते. आतां मन उदास झाले. कशासाठी हा निर्मितीचा आटापिटा? कशासाठी हा देहदंड? लेखणी चालवताना किंवा कुदळ फावडे हाताळताना त्यात व्यत्यय आणणाऱ्या किंवा माझ्या कामाचे

अनुकरण करणाऱ्या माझ्याच रक्तामासाच्या इवल्या इवल्या प्रतिमा घरात आणि दारात वावरायला नकोत का ? विचारात व्यग्र असताना माझ्या मांडीवर बसण्याचा, केस ओढण्याचा, माझा घोडा करून, माझ्या पाठीवर चाबूक ओढण्याचा हट्ट करणारा बालजीव स्वतःच्या घरा–अंगणात दिसायला नको का ?

पुन्हा विचार मनात आला, किती बुझ्वी कल्पना आहे ही ! आपल्या बागेतल्याच वृक्षांना फळे अन् फुलझाडांनाच फुले फुलली पाहिजेत का ? दुसऱ्या घरी नांदणाऱ्या आपल्या घरच्या वेली फुलांनी बहरल्या तर काय बिघडणार आहे ! परघरच्या बागेतल्या आमच्या दोन वेलींवर अशी इवलाली फुले फुलली आहेतच ना ! त्यांचा सुवास आणि सौंदर्य यांचा आनंद मला मिळतोच ना ! त्यांच्या रूपांत मी माझे — आम्हा पतिपत्नींचे रूप पहातो आहेच ना ? या फुलांनी आम्हाला आनंद दिलाच आहे ना ? कळया उमलतांनाच्या, त्यांचे फुलात रूपांतर होण्याच्या अनुभवांनी आम्ही सुखावलो आहोत ना ?

माझी एक मानलेली मुलगी. या लतेवरही फूल फुललेले नाही. फुलायची आशा उरली नाही. पण ती उदास नाही. जीवनातला सारा रस ती समरसतेने चाखून घेते. शाळेत शिक्षिका आहे. शाळेतली मुलं ही आपलीच मुलं मानते. त्यांना घडवण्यात, त्यांचे लाड करण्यात, प्रसंगी त्यांच्यावर रागावण्यात आनंद मानते. माणसाच्या देहात असलेले छोटेसे मन विश्वाइतके विशाल करण्याची कठीण किमया तिला साधलेली याहून मन चकित होते. माझ्या घराच्या दारातल्या एका फणसाच्या प्रचंड झाडाच्या एका बेळक्यात केव्हातरी एक जांभळाचे बी येऊन पडले होते. त्या बीजातून आता एक जांभळीचे झाड उगवले आहे. फणसाचा जीवनरस शोषून ते जांभळीचे झाड वाढते आहे. केव्हांतरी त्याला जांभळे लागतील म्हणून मी वाट पाहातो आहे, आणि तो फणसाचा वृक्षही वाट पहातो आहे. त्याला वाटते आहे, ही आपलीच फांदी आहे !

पण हे वाटणे नैसर्गिक आहे का ? सत्यभामेच्या दारातील पारिजा-

तरूची फुले रुक्मिणीच्या अंगणांत पडतात तेव्हां रुक्मिणीला फुले मिळाली म्हणून आनंद होतो. मुले कुठल्याही घरातली असली तरी ती आपलीच मानण्यात एक स्वर्गीय आनंद असतो. त्यांना आंजारण्या-गोंजारण्यात, त्यांना दूध पाजण्यात, त्यांचे सारे कांही करण्यात कॉन्व्हेंटच्या फ्रॅशमधल्या नन्सना स्वार्थत्याग, मानवता, सेवाभाव असल्याची प्रचीती येते. पण त्यांच्या मनातल्या कोपऱ्यात 'ही मुले आपली असती तर!' असा विचार कधीच आलेला नसतो, असे कुणी सांगू शकेल काय? दुसऱ्याची मुले आपली हे समजण्यात आनंद तर आहेच. पण आपली मुले दुसऱ्याची आहेत असे समजूं देण्यातही कमी आनंद असतो का? आपल्या दारच्या पारिजाताच्या फुलांचा सुगंध रुक्मिणीला मिळतो याचे वैषम्य वाटण्याऐवजी सत्यभामेला आनंद कां वाटू नये? श्रीकृष्णासारख्या महापुरुषाच्या सहवासात राहून ती एवढेही शिकली नसेल का? हाही मानवतेचा, स्वार्थत्यागाचा एक आगळा आविष्कार नाही का?

आरामखुर्चीवर पडल्या पडल्या या उलट सुलट विचारांनी माझा मेंदू पोखरून टाकला होता. डोळे मी मिटून घेतले होते.

तेवढ्यांत बायकोचे शब्द कानांवर पडले.

'पान मांडलं आहे. जेवायला उठता ना?'

मी उठूं लागलो. पण पाठीतून कळ आली. म्हणून पुन्हा आराम खुर्चीवर बसलो.

'कंबर दुखायला लागली का?' तिने काळजीने विचारले.

'हं!'

'कशाला करता एवढं काम? कुणी गोण्या का उभारल्या आहेत पाठीवर! चांगलं माणसात रमायचं सोडून कशाला पत्करलात हा वनवास!'

या प्रश्नाला माझ्याजवळ आता उत्तर नव्हते!

# १० : मला तारुण्य हवंय

सेंट्रल लायब्ररीतून घेतलेल्या संदर्भग्रंथांचा भारा एका हातात आणि छत्री दुसऱ्या हातात घेऊन फेरीबोटीच्या बसस्टँडवर मी उभा होतो. पाऊस केव्हा येईल याचा नेम नव्हता. आणि सिटी बसेस भरभरून आम्हा पॅसेंजर्सना न घेताच निघून जात होत्या. सिटी बसमधून गावाबाहेरच्या बसस्टॅडवर जाऊन व दुसरी बस पकडून मला दहा किलोमिटर अंतरावरच्या ओल्ड गोव्याच्या चौकात उतरून पुढे माझ्या फार्म हाऊसवर जायचे होते अन् तेही पावसाची जोरदार सर येण्यापूर्वी. पावसामुळे माझ्या डोक्यातले ज्ञान गंजणार नव्हते, पण ग्रंथांतले ज्ञान भिजणार होते. मग ते भिजलेले ज्ञान वाळवून उपयोगात आणायला उन्हाची वाट पाहावी लागणार होती !

उभा होतो तिथून अनेक गाड्या मी जाणार होतो त्याच दिशेने जात होत्या.

ड्रायव्हिंग व्हीलवर बसलेल्या एखाद्या मोटार-मालकाची नजर माझ्याकडे गेली तर तो हात उचलून मला अभिवादन करत होता. पण गाडी थांबवून मला लिफ्ट देण्याची तसदी कुणी घेत नव्हता. जो तो स्वतःच्या घाईत होता. कमीत कमी वेळा त्याला इप्सित स्थळ गाठायचे होते. पण तरीही मी हात केला असता तर गाडी चालवणारे हे माझे परिचित वा मित्र थांबलेही असते. स्टँडपर्यंतच नव्हे तर थेट माझ्या

फार्महाऊसवर त्यांनी मला आवर्जून पोचवले असते. पण मलाच त्यांची ही मेहेरयानी नको होती.

माझ्या मनात आले, कोण, कशासाठी म्हणून आपण होऊन मला लिफ्ट देणार ! त्यांच्या लेखी आज मी एक सामान्य माणूस आहे. बारा चौदा वर्षांपूर्वी मी जेव्हा गोव्याच्या 'सर्वाधिक खपाच्या दैनिक पत्रा'चा संपादक होतो तेव्हा याच गाड्या माझ्या घराच्या नी ऑफिसाच्या दारात तिष्ठत होत्या. माझी भेट इतरांच्या आधी मिळावी म्हणून त्या गाड्यांचे धनी धडपडत होते. घरातल्या आवडत्या कुत्रीला गोजिरवाणी पिल्ले झाली म्हणून किंवा दिल्लीहून आलेल्या एखाद्या मंत्र्याला खूष करावे म्हणून मांडवी हॉटेलांत दिल्या जाणाऱ्या पार्टीला मला आवर्जून बोलवत होते. मी अडचण सांगितली तर माझ्या स्वतःच्या दोन गाड्या असूनही आपल्या मर्सीडीस मधून मला हॉटेलात नेत होते. आधीच ओळख असलेल्या मंत्र्याशी वा सेक्रेटरीशी संपादक म्हणून नव्हे तर आपला मित्र म्हणून माझी ओळख करून देत होते.

पण एक दिवस या गाडीवाल्यांच्या वर्तुळातून बाहेर पडलो. समस्त जनतेला शहाणे करून सोडण्याचे संपादकाचे काम पांच वर्षे मनःपूर्वक केले. पण लोकांना शहाणे करण्याचा माझा प्रयत्न अयशस्वी होतो आहे, उलट लोकच मला शहाणपणाचे धडे देत आहेत असे आढळून आले तेव्हा वाटले की शहाणपणाची आपली ही शिदोरी अपुरी आहे. चाळीस वर्षात पैदा केलेले ज्ञान हे वरवरचे आहे. ज्ञानाच्या गाभ्यापर्यंत आपण पोचलेलोच नाही. सभा भरवल्या, संमेलने केली, भाषणे दिली, अग्रलेख लिहिले, पुस्तके लिहिली, पण शेवटी आपण आहो तिथेच आहो. ज्ञान-सागरातलें ओंजळभर पाणी सुद्धा हातात आले नाही. तेव्हा आता साऱ्या उचापती बंद करून ग्रंथमित्रांच्या सहवासांत रमावे, सामान्य माणसांच्या मनात शिरावे, समीक्षक ज्याला अनुभुती वगैरे म्हणतात ते काय असते ते पाहावे, मोटारवाल्या मित्रांपासून थोडे दूर राहावे, महागड्या हॉटेल्सच्या पायऱ्या ...

इतक्यात बस आली, ड्रायव्हरने ब्रेक लावला, आणि बसप्रमाणेच माझ्या विचारांना ब्रेक लागला. हातांतला पुस्तकांचा भारा आणि छत्री सावरीत बसमध्ये चढलो. पण एक पाय बसच्या पहिल्या पायरीवर असतानाच बस सुटली. मी गडबडलो, कोलमडलो, बसच्या सर्वात वरच्या तिसऱ्या पायरीवर आदळलो. कुणीतरी हात देऊन मला वर खेचले.

बसमधल्या गँगवेमध्ये उभे राहायचा प्रयत्न करीत असतानाच आणखी एकदा तोल गेला, पुस्तकांचा भारा हातातून निसटला, छत्रीचे टोक कुणा तरुणीच्या नाजुक पोटरीला लागले. मी एका बाकाची पाठची बाजू पकडण्याचा प्रयत्न केला, तेव्हा एका पॉश कपड्यातल्या तरुणाचा गळाच माझ्या हातात आला !

माझी ही सर्कस म्हणजे बसमधल्या उतारूंना एक करमणुकीचा विषय झाला. माणसे हसूं लागली. या साऱ्या धडपडीने माझ्या पोटरीत गोळा आला होता, कंबरेत सणक आली होती. कुणी तरुण मुलगा उठून मला जागा देईल का म्हणून मी आजूबाजूला शरमलेल्या नजरेने पाहात होतो. तेवढ्यांत एक प्रौढ खिश्चन कोळीण उठली नी म्हणाली,

'बस बाप्पा. इतलो म्हातारो जाल्यार भोंवता कित्याक? भुरग्यांक धाडूंक येना मार्किटांत? कॆंस पिकले, पांय चोलोना जाले, तोरूय भोंवप सुटोना तुमचें म्हाताऱ्यांचें!'

आजूबाजूच्या बाकांवर पुन्हा एकदा खसखस पिकली. तेवढ्यात त्या किरिस्तांव बाईने ऑफर केलेल्या सीटवर मी बसलो.

थोड्या वेळाने मागच्या बाकावरून आवाज आला. 'आपण दादासाहेब ना?'

मी मागे वळून पाहिले. चेहरा ओळखीचा नव्हता. त्यामुळे माझ्या चेहऱ्यावर त्याला ओळखीच्या खुणा दिसल्या नाहीत.

'मला आपण ओळखत नाही.' तो म्हणाला.

'पण मी आपल्याला ओळखतो. मी बांद्याचा. आमच्या गावात आपण तीनदा आला होता. एकदा ग्रंथालयात व्याख्यानासाठी, आणखी एकदा आमच्या गावात प्रथमच वीज आली तिच्या उद्‌घाटनासाठी अन् तिसऱ्या वेळी तुमच्या मुख्य मंत्र्यांच्या सत्कार समारंभाचे अध्यक्ष म्हणून. आता काय करता दादासाहेब? राजकारण सोडून का दिलंत? गोमंतक दैनिकाचे संपादक म्हणून तुम्ही केवढी मोठी कामगिरी केलीत? तुमची गाडी होती ना दादासाहेब? गाडी असतांना बसमधून असा त्रासदायक प्रवास कशाला करतां?'

गृहस्थ बोलत होता अन् त्याच्या बोलण्यातून नुकताच बसमध्ये चढता चढता कोलमडणारा म्हातारा हा एके काळचा यशस्वी, नामवंत वगैरे संपादक होता, राजकीय पुढारी होता, गाडी बाळगण्याइतका संपन्न होता ही माहिती इतर उतारूंना मिळत होती. क्षणापूर्वी कशी झाली म्हाताऱ्याची गंमत म्हणून हसणारे चेहेरे आता कुतूहलाने माझ्याकडे पाहू लागले. परग्रहावरून आलेल्या एकाद्या विचित्र प्राण्याकडे पाहावे तसे!

शांतपणे त्या माणसाकडे पाहात मी उत्तरलो, 'गाडी होती. पण वाढत्या खर्चामुळं ती आता परवडत नाही. म्हणून विकून टाकली. आता काय करता म्हणून तुम्ही विचारलंत. आता बागकाम नी प्रार्थना करतो. फावल्या वेळात वाचन करतो.'

'बागकाम नी प्रार्थना?' त्याने प्रश्न विचारला. 'दोन्हीचा एकमेकांशी संबंध काय?'

'पूर्वी पुढारी होतो. संपादक होतो. तेव्हा समाज बदलण्याचा, त्याला पोलीटिकली कॉन्शस करायचा प्रयत्न केला. तरुण पिढी घडवण्यासाठी जीवाचं रान केलं. पण दोन्ही प्रयत्न निष्फळ ठरले. आतां झाडं लावतो. त्यांना खतपाणी देतो. ती ट्रिम करतो. त्यांना मला हवा तसा आकार देतो. कोवळी झाडं तर मी शिकवलेलं सारं ग्रहण करतात.'

गृहस्थ माझ्याकडे पाहातच राहिला. 'अन् वाचन कसलं करतां? अध्यात्मपर ग्रंथांचं ! ज्ञानेश्वरी, योगवासिष्ठ...'

'छे छे, सायकॉलॉजिकल ग्रंथांचं. माणसं अशी कां वागतात? विशिष्ट घटनांच्या माणसां माणसांमध्ये वेगवेगळ्या प्रतिक्रिया का होतात? तरुणांना म्हाताऱ्यांची अडगळ कां वाटते? म्हाताऱ्यांना तरुणांना सल्ला देण्याची सुरसुरी कां येते? माणूस सारखा पैशाचा मागं कां लागतो? सारं आयुष्य इतकं ॲक्टिव पण निरर्थक कामात गेलं की या प्रश्नांची उत्तरं मिळवायला वेळच मिळाला नाहीं. म्हणून ग्रंथांतून आणि माणसांच्या निरिक्षणातून असल्या प्रश्नांची उत्तरं शोधतोय फावल्या वेळात. या प्रश्नांची उत्तरं मिळाली तर पुस्तकंही लिहीन म्हणतोय.'

'आणि प्रार्थना कशासाठी करतां?'

'प्रार्थना अशासाठी की ही जी तरुण माणसं आता मला हसली ना, त्या तरुणांना म्हातारपण येऊ नये म्हणून. आमची पिढी एक वृद्धत्वाचा शाप घेऊन आली. पुढच्या पिढीला तरी तारुण्याचा अमरपट्टा मिळावा. तसा तो मिळाला तर हे तरुण लोक म्हातारे होणार नाहीत आणि बसमध्ये चढताना पडणार नाहीत आणि त्यांची पोरंबाळं त्यांना हसणार नाहीत.'

मी हसत हसत पण जरा मोठ्यानेच ही शेवटची वाक्ये उच्चारली तेव्हा त्या हसणाऱ्या उतारूंची तोंडे उतरली.

बस शेवटच्या स्टॅंडवर पोचली तसे उतारू उतरले व पांगले.

बसमधली आत्तां सांगितली घटना ती काय, पण मी ती भलतीच सीरियसली घेतली होती आणि तिला एका बाजूने तत्त्वज्ञानाची डूब दिली होती तर दुसऱ्या बाजूने हसणाऱ्या त्या तरुणांवर कोरडे ओढण्यासाठी तिचा उपयोग केला होता.

माझे आता तसेच होत होते. नुकतीच सत्तरी उलटली होती, तरी मनाचा उत्साह नी उभारी, कामाची जिद्द नी महत्त्वाकांक्षा कायम होती. पण शरीर मात्र त्या उत्साहाला नी जिद्दीला साथ देत नाही असा एक नवा अनुभव येऊं लागला होता. तारुण्यात नी प्रौढत्वात गरजेच्या

आणि गरज नसलेल्या अशा अनेक गोष्टी धडाडीने केल्या. मनाच्या संकल्पांना शरीराची साथ होती. पण गेल्या वर्षभरात अशा काही लहान सहान घटना घडू लागल्या होत्या की आपण म्हातारे होत चाललो आहो असे वाटू लागले होते. फक्त बारा वर्षापूर्वी हौसेने लहानसा बंगला बांधला. त्या बंगल्याला स्वतःच्या मनाप्रमाणे आकार द्यायला गवंडी, सुतारांच्या बरोबरीने राबलो होतो. विटा उचलतांना, खिडक्यांच्या ग्रिलांना खिळे ठोकतांना माझी सामाजिक प्रतिष्ठा आड येते असे मला वाटतच नव्हते. खुद्द नायब राज्यपाल दामलेसाहेब राजनिवासात परत जातांना गाडीतून खाली उतरून माझे हे काम पाहात होते. श्रमांना प्रतिष्ठा मिळाली पाहिजे असे माझे लाडके मत होते. आणि म्हणून बाजारात जाऊन भाजीपाला खरेदी करून व ती बास्केट-मध्ये भरून दोन्ही हातांनी गुंतलेल्या अवस्थेत गाडीपर्यंत जाण्यात मला काहीसुद्धा वाटत नव्हते. आजही वाटत नाही. मोलकरीण नसली तर माझे स्वतःचे कपडे धुणे आणि संडास सफाई करणे हे तर माझ्या अंगवळणीच पडले होते.

पण आज माझ्या बंगल्याच्या खिडकीची बिजागरी गंजलेली असली तर दुसरी बसवण्याइतके शारीरिक सामर्थ्य माझ्या ठायी उरले नव्हते. उंच कपाटावर ठेवलेली पुस्तके काढण्यासाठी उंच स्टुलावर चढायला आता भीती वाटत होती.

पुस्तकांच्या भाऱ्यासह घरी आलो, जेवलो आणि विश्रांतीसाठी खाटेवर पडलो. विचारांचा भुंगा मन पोखरीत होता. जेवल्यावर अर्धा तास झोपण्याचा माझा नियम. पण आज डोळे बंद करूनही झापड येत नव्हती.

आणि विचार करता करता मनाच्या तळाच्या गाळात रुतून बसलेला ययाति एकदम वर आला! होय. पुराणात वर्णिलेला कुरु कुळांतील ययाती. ज्याच्याविषयी जनमानसात अपार गैरसमज आहेत तो ययाती!

या ययातीची नी माझी अगदी लहानपणापासून ओळख होती. महाभारताचे गद्य भाषांतर तर मी वाचलेच होते. परंतु कथाकल्पतरू ग्रंथात आलेली ययातीची कथाही वयाच्या अवघ्या बाराव्या वर्षी वाचली होती, आणि देवयानीशी कपट करून शर्मिष्ठेशी लग्न करणारा लंपट राजा अशी त्याची प्रतिमा माझ्या मनात निर्माण झाली होती.

पण एक दिवस नरहर कुरुंदकर गोव्यात आले. त्यांची व्याख्याने होऊं लागली. आणि एका व्याख्यानात महाभारत ज्या 'जय नांवाच्या इतिहासाचा' चा विस्तार करून निर्माण झाले त्यातली ययातीची वेगळी आणि मनाला चटका लावणारी कथा त्यांनी सांगितली. मूळातली ही कथा मग मी वाचली आणि ययातीविषयीची सारी किल्मिषे मनातून पार निघून गेली. मूळ भारतातील हा ययाती प्रतापी, न्यायी, प्रजावत्सल होता. दान हे त्याचे व्रत होते. तो धर्मज्ञ, वेदज्ञ, मोक्षज्ञ होता. भारतीय युद्धांत शरपंजरी पडलेला भीष्म राजा युधिष्ठिराला सांगतो, 'प्रत्येक राजाने सकाळी उठून करदर्शन केल्यावर आपल्या वंशातल्या पुण्यवान अशा सहा राजांचं स्मरण करावे. तूं कुरुवंशीय म्हणजे ययातीच्या वंशांतला आहेस. म्हणून सर्वप्रथम तू ययातीचं स्मरण कर.'

ययातीने भोगासाठी मुलाकडून तारुण्य मागून घेतले होते, ही गोष्ट खरी होती. पण हा भोग म्हणजे फक्त कामभोग नव्हता. धर्म, अर्थ, काम व मोक्ष हे माणसाचे चार पुरुषार्थ म्हणजे भोग असतात. हे भोग पूर्ण करणे हे माणसाचे कर्तव्य असते. ययाती वृद्ध झाला तरी त्याचे हे भोग अपुरे राहिले होते. राजावर तर या भोगांची अधिक जबाबदारी असते. म्हणून ययातीने मुलाचे तारुण्य घेतले, सर्व भोग पुरे केले आणि मुलाचे तारुण्य त्याला परत दिले आणि देवयानी व शर्मिष्ठा या आपल्या दोन्ही लाडक्या पत्नींसह वानप्रस्थाश्रम स्वीकारला. राजाचे प्रजापालनाचे नियत कर्तव्य केल्याशिवाय मेला असता तर ययाती कर्तव्यवंचित ठरला असता. त्याला स्वर्गप्राप्ती झाली नसती. वृद्धत्व ही आपल्या कर्तव्य-

पूर्तीमधली अडचण आहे हे लक्षात आले म्हणून काही वर्षें त्याने मुलाचे तारुण्य घेतले व उरलेले कर्तव्य पूर्ण केले.

ययातीची ही मूळ कथा कळल्यावर मला वाटले, मी सुद्धा एक ययातीच नाही काय? मी तरी माझे भोग कुठे पूर्ण केले आहेत? जे कांही केले ते किती दिशाहीनतेने केले! जे केले त्यापेक्षा करायचे आहे ते किती मोलाचे आहे! किती अधिक आहे! किती महत्त्वाचे आहे! दिखाऊ कार्यापेक्षा टिकाऊ असे कितीतरी सामाजिक काम माझ्यासमोर पडलेले नाही काय? संपादकीय शब्दांनी समाजसुधारणा होते काय? व्याख्यानांनी ज्ञान पाजता येते काय? समाजकार्य सोडूनच द्या, स्वतःचे जीवन तरी मी समृद्ध केले काय? अखंड ज्ञानसाधनेत रंगून गेलो काय? तसा रंगून गेलो असतो तर समाजाला सांगण्यासारखा कितीतरी ज्ञानसंग्रह माझ्या भांडारात जमा झाला नसता काय?

आता मी थकत चाललो आहे. आत्मविश्वास आहे, जिद्द आहे; पण रग नाही, मस्ती नाही. शरीर तक्रार करीत आहे. बसमध्ये चढउतार करतांना आणि बसच्या दांडीला धरून लोंबकळतांना पायात पेटके येतात. ही उणीव आतां कशी भरून काढायची?

आणि परवां अचानकपणे माझ्या वृद्धत्वामुळे आलेल्या अगतिकपणाची मला चीड आली.

तीनचार दिवसांपूर्वीच गोवा–मुंबई बसला अपघात झाला. पावसाळ्यांतल्या पाण्याच्या पुराने फोफावलेल्या नदीत सरळ बस घुसली. या अपघातात दगावलेली माझ्या अत्यंत निकटची तीन माणसे होती. त्यांतला एक माझ्या मित्राचा विशीतला मुलगा होता. एक उमलते फूल विकसित होण्यापूर्वीच काळाने खुडून टाकले होते.

बातमी ऐकली नी सुन्न होऊन गेलो. दुसऱ्या दिवशी सकाळी पहिल्याच बसने मित्राच्या घरी गेलो. घरात आकांत उडाला होता. माझ्या गळ्यात गळा घालून मित्राने पोटभर रडून घेतले.

थोडा वेळ गेला आणि दारात एक टेंपो व एक पिकअप अशी दोन वाहने उभी राहिली. जमलेल्या नातेवाईकांच्या आपसांतील बोलण्यावरून अंत्यविधी मित्राच्या खेडेगांवी होणार असल्याचे लक्षात आले. मित्राच्या भावाला विचारले, ' बॉडी गांवी नेणार का ?'

तो म्हणाला, ' हो. आमची आई तिथेच आहे ना. म्हणून अंत्ययात्रा तिथं करायचं ठरवलंय. '

पिकअपमध्ये मयत मुलाचे शव ठेवण्यात आले आणि टेंपोमध्ये घरची माणसे बसली. मित्राच्या बायकोला शेजारणींनी टेंपोमध्ये चढवतांना पाहिले तेव्हा माझ्या मनाला पीळ पडला. घुसमटून घुसमटून ती रडत होती. पण तोंडून शब्द फुटत नव्हता. बाहेर येणाऱ्या हुंदक्यांना परतवून लावण्याच्या प्रयत्नात तिचा मूळचा गोरा सुंदर चेहरा काळानिळा नी वेडावांकडा होत होता. ती टेंपोमध्ये बसली तेव्हा टेंपोला टेकून उभ्या असलेल्या माझ्याकडे तिचे लक्ष गेले. आता तिला एक जोरदार हुंदका फुटला. पुत्रशोकाचे दुःख कसे असते हे तिच्या डोळ्यांतून मला वाचता आले.

माझ्या डोळ्यांतून चटकन् पाणी आले. मन गलबलून गेले. वाटले, ज्या मित्राला त्याच्या सुखात साथ दिली त्याच्या दुःखातही आपण शेवटपर्यंत साथ दिली पाहिजे. ज्या मुलाच्या मुंजीकरता आपण सहकुटुंब त्याच्या खेडेगांवी गेलो होतो त्याला अखेरचा निरोप देण्यासाठी त्याच्या-बरोबर चार पावले चालायला नको का ?

टेंपोच्या खिडकीशी बसलेल्या मित्राचा दंड जोराने पकडून मी म्हटले, ' मी येतो रे तुमच्याबरोबर. '

मित्र म्हणाला, ' नको दादा. तुमची तब्येत बरी नसते. कशाला त्रास घेता ! '

त्या शब्दांनी माझ्या मनावर चाबकाचा फटकारा बसला नी वस्तुस्थितीची मला जाणीव झाली. माझ्या आर्थरायटीसने हल्ली उचल

खाल्ली होती. दोन पावले चालणे कठीण होत होते. आता आठ वाजता मंडळी गांवी जायला निघाली होती. सारे आटोपून परतायला दुपार टळून जाणार होती. चहाशिवाय पोटात अन्नाचा एक कण गेला नव्हता. त्या खेडेगांवात स्मशान बहुतेक डोंगरावर असणार. डोंगर चढून जाणे मला जमेल काय? जमलेच तरी पुढले चारआठ दिवस पायांचे सांधे दुखणार होते. गुडघ्यांना मालीश करावे लागणार होते. ते करत असतांना बायकोचे नेहमीचे शब्द कानांवर पडणार होते, 'कशाला केलीत एवढी धडपड? अशा उड्या मारायचं हे वय आहे का?'

त्या एका क्षणात हे सारे विचार मनात येऊन गेले आणि माझी मलाच शरम वाटली. कांही वेळा किती स्वार्थी बनतो माणूस! मित्रांच्याच नव्हे तर परिचित–अपरिचितांच्या विपत्तीत त्यांना सहाय्य करण्यासाठी तहान–भुकेची पर्वा न करता अदृष्टाच्या अंधारात उडी घेणारा पंचवीस वर्षांपूर्वीच्या 'मी' ने आज माझ्या गुडघ्यांची काळजी करावी? पोटात अन्नाचा कण नसल्याचा विचार माझ्या मनात यावा? माझ्या या विचारांचीच मला घृणा आली.

आणि मग अचानक माझ्या मनात लपून राहिलेल्या ययातीचा आवाज कानी पडला. तो म्हणत होता, 'दादासाहेब, माझ्यासारखंच कर्तव्यपूर्तीसाठी तुम्हालाही तारुण्य हवंय.'

मनातल्या मनात मी उत्तरलो, 'होय राजा, खरंच मला तारुण्य हवंय!'

● ●

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२८०३
दा. क्र. २३८८४
१६-६-१९९४
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

REFBK-0023775